मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर,
विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | बुधवार, २० ऑगस्ट २०२५ | वर्ष: १ | अंक:८० | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## केंद्राने कापूस आयातीवरील सीमा शुल्क हटवले

**नवी दिल्ली , दि. १९ वृत्तसंस्था**

अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापार करारआधी एक महत्त्वाची घटना घडली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रचंड टॅरिफ भारतावर लादल्यानंतर केंद्र सरकारने एक निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने परदेशातून आयात केल्या जाणाऱ्या कापसावरील सीमा शुल्क रद्द केले आहे. १९ ऑगस्ट २०२५ पासून हा निर्णय लागू झाला आहे. त्यामुळे भारतातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढू शकते, अशी चर्चा सुरू झाली आहे. टॅरिफच्या मुद्द्यावरून अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेली भूमिका आणि अमेरिकेसोबत होऊ घातलेल्या व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कापूस आयातीबद्दल निर्णय घेतला आहे. रात्री केंद्रीय अर्थ मंत्रालय आणि केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने यासंदर्भातील अधिसूचना काढली आहे. परदेशातून आयात केल्या जाणाऱ्या कापसावर ११ टक्के सीमा शुल्क होते. परदेशातून आयात केल्या जाणाऱ्या कापसावर १९ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत सीमा शुल्क रद्द करण्यात आले आहे.

**अग्रलेख**
**खरीखरी**

## बँकांची तूट, जनतेची लूट

गेल्या पाच-सात वर्षांपासून अमुक तमुक एका मोठ्या भांडवलदाराच्या घेतलेल्या कर्जाला बँकेने माफ केले, हे आपण वाचतो आणि ऐकतो. सामान्य माणसावर दहावीस हजार रुपयांचे कर्ज असले तरी बँका काय करतात आणि काय काय करीत नाहीत ते आपण दररोज वर्तमानपत्रात वाचतो आणि टीव्हीवर बघतो. आपल्या सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची योजना जाहीर केलेली आहे पण ती अजून प्रत्यक्षात उतरलीच नाही. वास्तविक ही कर्जमाफी ज्या ज्या बँकेने कर्ज दिलेले आहे त्याच बँकेने केली पाहिजे. या कर्जमाफीसाठी खरे तर सरकारला पैसा देण्याची गरज भासू नये. तुम्ही एकेका उद्योगपतीचे ५० हजार कोटी, ७० हजार कोटी, ८० हजार कोटी एवढ्या मोठ्या रकमेची कर्जे माफ करता तेव्हा त्यांची भरपाई बँका कशा प्रकारे करतात. हे पाहिले तर अर्वाचीन काळात बँकांनी अत्यंत वेगवेगळ्या मार्गाने वसुलीचा अक्षरशा धुमधडाका लावलेला आहे हे अगदी स्पष्टपणे दिसून येते. या प्रकारातील सगळ्या गोष्टी पाहिल्या तर आपले म्हणजेच सर्वसामान्यांचे डोळेच पांढरे होतील. बँका यापूर्वी रोख रकमेचा व्यवहार करण्यासाठी कोणतीही रक्कम किंवा शुल्क आकारीत नसत. आता अनेक बँका रोख रक्कम मोजण्यासाठी त्याचे शुल्क आकारतात त्यातही आता पैसे मोजण्यासाठी कॅशियरला काहीही करण्याची गरज नसते. दोन-चार लाखांच्या नोटा मशीनमध्ये पाच ते सात मिनिटांमध्ये मोजल्या जातात आणि व्यवहार पूर्ण होतो. मग त्यासाठी भरमसाठ शुल्क आकारणे कितपत योग्य आहे हा एकच प्रश्न नाही, अख्खी प्रश्नावली तयार आहे. तुमचे बँकेत खाते आहे त्यासाठी दरवर्षी वेगळे शुल्क आकारले जाते. एटीएम वापरून महिन्याभरात चार ते पाच वेळा पैसे काढता येतात नंतर प्रत्येक व्यवहाराला वेगळे शुल्क याच बँक आकारत असतात. डुप्लिकेट पासबुक पाहिजे त्याला वेगळे शुल्क, स्टेटमेंट हवे आहे त्याला वेगळे शुल्क, तुम्ही दिलेला किंवा तुम्हाला मिळालेला चेक जर पास झाला नाही, तर त्यालाही दोन्ही कडून जबर शुल्क वसूल केले जाते. याशिवायही इतर अनेक माध्यमातून बँका मस्तपैकी सध्याच्या कालावधीमध्ये वसुली करतात. सध्या ऑनलाईन पेमेंटचा जो मार्ग बरेच लोक अवलंबतात त्याच्यामध्ये मोबाईल रिचार्ज करण्याला सुद्धा प्लॅटफॉर्म म्हणजेच व्यावसायिक दर आकारून त्यातूनही वसुली होतच असते. ही वसुली इंटरनेट उपलब्ध करून देणारे पुरवठाधारक करतात असे दिसले तरी त्यातील काही भाग हा बँकांकडे वळता केला जातो, ही यामधील खरी मेख आहे. तसे नसते तर रिझर्व बँकेने यापुढे शून्य आकारणीवर कोणताही प्लॅटफॉर्म चालू ठेवला जाऊ शकत नाही, असे स्पष्टीकरण दिलेच नसते. ती बातमी तर जगजाहीर आहे. त्यावर अजून वर्तमानात वरताण म्हणजे तुमच्या खात्यात किमान शिल्लक नाही म्हणूनही दंड आकारला जातो. सर्वसामान्यांच्या खिशात चाट लावून एवढी वसुली करून त्याचा फायदा कोणाला होतो. तर आम्ही वर म्हटल्याप्रमाणे कर्जबुडव्या उद्योगपतींना होतो. एके काळी व्हिडिओकॉन नावाची कंपनी प्रसिद्ध होती. आयसीआयसीआय बँकेच्या महाव्यवस्थापक चंदा कोचरला पटवून याच व्हिडिओकॉनने मोठीच कर्जाऊ रक्कम घेतलेली होती. त्यामध्ये कोचर बाईंनीही आपले कोरडे हात धुवून घेतले होते, असे बरेच मंडळींचे म्हणणे आहे त्यामुळे त्यांना चौकशीला सामोरे जावे लागले. एवढी उलथापालथ करणाऱ्या या व्हिडिओकॉन वर बँकेचे ७० हजार कोटींचे कर्ज आहे. त्यासाठी याच कंपनीने एक प्रस्ताव दिलेला आहे. त्यामध्ये एकूण रकमेपैकी अर्ध्या रकमेत या सगळ्या प्रकरणाचा निपटारा करावा असा कंपनीचा आग्रह आहे. याला वाणिज्य भाषेत वन टाइम सेटलमेंट म्हणतात. मग या सेटलमेंटसाठी म्हणजेच हे ३५ हजार कोटी रुपये वसूल करण्यासाठी ग्राहकांना वेठीस धरा आणि वसूल करा अशीच सध्याची रीत आहे. पूर्वी बँकांमधील ज्या खातेदारांनी ठेवी ठेवलेल्या असायच्या. त्या पैशांनीच बँका कर्ज देत होत्या, जी रक्कम कर्ज घेणाऱ्यांना दिली जात असे. त्या कर्जदारांकडून व्याजाच्या स्वरूपामध्ये तीच रक्कम वसूल केली जात असे. आता बँकेमधील ठेवीवर तेवढे व्याज बँका देत नाहीत, त्या पुढची गोष्ट म्हणजे आता छोटी छोटी कर्ज घेण्यासाठी सामान्य ग्राहक मागे पुढे पाहतात. मग मोठ्यामोठ्या रकमांचे कर्ज भागवायला बँकांनी नवनवीन फंडे शोधलेले आहेत. या सगळ्या खेळांमध्ये राष्ट्रीयकृत काय, शेड्युल्ड काय किंवा खाजगी बँका काय, आपला ताळेबंद नफ्याचा करीत आहेत. अशा प्रकारे आपल्या बँकातील तूट भरून काढण्यासाठी ग्राहकांची लूट होत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. विशेष म्हणजे बँकांची तूट आणि ग्राहकांची लूट वंदे भारतच्या वेगाने सुरू आहे त्यासाठी तुम्ही आम्ही कितीही बोंबा मारल्या तरी कोणीही एकायला तयार नाही. कारण तो आवाज त्यांच्या कानापर्यंत जात नाही किंवा गेला तरी एकला जात नाही ही खरी गोष्ट आहे. बँकांचे आणि आपले जमत नसले तरी बँकांशिवाय आपलेही भागत नाही हेच खरे आहे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# पर्जन्य प्रलय ! 12 जणांचा मृत्यू

**मुंबई, दि. १९ प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने राज्यभरात १२ जणांचा मृत्यू झाला आहे. यात नांदेड जिल्ह्यात पूरग्रस्त परिस्थितीमुळे ९ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. या पर्जन्य प्रलयामुळे कोकण, मराठवाडा, विदर्भात अतिवृष्टी झाली असून पिकं पाण्याखाली गेली आहेत. आठवड्याच्या सुरुवातीलाच झालेल्या बेफाम पावसाने नोकरदारांची दैना झाल्याचं दिसून आले. मराठवाड्यात पाणलोट क्षेत्रात कोसळणाऱ्या पावसाने अनेक गाव जलमय झाली असून ढगफुटीसदृश्य पावसामुळे शेकडो जनावरांचा मृत्यू झाला आहे. अनेकांची घर पाण्याखाली गेली आहेत. नागरिकांना स्थलांतरित करण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यात पूरस्थिती गंभीर बनली होती. ढगफुटी सदृश्य परिस्थितीत तब्बल ९ जणांचा मृत्यू झाला. मात्र सध्या नांदेडमधील पाऊस ओसरला असून परिस्थिती सामान्य होत आहे. पूरग्रस्त भागातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले असून, जेवणखाण्याची व्यवस्था केली आहे. गरज पडल्यास लष्कराची मदत घेतली असल्याचंही मंत्री महाजन यांनी सांगितलं.

### प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून

मुंबईत पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचलं आहे. एका व्यक्तीचा भिंत पडून मृत्यू झाला आहे. मिठी नदी सध्या ४.९ मीटरवर असून ती धोक्याच्या पातळीवर (३.९ मी.) पोहोचली आहे. नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांना सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे. पालिका प्रशासन सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. दरम्यान, कोकणपट्ट्यातही पावसाचा जोर कायम असून रायगड जिल्ह्यातील अंबा नदी व रत्नागिरीतील जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. त्यामुळे कोकणासह रायगड, मुंबई परिसरात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### मुंबईत रेल्वे सेवा विस्कळीत

मुंबईत रेल्वे सेवा विस्कळीत झाली असून मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वे काही प्रमाणात सुरू असली तरी हार्बर मार्गावर पाणी शिरल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. रस्त्यावरील वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. दुपारी १ वाजेपर्यंत हायटाईड ओसरल्यानंतर परिस्थिती सुधारेल, अशी शक्यता होती. मंत्री गिरीश महाजन यांनी नागरिकांना सावधगिरीचे आवाहन केले आहे. "कोणीही विनाकारण घराबाहेर पडू नये. पर्यटन टाळावे. जीव धोक्यात घालून बाहेर पडू नका. सर्व यंत्रणा सज्ज असून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. घाबरून जाण्याचे कारण नाही," असे ते म्हणाले.

### मुंबई उपनगरांत अतिवृष्टीची नोंद

मुंबई उपनगरांत मागील २४ तासात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. विक्रोळी परिसरात सर्वाधिक २५५.५मिमी पाऊस झाला आहे.ही माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. सोबतच, भायखळा, सांताक्रुज, जुहू, वांद्रे परिसरात अतिवृष्टी झाली आहे. पुढील २४ तासात पावसाचा जोर कायम राहण्याचा इशारा देखील हवामान विभागाने दिला आहे. ठाणे- कळवा -मुंब्रा खाडीला भरतीला सुरुवात झाली आहे. सतत दोन दिवसात पडत असलेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचायला सुरुवात झाली आहे. ठाण्याला लागूनच असणारा कळवा खाडी आणि मुंब्रा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खाडीला भरतीला सुरुवात झाली असून खाडीकिनारी असणाऱ्या बोटीला प्रशासनाच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.







## भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे न लावणाऱ्या राईसमिलर्सवर कायदेशीर कारवाई करा

### देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेची प्रधान सचिवाकडे मागणी

**देसाईगंज, दि. १९ प्रतिनिधी**

शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेला धान स्थानिक राईसमिलर्सना भरडाई करीता देण्यात येताना शासन परिपत्रकातील मुद्दा क्र. ७.७ नुसार भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावून त्याचे रेकॉर्डींग पेनड्राईव्ह मध्ये सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी संबंधित राईसमिलर्सची असुन दर १५ दिवसांनी सदर चित्रीकरण पेनड्राईव्ह मध्ये कॉपी करून ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदर १५ दिवसाचे चित्रीकरण जिल्हा पुरवठा अधिकारी यांना सादर करणे आवश्यक असतांना जिल्ह्यातील सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्सनी शासन परिपत्रकाला हरताळ फासला असल्याने अशा संबंधित राईसमिलर्सवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली असल्याने संबंधित विभागात चांगलीच खळबळ माजली आहे.

अतिदुर्गम, आदिवासीबहुल नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेला धान स्थानिक राईसमिलर्सना भरडाई करीता देतांना यात अनियमितता होऊ नये करीता राज्याच्या अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक:- धानभ-१३२४/प्र.क्र १६७/नापु.२९ दि.२२ नोव्हेंबर २०२४ च्या मुद्दा क्रमांक ७ अनुसार धान भरडाई करीता देताना गिरणीधारकांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. यात मुद्दा क्रमांक ७.७ नुसार भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावून त्याचे रेकॉर्डींग पेनड्राईव्ह मध्ये सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक करण्यात आले आहे.तसेच दर १५ दिवसांनी सदर चित्रीकरण पेनड्राईव्ह मध्ये कॉपी करून सदर १५ दिवसाचे चित्रीकरण जिल्हा पुरवठा अधिकारी यांना जतन करून ठेवण्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

तसेच शासनाकडून सदर चित्रीकरणाची मागणी करण्यात आल्यास व तपासणीच्यावेळी सदर चित्रीकरणाचा पेनड्राईव्ह उपलब्ध करून देणे बंधनकारक असून असे चित्रीकरण न केल्यास सदर भरडाई केंद्र रद्द करण्यास पात्र राहिल,असे स्पष्ट सुचित करण्यात आले आहे.असे असतांना जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय गडचिरोली यांचेकडे माहिती अधिकारात माहिती मागण्यात आली असता जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे संबंधित एकाही राईसमिलर्सने भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावून रेकॉर्डींग केली नसल्याची गंभीर बाब चव्हाट्यावर आली आहे.असे असतांना जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी शासन परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ७.७ नुसार एकाही राईसमिलर्सवर कारवाई केली नसल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे.

दरम्यान सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्सचे देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा केल्या जात असल्याची गंभीर बाब जिल्ह्यातील अहेरी,मुलचेरा व नुकतेच गडचिरोली येथील शासकीय गोदामातील गोदाम व्यवस्थापकांनी चव्हाट्यावर आणली असल्याने संबंधित राईसमिलर्स उचल केलेला धान परराज्यातील खुल्या बाजारात विक्री करून शासनाला मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करीत असल्याच्या गंभीर बाबीला दुजोरा मिळु लागला आहे.असे असतांनाच जिल्हा पुरवठा अधिकारी यांना माहिती अधिकारात माहिती मागीतली असता सदर माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे.यावरून सिएमआर मिलींग मध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाची भुमिका संशयास्पद असून जिल्ह्यातील एकाही राईसमिलर्सने भरडाई केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे लावून रेकॉर्डींग केली नसल्याची गंभीर बाब समोर येऊ लागली आहे.धान भरडाई करीता शासन परिपत्रकातील मुद्दा क्र. ७.७ अनुसार करारनामे करणे अनिवार्य असतांना व जे राईसमिलर्स नियमाचे पालन करीत नसतील अशा राईसमिलर्सचे करारनामे रद्द करणे अपेक्षित असतांना आजतागायत एकाही राईसमिलर्सवर कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे सिएमआर मिलींग मध्ये प्रचंड गैरव्यवहार करण्यास जिल्हा पुरवठा अधिकारी यांचीही मुक संमती असल्याची शक्यता नाकारता येत नाही.करीता या गंभीर तेवढ्याच धक्कादायक प्रकरणाची सखोल चौकशी करून शासन परिपत्रकाला हरताळ फासणाऱ्या सर्वांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी कऱ्हाडे यांनी अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे. याबाबत काय कारवाई केली जाते,याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

## मिठी नदीला पूर, शेकडो नागरिकांचे स्थलांतर

**मुंबई, दि. १९ प्रतिनिधी**

मुंबई पुन्हा एकदा मुसळधार पावसाने थिजली आहे. पहाटे ४ ते सकाळी ११ या अवघ्या सात तासांत १५० मिमीपेक्षा अधिक पाऊस कोसळला असून उपनगरात तर हे प्रमाण आणखीनच जास्त नोंदवले गेले आहे. रस्ते जलमय झाले आहेत, तर नाले आणि नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहू लागल्या आहेत.



मिठी नदीची उंची थेट ३.९ मीटरपर्यंत वाढली आहे. त्यामुळे पूरस्थितीचा गंभीर धोका निर्माण झाल्याने कुर्ला क्रांतीनगर परिसरातील तब्बल ३५० नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास स्थलांतरितांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जाते.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सातत्याने परिस्थितीचा आढावा घेत असून महापालिका आयुक्तांना सतत संपर्कात ठेवून आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बचाव पथके सज्ज असून आपत्कालीन सेवा दल हायअलर्टवर आहे.


मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनावर पावसाने पुन्हा गदा आणली आहे. मध्य आणि हार्बर लोकल सेवा सेवा ठप्प होण्याची चिन्हं आहेत, तर रस्त्यांवरील वाहतूक ठप्प झाली आहे.

## माजी न्यायमूर्ती सुदर्शन रेड्डी ' इंडिया' आघाडीचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार

**नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था**

निवडणूक आयोगाने उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली आहे. तसेच या निवडणुकीसाठी नामांकन प्रक्रियाही सुरू झाली आहे. या अधिसूचनेनुसार, २१ ऑगस्टपर्यंत नामांकन अर्ज दाखल करता येईल. तसेच २५ ऑगस्टपर्यंत अर्ज मागे घेता येतील. तर, ९ सप्टेंबर रोजी ही निवडणूक पार पडणार आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे सत्ताधारी भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार असतील. तर, विरोधकांच्या इंडिया आघाडीने देखील त्यांच्या उमेदवाराच्या नावाची घोषणा केली आहे.

इंडिया आघाडीने सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती सुदर्शन रेड्डी यांच्या नावाची घोषणा केली आहे. रेड्डी हे इंडिया आघाडीकडून उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी नामांकन अर्ज दाखल करतील. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी काही वेळापूर्वी रेड्डी यांच्या नावाची घोषणा केली आहे.



काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी मंगळवारी झालेल्या विरोधी पक्ष नेत्यांच्या बैठकीत महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी व इस्रोचे माजी शास्त्रज्ञ एम. अन्नादुराई यांच्या नावावर चर्चा झाली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी तुषार गांधी यांचं नाव सुचवलं होतं. तर, द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षाने अन्नादुराई यांचं नाव पुढे केलं होतं. दी इंडियन एक्सप्रेसने यासंबंधीचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. गांधी व अन्नादुराई यांच्याबरोबर रेड्डी यांचं नाव देखील पुढे आलं. त्यानंतर इंडिया आघाडीतील सर्व प्रमुख नेत्यांची रेड्डी यांच्या नावावर सहमती झाली आहे.

रेड्डी, गांधी व अन्नादुराई यांच्यापैकी कोणाची निवड करायची याचा निर्णय इंडिया आघाडीने राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर सोपवला होता. यासंबंधी अधिक चर्चा करण्यासाठी खरगे, शरद पवार व इंडिया आघाडीतील प्रमुख नेते काही वेळापूर्वी भेटले. या भेटीवळी सर्वांच्या सहमतीने इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार म्हणून सुदर्शन रेड्डी यांचं नाव निश्चित झालं आहे.

## नरेंद्र मोदींना निवृत्त करून गडकरींना पंतप्रधान करा

### शेतकरी नेते किशोर तिवारींचे भागवत यांना पत्र

**नागपूर, दि. १९ प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने निवृत्त करावे. त्यानंतर २०१४ मध्ये पंतप्रधान पदाची संधी हिरावलेल्या नितीन गडकरींना पंतप्रधान पदाची संधी द्यावी, अशी मागणी करणारे खुले पत्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी लिहले आहे.

किशोर तिवारी म्हणाले, मी यवतमाळ जिल्ह्यात मागील ४० वर्षापासून आदिवासी व वंचित शेतकऱ्यांसाठी काम करतो. माझे वडील पंडीत जमुनाशंकर तिवारी गुरुजी संघ जनसंघाचे १९६२ पासुन पूर्णवेळ प्रचारक होते. ते १९ महीने नाशिक येथे मध्यवर्ती कारागृहात होते. मला राज्यात भाजप सरकार असतांना शेतकरी स्वावलंबन उच्चाधिकार मिशनचे अध्यक्षपद देऊन राज्यमंत्रीचा दर्जा दिला गेला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक जुने 'संघटन शिबिर प्रशिक्षित स्वयंसेवक असल्याने मी हे पत्र लिहित आहे.

देशाने मोदी यांना ११ वर्षे काम करण्याची संधी दिली. मोदी यांनी प्रभु रामचंद्राचे भव्य मंदिरासह अनेक चांगली कामेही केली. २०१२ मध्ये काही नेत्यांनी बोगस बिनबुडाच्या घोटाळ्याचा आरोप करणारा कट रचून नितीन गडकरी यांच्या पंतप्रधान पदाची संधी हिरावली होती. ही सर्व गोष्टी नितीन गडकरीना मी १४ डिसेंबर २०१२ ला सांगितल्या होत्या. परंतु पक्ष शिस्त अभूतपूर्व संयम यामुळे ते त्यावेळी चूप राहिले होते. आज या कटात सहभागी असलेले जेष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी व प्रकाश जावडेकर जिवंत असून ते सत्य जगाला सांगतील व नितीन गडकरी यांची माफी मागतील, अशी मी अपेक्षा करतो. नितीन गडकरी यांची कार्यसम्राट व सर्वांना घेऊन चालणारे मंत्री म्हणून ख्याती आहे. त्यांना सर्वदूर मान्यता आहे. त्यामुळे त्यांना २०२९ च्या लोकसभा निवडणुका पूर्वी उरलेली चार वर्ष देशाचे नेतृत्व करण्याची संधी द्यावी व देशाला त्यांचे नेतृत्वात पुढे नेण्यासाठी एक सकारात्मक बदल घडवून आणावा, अशी विनंती मी आपणास करीत असल्याचेही किशोर तिवारी यांनी पत्राद्वारे मोहन भागवत यांना सांगितले.

किशोर तिवारी यांनी पत्राद्वारे मोहन भागवत यांना सांगितले की, २०१९ मध्ये सुद्धा नितीन गडकरी यांना पंतप्रधान करण्यासाठी मी आग्रही मागणी रेटून धरली होती. परंतु त्यावेळी मोदी- शहा लॉबीने २९२ जागा मिळाल्याने मलाच भाजप सोडण्यास भाग पाडले. त्यानंतर मी सहा वर्षे उद्धव ठाकरे यांचे सोबत होतो. मागील ११ वर्षात विरोधकांची मुस्कटदाबी करण्यासाठी ई. डी., सी. बी. आय., मोकाचा दुरुपयोग केंदीय निवडणूक आयोग, गुप्तचर संस्था, इतर संवैधानिक संस्था बळकावून घेतल्याचा दुदैवी संदेश सामान्य नागरिकांत जात आहे. मोदी-शहा राजवट हुकुमशाहीने वागत आहे. अशी सर्व जगात झालेली धारणा पुसून काढण्यासाठी नेतृत्व बदल आवश्यक असल्याचेही किशोर तिवारी यांनी सांगितले.

## काँग्रेसने ज्या 'ट्विट'वरून निवडणूक आयोगाची गचांडी धरली ती पोस्टच डिलीट- संजय कुमारांनी माफी मागितली

**नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था**

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी काही दिवसांपासून महाराष्ट्र विधानसभेत 'मत चोरी' झाल्याचा आरोप केला. काँग्रेसने निवडणूक विश्लेषक आणि लोकनीती-सीएसडीएस समन्वयक संजय कुमार यांनी महाराष्ट्राच्या मतदार यादीवर प्रश्न उपस्थित केलेल्या ट्विटचा आधार घेऊन आयोगावर आरोप केले होते. आता याबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. संजय कुमार यांनी हे ट्विट डिलिट करत माफी मागितली आहे.

संजय कुमार यांनी या पोस्टमध्ये महाराष्ट्र विधानसभा जागांवर कमी मतांची माहिती दिली होती. एक्स वरची ही पोस्ट डिलिट केल्यानंतर संजय कुमार यांनी माफीही मागितली आहे. 'त्यांच्या टीमने डेटाचा चुकीचा अर्थ लावला होता', असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी १७ ऑगस्ट रोजी हे ट्विट केले होते. भाजपने संजय कुमार यांनी पोस्ट डिलिट केल्यानंतर त्यांच्यावर टीका केली. 'ही तीच संस्था आहे ज्यावर राहुल गांधी विश्वास ठेवतात', असेही भाजपने म्हटले.

'लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत महाराष्ट्रातील दोन जागांवर विधानसभा निवडणुकीत मतदारांची संख्या प्रचंड घटली आहे', असा दावा संजय कुमार यांनी १७ ऑगस्ट रोजी केलेल्या पोस्टमध्ये केला होता. 'महाराष्ट्रातील विधानसभा क्रमांक ५९ रामटेकमध्ये २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत चार लाख ६६ हजार २०३ मतदार होते. तर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमदारांची संख्या दोन लाख ८६ हजार ९३१ पर्यंत कमी झाली, असे या पोस्टमध्ये संजय कुमार यांनी म्हटले होते.



संजय कुमार यांच्या मते, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या जागेवर एक लाख ७९ हजार २७२ म्हणजेच ३८.४५ टक्के मते कमी झाली. त्याचप्रमाणे त्यांनी देवळाली विधानसभा जागेचा डेटा दिला होता. त्यांच्या मते, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत विधानसभा क्रमांक १२६ देवळालीमध्ये चार लाख ५६ हजार ७२ मते होती. तर विधानसभा निवडणुकीत मतदारांची संख्या दोन लाख ८८ हजार १४१ पर्यंत कमी झाली. संजय कुमार यांच्या मते, देवळाली मतदारसंघावर एक लाख ६७ हजार ९३१ म्हणजेच ३६.८२ टक्के मते कमी झाली.

संजय कुमार यांनी मंगळवारी महाराष्ट्र निवडणुकीवरील त्यांच्या ट्विटबद्दल माफी मागितली. ती पोस्टही त्यांनी डिलिट केली. "महाराष्ट्र निवडणुकीशी संबंधित ट्विटबद्दल मी मनापासून माफी मागतो. २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा डेटाची तुलना करताना चूक झाली. आमच्या डेटा टीमने डेटा चुकीचा वाचला. ट्विट डिलीट करण्यात आले आहे. चुकीची माहिती पसरवण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता, असेही या पोस्टमध्ये म्हटले आहे.

# ॥ जेष्ठांना हवी सन्मानाची संध्याकाळ ॥

ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा महत्वाचा घटक आहेत आणि त्यांची काळजी किंवा त्यांना मिळणाऱ्या सुविधा यांकडे कौटुंबिक, सामाजिक आणि शासन-प्रशासनाचे,त्या त्या पातळीवर लक्ष असणे खूप महत्वाचे आहे. जेष्ठ नागरिक हे देशाची संपत्ती आहे असे म्हटले जाते. तर ज्या घरात आजी-आजोबा आहेत ते घर मंदिर असते असे म्हणतात. दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस जागतिक जेष्ठनागरिक दिवस म्हणून साजरा होतो.

'म्हातारपणाचा काळ' कठीणच असे उद्गार आपण अनेकदा ऐकतो आणि त्यावर वृद्धांच्या मानसिकतेला गृहीत धरतो. परंतु आपण एक गोष्ट बऱ्याचदा पाहतो ती म्हणजे काही जेष्ठ मंडळी त्यांच्याहून वयाने लहान किंवा पुढील पिढीतील मंडळींसोबत मिळून मिसळून वागत असतात. आपल्यामुळे अजून कोणी दुःखी होऊ नये असेच त्यांना वाटत असते.हे त्यामागील कारण असते. निवृत्तीनंतरचीअर्थातच आयुष्याचे संध्याकाळी अनेक स्वप्न त्यांनी बघितली असतात. निवृत्ती नंतर काही करायचे ठरविले असते. पण शारिरीक,कौटुंबिक समस्यामुळे ते कितपत पूर्ण होतात शंका असते. त्यांच्या वयानुसार आणि कौटुंबिक स्थितीनुसार त्या वेगवेगळ्या असतात.

कुठे तरुणपिढीशी संघर्ष असतो,तर कुठे जेष्ठांचा हेका असतो.हेच ते "जनरेशन गँप" दोन पिढ्यातले अंतर म्हणतात ते असते. मुळात ज्येष्ठ नागरिकांनी नव्या पिढीकडे मोकळा दृष्टिकोन ठेवून पाहिल्यास आणि तरुणांनीही त्यांना समजून घेतल्यास समस्यांची तीव्रताही कमी व्हायला होते.व्हायला हवी. साधारणपणे ५८ ते ६५ वयोगट,पासष्टी करतात. ६५ ते ७५ वयोगट,पंचेहत्तरी म्हणजे अमृत महोत्सव आणि ७५ आणि त्यापुढील वयोगट, ८१ व्या वर्षी सहस्त्र चंद्रदर्शन करतात. आर्थिक सुबत्ता, वैज्ञानिक संशोधन, आधुनिक



उपचार पद्धती यामुळे काही वर्गात वयोमर्यादा वाढली आहे, त्यामुळे समाजात ज्येष्ठ नागरिकांची संख्यादेखील वाढली आहे.आज विचार करता आपल्या देशाची लोकसंख्या एकशे पस्तीस कोटी जवळपास आहे.त्यात चौदा ते पंधरा कोटी जेष्ठ नागरिक आहेत. पंधरावीस लाखाचे संख्येच्या साठी स्वतंत्र मंत्रालय, मंत्री आहे.पण चौदा पंधरा कोटी जेष्ठ नागरिकांचे प्रश्न सोडवणे साठी, ना आयुक्तालय, ना मंत्री, ना मंत्रालय. पण वाढत्या संख्येने ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक समस्यांनाही जन्म दिला आहे. या समस्यांचेही आर्थिक, सामाजिक, शारीरिक आणि मानसिक अशा स्वरूपाच्या या समस्या असतात. वार्धक्यामुळे शरीर थकले असते आणि त्यातच शारीरिक व्याधी मागे लागतात. शारिरीक व्याधींसाठी वैद्यकीय उपचारांची गरज असते.

काही ज्येष्ठ नागरिक वानप्रस्थाश्रमाच्या पुढे गेलेले असतात, पण त्यांची जीवनासक्ती संपलेली नसते. खाणं, पिणं, कपडालत्ता, दागदागिने, प्रवास, लग्न, मुंज, सणवार अशा सर्व गोष्टींत त्यांना रस असतो, उत्साह टिकून असतो.स्वतःचे छंद,शौक,पुरवून घेताना ज्येष्ठ मनोमन स्वतःची तरुण पिढीशी तुलना करतात. बरोबरी करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होतो.अर्थातच ते काही वाईट नाही.जीवन रसमय आहे. आपल्याला आवडणारे उद्योग, छंद त्यांनी जोपासायचा प्रयत्न करावा.



यातून त्यांचा उत्साह कायम राहून राहिलेले आयुष्य जगण्यासाठी बळ मिळते.या जन्मवर या जगण्यावर शतदा प्रेम करावे. पण आता काळ बदलला आहे.आपल्या काळातील उदाहरणे देऊन, तुलना करण्याचे टाळावे, आमच्या वेळी असे होते,आम्ही असे जगलो, वगैरे दाखले देण्याचे टाळावे. काळ बदलला आहे,त्या बदलत्या काळाला स्वीकारले पाहिजे.त्या बदलत्या प्रवाहात बरोबर जायला लागते. जेष्ठांनीही वयोभान ठेवणे गरज आहे.



विशेष

**दिलीप देशपांडे**
**जामनेर, जिल्हा जळगाव**
**८९९९५६६९१७**

तरुणपिढीनेही त्यांच्या वयाचा, अनुभवाचा आदरच करायला हवा. आज आपण जे आहोत ते त्यांच्या मुळेच. नकळत कुठे त्यांचे मन दुखावले जाणार नाही, हे लक्षात ठेवायला हवे. ते जे सांगतात ते प्रेमा पोटीच, ही भावना लक्षात घ्यावी म्हणजे संघर्ष टळतो. आपल्या आयुष्याची संध्याकाळ ही कुठे व कशी होणार? याचा अंदाज कोणीच बांधू शकत नाही. त्यामुळे सगळ्याशी चांगले वागा. आपण एखाद्याशी जसे वागतो तसेच आपल्याशीही लोकं वागतात. आपण केलेली कर्म परत फिरून कधी ना कधी आपल्यासमोर उभी राहतातच,परतफेड होते. त्यामुळे अजूनही वेळ गेलेली नाही, आताच विचार करावा, चांगले कर्म करत राहावे. सदगुरु, परमेश्वरी कार्य करत रहावे हा कर्माचा सिध्दांत आहे. पुर्वीच्या काळी घरातील सर्व महत्वाचे निर्णय हे घरातील वृद्धच घ्यायचे. त्यांना एक मान असायचा. घरातील सदस्यांना त्यांची आदरयुक्त भीतीही असायची. परंतु विभक्त कुटुंबपद्धती आपल्या संस्कृतीत रुजू झाल्यापासून घरातील सगळी सूत्र ही कुटुंबातील कमवत्या तरुण मंडळींच्या हाती आली. अनेक घरात सासू -सुनांचे पटत नाही. किरकोळ गोष्टींचे भांडवल होते. कारण एकच असते, मुक्त रहाण्यावर बंधन वाटते, त्यांचा भार वाटतो. परिणामी आता घरातील आजी-आजोबा हे नावापुरतेच उरले. काही ठिकाणी त्यांची रवानगी गावाला करण्यात आली, तर काहींनी तर त्यांना थेट वृद्धाश्रमात पाठवले जाते. आजची परिस्थिती अशी आहे की, दोन-दोन मुले आहेत, पण एकटा जबाबदारी घेत नाही. आज इथे उद्या तिथे वाटणी करुन घेतात. आई एकाकडे, वडील दुसऱ्या कडे. ज्यांना दोन तीन मुलीच आहे तर कोणती एक मुलगी आई वडिलांचा सांभाळ करत नाही. काही दिवस एकीकडे तर काही दिवस दुसरीकडे. स्थैर्य नाही. आपल्या संपत्तीचे वाटप कसे करणार ह्याची कुरबरी मुलींच्यात मनोमनी असते. कुठे मुले आहेत, पण ते परदेशात नोकरी करतात. आर्थिक प्रलोभनात तिकडेच स्थाईक होतात. दुरूनच प्रेम दाखवतात. ना सुखात ना दुःखात सहभाग असतो. सत्तरीच्या घरात आई- वडिल. आजारपणात शेजारी येतात कामाला. काही मुले वृध्दाश्रमात आईवडीलांना ठेवतात. ते परदेशात असतात. केव्हातरी ते येतील, आपल्याला घेउन जातील ही मनात वेडी आशा धरुन असतात. पण अगदी त्यांच्या मृत्यूनंतर देखील त्यांना यायला वेळ नसतो. वृध्दाश्रमालाच अन्त्यविधी करायला सांगतात. पैसे पाठवितात. कारण सहवासातले प्रेम कधीच आटले असते. असेही उदाहरण आहेत. ही सत्य परिस्थिती आहे. घरात जेष्ठ व्यक्ती भार होऊ लागल्यामुळे आज परिस्थितीत वृध्दाश्रमात वृध्द कमी आणि जेष्ठ नागरिकांची संख्या वाढू लागली आहे आणि मग घरात मुलांना सांभाळण्यासाठी आजी आजोबा नाही. त्या मुलांची रवानगी पाळणाघरात होते. त्यामुळेच पाळणाघराची संख्याही वाढतेय. एकीकडे आई वडिलांचा मान राखावा लागतो. तर, पत्नशीही जुळवून घ्यावे लागते. मुलांना तारेवरची कसरत करावी लागते. मुले सांभाळ करतच नाही असे नाही. अपवाद असतोच. प्रेमाने राहणारी कुटुंब आहेत. पण काळा बरोबरच परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. जबाबदारी नकोय आणि बंधनेही नकोय. आईवडीलांची संपत्ती असेल तर सांभाळतातच हे सांगायला नको. जेष्ठांसाठी अनेक योजना सवलती आहेत. त्या पुरेशा नाहीत.

जेष्ठांसाठी बस भाड्यात पन्नास टक्के सवलत आहे. पण आसन व्यवस्था नाही. रेल्वेत चाळीस टक्के सवलत, विमान भाड्यात सवलत आहे. बँकेत अर्धा टक्का व्याज जास्त मिळते. काही ठिकाणी वृध्दश्रमात सोय होते विनामूल्य. अनेक सरकारी योजना आहेत. पण त्या पुरेशा आहे का? श्रावण बाळ योजना रक्कम अल्प आहे. वय वंदन योजनेत १५ लाखाची गंतवणूक करून दहा हजार पेन्शन. ह्याला पेन्शन म्हणावे का? हे तर व्याज आपल्याच रकमेचे. असलेल्या योजनांची अंमलबजावणी होते का? हा आढावा घ्यायला हवा. सरकार हज्जारो कोटी, लाखो कोटी अनेक अनावश्यक बाबीवर खर्च करते, पण ह्या बाबतीत सहानुभूतीने बघत नाही. त्यासाठी लाचारीने त्यांना वारंवार विनवण्या कराव्या लागत आहे. मंत्री, खासदार, आमदारांचे पेन्शन, भत्ते ज्या तत्परतेने वाढवण्याची कार्यवाही झाली तसे का होत नाही?

अर्थतज्ज्ञ अनिल बोकील भाषणातून व्यक्त होतात.अर्थातच ते सरकारला उद्देशून आहेत. "वयाच्या साठी पर्यंत सर्वच नागरिकांनी, सरकारला जे जे द्यावयाचे ते दिले.प्रत्येक गोष्टीवरचा कर दिला.देशाच्या उत्पन्नात त्यांचा सहभाग आहे. त्यांच्या निवृत्ती नंतर सरकारची जबाबदारी आहे.जेष्ठनागरीक ही देशाची संपत्ती आहे.प्रत्येकाने ह्या देशाला दोन- तीन नागरिक दिले आहेत.सरकारने ह्या जेष्ठनागरिकांना राष्ट्रीय संपत्तीचा दर्जा देऊन दहा हजार रुपयांचे दरमहा मानधन द्यावे.ही मागणी नाहीतर प्रस्ताव आहे".

जेणे करुन त्यांच्या आयुष्याची संध्याकाळ सन्मानाची व्हावी. असा हा जागतिक जेष्ठ नागरिक दिन साजरा करीत असताना त्यांच्या समस्यांचा कौटुंबिक, सामाजिक आणि शासकिय स्तरावर विचार होणे अत्यावश्यक आहे. सर्व जेष्ठ नागरिकांना जागतिक जेष्ठ नागरिक दिनाच्या शुभेच्छा..!!!

**dilipdeshpande24@gmail.com**

---

➤ संस्कृती

## कुटुंबप्रमुख म्हणून स्त्रियांचे योगदान!

**आपला भारत देश हा पुरुषप्रधान संस्कृतीचा आहे.आपल्या भारतीय समाजात कुटुंबप्रमुख घराचा करता पालनकर्ता हा प्रामुख्याने पुरुष असतो; पण हा वटवृक्ष काही अपरिहार्य कारणांनी नियतीचे अनपेक्षित निर्णयामुळे आजारपणांनी, दुर्दैवी घटनेने, देश सेवेत किंवा घटस्फोट या विविध कारणांनी...**

त्याच्या जाण्याने घराची छप्पर कोसळते एकाकी पण नैराश्य दुःख, क्लेश चिंता मन उदास होते जगणे असे होते पण त्या स्त्रीला स्वतःला सावरावे लागते डोळ्यात येणाऱ्या अश्रूंना थांबवून डोळ्यात अंगार भरावा लागतो व शूरवीर महिलेप्रमाणे लढावे लागते. आपल्या मुलाबाळांसाठी मग ती स्वतःच मुलांचे आई-वडील या दोन्ही भूमिका साकारते. ही एकाकी वाटचाल करत असताना तिला अनेक प्रसंगांना तोंड



द्यावे लागते. असुरक्षित सहानुभूती दर्शक विचित्र नजरांना सामोरे जावे लागते मग ती स्त्री उच्चशिक्षित असो की मोलमजुरी करणारी. ती कष्ट करते, घराबाहेर पडते तिच्या अंतर्मनातील वेदना ती जगासमोर दाखवत नाही तिच्या हसण्यामागे दुःख लपलेले असते. तिच्या डोळ्यात अश्रूंऐवजी संयम असतो. तिच्या पायाखालच्या जमिनीवर पुन्हा उभे राहण्यासाठीची एक असामान्य ताकद असते. ती चूल- मूल सांभाळून नोकरी, मजुरी करते. कुटुंबप्रमुख म्हणून जगासमोर आदर्श प्रस्थापित करते. ती आपल्या मुलांसमोर कधीही अश्रू ढाळत नाही. ती रात्री एकांतात अनेक वेळा रडत असते. ती स्वतः चहा पीत नाही पण मुलांना दूध पिण्यास देते. ती स्वतःला साडी घेत नाही पण मुलांना कधीही काही कमी पडू देत नाही, त्यासाठी ती जीवाचे रान करते, संघर्ष करते. मुलांच्या उज्वल भविष्यासाठी अहोरात्र लढते. मुलांच्या शिक्षणासाठी, लग्नासाठी एक एक रुपया बाजूला ठेवते. मुलांना कधी एकटेपणा जाणवला तर ती म्हणते, "मी आहे ना, काळजी का करतोस ?" आपण सर्व बरोबर करून मुलांना धैर्य आत्मविश्वासाची जाणीव सदैव करून देत असते. अशी मुले देखील आपल्या आईच्या कष्टाला जाणतात. आपल्या आईने कमविलेला एक एक रुपया किती मेहनतीचा आहे याची त्या मुलांना जाण असते. ते शिक्षणात तर अग्रेसर राहतातच, तसेच घरकामात देखील आईला मदत करतात. अशा कठीण प्रसंगातूनच महिला सक्षम, भक्कम, स्वावलंबी, कर्तृत्ववान बनते. आई-वडिलांची जागा घेणारी एक अजरामर मूर्ती असते. तिला कधी कुठल्या पावलाने मोजता येत नाही. ती कुठल्याच मापात बसत नाही. आज जर तुमच्या जीवनात वडील नसतील आणि तरीही तुम्ही हसताय, शिकताय, प्रगती करताय तर फक्त एकदा तिच्या पायाशी बसा आणि पोटात साठलेले सगळे बोला. आई ही फक्त मुलांची आई न राहता वडिलांच्या भूमिकेसोबत मुलांची मैत्रीण देखील बनते. म्हणून प्रत्येकाला जीवनात वडील नसले तरी चालते पण आई असावी. म्हणून कवी यशवंत पेंढारकर म्हणतात, "स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी".

**- सीमाराणी बागुल, नाशिक,**
**मो. ८९७५३९०२०८**

---

## शिवभक्ती केल्याशिवाय मनुष्य जीवनाचा उद्धार नाही : शांतिगिरीजी महाराज





**ओझर ।** पत्रम्-फलम्-पुष्पम्-तोयम् या अल्पशा पूजेने देखील भगवान शिव प्रसन्न होतात. अशा भगवान शिवाची भक्ती करणे हाच खरा धर्म आहे.अत्यंत दयाळू आणि भक्तवत्सल भगवान शिव आहेत. मनुष्य जीवन सार्थकी करायचे असेल तर शिवभक्ती करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी महाराज धर्म पिठाचे पिठाधीश्वर अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज यांनी केले.

ओझर येथील देवभूमी जनशांती धाम येथे चौथ्या श्रावणी सोमवारी हजारो भाविकांच्या उपस्थितीत कावड यात्रा व महाजलाभिषेक सोहळा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला."हर हर महादेव, "जय बाबाजी" अशा प्रचंड जय घोषांनी जनशंती धाम परिसर दुमदुमून गेला होता. ओंकारेश्वर,रामकुंड,सप्तशृंगी गड यांसह विविध तीर्थक्षेत्राहून पायी कावड यात्रेने येत भाविकांनी भगवान बाणेश्वर महादेवास जलाभिषेक केला. जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराजांच्या उपस्थितीत रविवारी रात्री १२ वाजता भगवान बाणेश्वर महादेवाचा प्रथम जलाभिषेक संपन्न झाला.सोमवारी पहाटे ४ वाजता पुन्हा आश्रमीय संत व जनशांती धाम कार्यकारी मंडळ यांच्या हस्ते अभिषेक पूजन संपन्न झाले. दुपार सत्रात म्हाळसा माता महिला भक्त मंडळ व सायंकाळी सल्लागार समिती व नियोजन समिती सदस्य यांच्या हस्ते जलाभिषेक संपन्न झाला. यावेळी कावड घेऊन आलेल्या हजारो भाविकांनी भगवान बाणेश्वर महादेवास जलाभिषेक केला. जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज यांनी उपस्थित हजारो भाविकांना मार्गदर्शन केले. कात्यायनी ऋषींनी शंभर वर्ष तपस्या केली. त्यांना सारस्वत ऋषींनी उपदेश करतांना सांगितले की धर्माचे नाव नंदी आहे. त्यावर विराजमान असलेल्या भगवान शिवाची भक्ती करणे हाच खरा धर्म आहे. त्यामुळे प्रत्येकाने शिवभक्ती करावी. ज्याने शिवभक्ती नाही केली, त्याची माय व्यर्थ श्रमली.इतके महत्व शिवभक्तीला आहे. दुर्लभ असलेला मनुष्य देह आपल्याला मिळाला आहे.हे आपले सर्वात मोठे भाग्य आहे.भक्तीचा आनंद केवळ मनुष्य देहातच मिळू शकतो.' शिव-शिव अक्षरे दोन,जो वदे रात्रंदिन धन्य तयाचा संसार' या प्रमाणे भगवान शिवाचे निरंतर नामस्मरण करा. महादेवाच्या मंदिरात दिवा लावण्याचे व बिल्वपत्र वाहण्याचे मोठे महत्त्व आहे, असेही जगदगुरु स्वामी शांतीगिरिजी महाराज यांनी यावेळी सांगितले. चौथ्या श्रावणी सोमवार सोहळ्याचा प्रारंभ अभिषेक पूजनाने झाला. यानंतर नित्य नियम विधी,आरती,सत्संग संपन्न झाला.जगदगुरु बाबाजींची पवित्र पालखी व श्री बाणेश्वर महादेव मुकुट मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आश्रमीय कार्याची माहिती विवेकानंद महाराज यांनी दिली. यावेळी हजारो भाविकांनी जलाभिषेक, शिवदर्शन व प्रसादाचा लाभ घेतला.

---

## भारतीय बौद्ध महासभेचे लासलगावी व्यक्तिमत्त्व विकास शिबिर संपन्न

**लासलगाव ।** लासलगांव येथील नालंदा बुद्ध विहार येथे भारतीय बौध्द महासभा निफाड तालुका शाखेच्या वतीने व्यक्तिमत्त्व विकास शिबिर उस्ताहात संपन्न झाले.

यांप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक भारतीय बौध्द महासभा राष्ट्रीय सचिव, केंद्रिय शिक्षक बी. एच. गायकवाड, भारतीय बौध्द महासभा केंद्रीय प्रशिक्षक अड. एस. एस. वानखेडे, जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब जाधव, सरचिटणीस शरद भोगे, कोषाध्यक्ष रितेश गांगुर्ड, जिल्हा संस्कार उपाध्यक्ष कृष्णाजी सोनवणे यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून भारतीय संविधानउद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. व्यक्तिमत्त्व विकास शिबिरांचे उदघाटन व मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सचिव गायकवाड यांनी मानवाने आपल्या जिवतील विकासातील, प्रगतीतील अडथळे, व्यसनधीनता, स्वार्थीभाव, गर्विष्ठपणा, भांडखोर प्रवृत्ती, संशयवृत्ती हे मानवाच्या विकासातील अडथळे असल्याचे विवीध उदाहरण देऊन उपस्थित धम्मबांधवांना मंत्रमुग्ध केले. तसेच मानवांच्या विकासातील प्रगतीत वैशिष्टय या विषयी मार्गदर्शन करताना भारतीय बौध्द



महासभा राष्ट्रीय प्रशिक्षक वानखेडे यांनी मानवाने आपल्या जिवतील परोपकारी, भावना, मैत्री, करुणा, सदाचार, शिक्षण सतत जाग्रुती, परिश्रम यातच खर्या अर्थाने हित असल्याचे त्यांनी मत व्यक्त केले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी भारतीय बौध्द महासभेचे माजी राज्य संघटक अनिकराव गांगुर्ड, जिल्हा संघटक भाऊलाल कटारे, रवींद्र सोनवणे, बाजीराव गायकवाड़, विजयकुमार गजभिये, समता सैनिक भास्कर संसारे, डॉ. चारुदत्त आहिरे, मिलींद गायकवाड, रामभाऊ केदारे, जयेश मोरे, तेजस संसारे, रमाई महिला मंडळ विंचूर, लासलगांव येथील यशोधरा व रमाई महिला मंडळ, भारतीय बौद्ध महासभा महिला शाखा तालुका निफाड, महिला शहर शाखा लासलगांव आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्यक्तिमत्त्व वविकास शिबिर यशस्वी करण्यासाठी भारतीय बौध्द महासभेचे निफाड तालुका अध्यक्ष प्रकाश संसारे, सरचिटणीस मनोहर आहिरे, कोषाध्यक्ष छगन कटारे, ऊपाध्यक्ष सुरेश गांगुर्ड, विठ्ठल निळे, संघटक शिवनाथ चव्हाण, रामदास वाघ, महेंद्र कटारे, विजय घायवट, संजय निरभवने, शशीकांत भोसले, नारायण साळवे, सिध्दार्थ साळवे, अजय गांगुर्ड, महेंद्र गायकवाड वैभव गायकवाड, रवीभाऊ कटारे, तसेच लासलगांव येथील अशोक गायकवाड़, मनोहर आहिरे,बाळासाहेब सोनवणे, शामराव साळवे, राजुभाऊ शेजवळ, साहेबराव केदारे, आदीनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार भारतीय बौध्द महासभा निफाड तालुका शाखा कोषाध्यक्ष छगन कटारे यांनी मानले.

---

## 'मविप्र'ने स्वतःच्या विद्यापीठासाठी घाई करू नये!

मविप्रच्या संचालक मंडळाने स्वतःचे विद्यापीठ काढायचा निर्णय जवळ जवळ घेतलाच असला, तरी हा निर्णय भविष्यासाठी घातक ठरू शकतो. राज्यात अनेक शिक्षण संस्था या ठराविक कुटुंबांच्या मालकीच्या आहेत. तेथे कुटुंबातील पुढील पिढी संस्था सांभाळते. म्हणजे तेथे लोकशाही फार महत्वाची नाही. संस्थाचालकच सर्व अधिकार वापरतात. अशा विद्यापिठांच्या गुणवत्तेचा प्रश्न समोर येत असतो. मविप्रत दहा हजार सभासद पाच वर्षात कार्यकारी मंडळाला सत्तेत बसवते. आताचे सरचिटणीस नितीन ठाकरेंचे वडील ज्येष्ठ विधीज्ञ स्व.बाबुराव ठाकरेंनी संस्था पुढे नेली ती कडक शिस्त पाळुन. प्रामाणिक म्हणुन त्यांचा सर्वत्र दरारा होता. त्यांच्यावर कोणताच आरोप कधीच झाला नाही व त्यांच्या प्रत्तेक निर्णयाचे सभासद मनापासुन स्वागत करीत. त्या काळी दहावी बारावीचे निकाल ५० ते ६० टक्के लागत असे. म्हणजे गुणवत्तेला महत्व होते. कामचुकारपणा करायची शिक्षकांची हिंमत नव्हती. हळुहळु नंतर स्व.डॉ.वसंत पवारांनी पाच वर्ष, नंतर स्व. डॉ. दौलतराव आहेरांनी व कालांतराने निलीमाताई पवारांनी संस्था सांभाळली. जसजसा काळ सरकत गेला तशी गुणवत्ता घसरत गेली व आर्थिक आरोप सुरू झाले. पण स्व.बाबुराव ठाकरेंनी जोपासलेली शिस्त व स्व. डॉ.वसंतराव पवारांनी उभे केलेले मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल हे योगदान सभासद कधीच विसरणार नाहीत. पण अलिकडे तरूण वारसदार सभासद आताचा विचार करतात. बराच काळ संघर्ष केल्या नंतर स्व.बाबुराव ठाकरेंचे पुत्र नितीन ठाकरेंच्या शब्दावर विश्वास टाकुन संस्था त्यांच्या ताब्यात दिली. पण नितीन ठाकरे प्रामाणिक असले तरी मितभाषी व ते कुणावरच रागावत नाहीत. वाद टाळत असतात. पण काही लोक त्याचा गैरफायदा घेत असतात. सज्जन असाव पण दुर्जनाच्या डोक्यात काठी टाकावी, तरच बरे चालते. पण ठाकरेंच्या स्वभावातच ते नाही. कार्यकारी मंडळ त्यांच्या पध्दतीने काम करीत आहे. संस्थेची प्रगती होत आहे. हॉस्पिटल मध्ये गर्दी वाढत असली तरी सामान्य गरीब रूग्णांना तरूण डॉक्टर फार चांगली वागणुक देत नाहीत. सभासदांचे छान आहे. या तरूण विद्यार्थी डॉक्टरांना बरेच समजवायची वेळ आली आहे. तोंडात साखर ठेऊन बोलायला शिकवले पाहीजे. हे सोडले तर हॉस्पिटल चांगले आहे. सर्वांचे समाधान करता येणार नाही. आता शाळेचे दहावी बारावीचे निकाल बघुन हसु येते. अर्थात सर्वत्र असेच आहे. म्हणजे गुणवत्ते पेक्षा कॉपीला प्राधान्य आहे. चार ओळी वाचता न येणारे विद्यार्थी ८० टक्के मार्क मिळवतात तेंव्हा संशय बळावतोच. सर्वत्र व्यवस्थाच तशीच दिसते. बरेच शिक्षक सभासदांचे नातेवाईक साधी बदली केली तरी संचालकांना वेठीस धरून बदली रद्द करावी लागते. ज्याला कोणी वाली नाही त्याची बदली यशस्वी होते. विद्यापिठाचा निर्णय झाला तर संस्थेचा कारभार मोठा असल्याने तो निवडुन दिलेल्यांनाच साभाळावा लागेल. वेळोवेळी चांगले निर्णय घ्यावे लागतील. गुणवत्ता टिकवावी पण विद्यापिठ केल्यानंतर कार्यकारी मंडळाचे पंख छाटले जातील. समाज हिताचे निर्णय घ्यायला बंधने येतील. कोणत्या विद्यापिठाचा विद्यार्थी यावर पुढील भवितव्य ठरत असते. किरकोळ अपवाद वगळता सावित्रीबाई फुले विद्यापाठाचे नाव अजुन चांगले आहे. काही विद्यापिठ चेष्टेचे विषय ठरलेले आहेत. म्हणुन संस्थेची खुप प्रगती करा, गुणवत्ता वाढवा. कामचुकार शिक्षकांना सरळ करा. संस्था कॉपी मुक्त करा. विद्यापिठाची गरजच नाही. मविप्र हे आदरयुक्त नाव आहे, त्यामुळे विद्यापिठाची गरजच नाही. जनरल मिटींगमध्ये ठराविक सभासद कोणताही ठराव मंजुरच करून घेतात. विरोध करणाऱ्याला बोलु देत नाहीत व ठराव मंजुर होतो म्हणुन ठराव झाला हा सोपस्कार असतो. कार्यकारी मंडळाने शांतपणे निर्णय घ्यावा. सर्व बाजुंचा अभ्यास करून मगच विद्यापिठाबाबत निर्णय घ्यावा हे सुचवावेसे वाटते. खरे तर असंख्य महाविद्यालयात शिकवणे नाममात्र असते. खाजगी क्लॉसेस मध्ये अभ्यास करावा लागतो. शिकवतील पण विद्यार्थी व पालकांचा शिकवण्यावर विश्वासच कमी झाला आहे. विद्यापिठ अधुनमधुन संशयाच्या फेऱ्यात अडकत असतात. म्हणजे विद्यापिठाच्या जबाबदारीत बाकीच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ शकते. आजही संस्थेच्या सर्वच महाविद्यालयांचे नाव गुणवत्तेत चांगले बोलले जाते. पुणे विद्यापिठात संस्थेच्या महाविद्यालयांची मोठी पत आहे. मग कशाला हवे विद्यापीठ? कार्यकारीणीने खोलात शिरून अभ्यास करावा, घाईत निर्णय घेऊ नये अशी अपेक्षा आहे. सरचिटणिस नितीन ठाकरेंवर सभासदांचा पुर्ण विश्वास आहे व ते चुकीचा निर्णय घेणार नाहीत, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.



विशेष

**अशोक थोरात**
**७५८८०४०३६३**

# अर्धवट वकिलीचा आडोसा घेत जिल्हा परिषदेत भ्रष्टाचाराचा खेळ

## कक्ष अधिकारी चर्चेत । पदोन्नती घोटाळ्याने कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट




**नाशिक ।** जिल्हा परिषदेतील पदोन्नती प्रक्रियेत सौदेबाजीचे गंभीर आरोप गाजत असतानाच अर्थकारणाच्या संशयावरून संपूर्ण प्रक्रिया स्थगित झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. पात्र असूनही पदोन्नती न मिळाल्याने जिल्हा परिषदेतील कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, प्रशासनातील भ्रष्टाचाराचे जाळे पुन्हा एकदा उघड झाले आहे.

पदोन्नती प्रक्रियेत स्वतःचे उखळ पांढरे करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कक्ष अधिकाऱ्यांवर आता कर्मचारी वर्गाने जोरदार तोंडसुख घेतले आहे. स्वतःला कायद्याचे जाणकार असल्याची बतावणी करणारा हा अधिकारी प्रत्यक्षात अर्धवट वकील असून, त्याच्या चुकीच्या सल्ल्यांमुळे अनेक कर्मचाऱ्यांचे नुकसान झाल्याचे किस्से समोर येत आहेत. याच कनिष्ठ प्रशासन अधिकाऱ्याने, तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) यांच्या सहमतीने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मित्तल यांना बदल्यांबाबत शासन निर्णयातील चुकीची माहिती दिल्याने ग्रामसेवक, लिपिक, आरोग्य कर्मचारी, आयसीडीएस कर्मचारी यांच्यासह अनेक संवर्गातील बदल्या अन्यायकारक झाल्याचे बोलले जाते.परिणामतः यामुळे जिल्हा परिषदेची संपूर्ण राज्यात बदनामी झाली आहे. शासन निर्णयातील तरतुदींचा मनमानी अर्थ लावत बदल्या करण्यात आल्या. यात त्याच अर्धवट वकील असलेल्या कक्ष अधिकाऱ्याची प्रमुख भूमिका महत्त्वपूर्ण असल्याची चर्चा जिल्हा परिषदेतील कर्मचारी वर्तुळात सुरू आहे. बदल्या संदर्भातील सौदेबाजीच्या धर्तीवरच पदोन्नती प्रक्रियेतही आर्थिक उलाढाल झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत मिळत आहे. सर्व विभागातील कर्मचाऱ्यांच्या १० : २० : ३० आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पदोन्नतीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सामान्य प्रशासन विभागामार्फत जातो. मात्र, या विभागात पदोन्नतीचे दर ठरलेले असून मोठ्या प्रमाणावर पैसा फिरतो अशी कर्मचाऱ्यांची तक्रार आहे. सदर कनिष्ठ प्रशासन अधिकारी यापूर्वी आरोग्य विभागात वादग्रस्त ठरले होते. तरीदेखील त्यांची सामान्य प्रशासन विभागात नियुक्ती करण्यात आली. परिणामी जिल्हा परिषदेत भ्रष्टाचाराने पाय घट्ट रोवले असल्याचे उघड होत आहे. भ्रष्टाचारात सराईत अनेक अधिकारी-कर्मचारी यांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून जिल्हा परिषद मुख्यालयात मलाईदार विभाग व टेबलावर ठाण मांडले आहे.अशा अधिकाऱ्यांच्या बदल्या वर्षानुवर्षे झालेल्याच नाहीत. त्यामुळे ठराविक टोळीची मक्तेदारी निर्माण झाली असून त्यामुळे जिल्हा परिषदेत सर्वच विभागात भ्रष्टाचाराचे लोण पसरले आहे. बांधकाम, आरोग्य, प्रशासनासह इतर विभागांमध्ये 'टेबल पूजन' केल्याशिवाय कामेच होत नाहीत, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. अनेक विभागांतील गैरप्रकार इतके गंभीर आहेत की ते वृत्तपत्रात छापणेही कठीण आहे. "तेरी भी चुप, मेरी भी चुप" अशा गुप्त समजुतीतून संपूर्ण कारभार सुरू असल्याचे चित्र आहे. या सर्व घोटाळ्यांमुळे जिल्हा परिषदेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे नुकतेच पदभार स्वीकारलेल्या नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी याबाबत कोणती भूमिका घेतात, भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात काय कारवाई करतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# नाशिकमध्ये प्रलंबित देयकांच्या मागणीसाठी ठेकेदारांची निदर्शने

## बिल्डर असोसिएशनचे मुख्य अभियंत्यांना निवेदन



**नाशिक ।** गेल्या दोन-तीन वर्षांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रलंबित असलेली कामांची देयके (बिले) त्वरित मिळावी या मागणीसाठी मंगळवारी (दि. १९) समस्त ठेकेदारांनी बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया, नाशिक शाखेच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम भवनाच्या बाहेर जोरदार निदर्शने केली.

कामे पूर्ण करूनही गेल्या दोन-तीन वर्षांपासून विविध कामांची देयके सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेकेदारांना अदा केलेली नाहीत. त्यामुळे ठेकेदार प्रंचड आर्थिक अडचणीत सापडले असून, त्यांची कोंडी झाली आहे. याबाबत ठेकेदारांनी संबंधित अधिकाऱ्यांना वेळोवेळी निवेदने दिली. देयके मिळावी यासाठी अनेकदा पाठपुरावा केला. वरिष्ठ पातळीवर संबंधितांची भेट घेऊन गाऱ्हाणे मांडले. अगदी मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली. बैठकीत समस्या मांडल्या; पण कुठल्याही प्रकारची दखल घेण्यात आली नाही. परिणामी ठेकेदार मंडळी आर्थिक विवंचनेत सापडली आहेत. ठेकेदारांचा संयम सुटला असून, मंगळवारी ठेकेदारांनी एकत्र येत जोरदार निदर्शने केली. मुख्य अभियंत्यांना मागण्यांचे निवेदन दिले.

ठेकेदारांनी ०३, ०४, टी-६, नाबार्ड, रस्ते, पूल, विशेष दुरुस्ती, इमारत दुरुस्ती अशी विविध प्रकारची कामे वेगवेगळ्या शीर्षकात केलेली आहेत; मात्र दोन-तीन वर्षे होवूनही या कामांची देयके ठेकेदारांना मिळालेली नाही. याबाबत ठेकेदारांनी अनेक वेळा देयकांसाठी मागणी केली, पाठपुरावा केला; पण त्याची कोणीही दखल घेतली नाही. देयके मिळत नसल्याने ठेकेदार आर्थिक अडचणी सापडले आहेत. ठेकेदारांनी कामे पूर्ण करण्यासाठी बँकांकडून कर्ज घेतले आहे. खासगी सावकारांकडून पैसे घेतले आहे. मित्रमंडळी आणि नातेवाईकांकडून उधार उसनवारी केली आहे. अनेकांनी मालमत्ता-सोने गहाण ठेवले आहेत. आता पैशांसाठी संबंधित तगादा लावत असल्याने ठेकेदारांची आर्थिक कोंडी झाली आहे. त्यामुळे ठेकेदारांची त्वरित देयके अदा करावीत अन्यथा तीव्र आंदोलन करण्याबरोबरच प्रसंगी आत्मदहना इशाराही ठेकेदारांनी निवेदनात दिला आहे. मुख्य अभियंता यांना निवेदन देताना अविनाश पाटील, मनोज खांडेकर अविनाश आव्हाड विनायक माळेकर गजानन काटकर सुधाकर मुलाने किसन अंसरे रमेश शिरसाठ महेंद्र पाटील संदीप दरगुडे उपस्थित होते निदर्शने करण्यासाठी बिल्डर असोसिएशनच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने ठेकेदार उपस्थित होते.

### सिंहस्थ कामांसाठी स्थानिकांना प्राधान्य मिळावे

आगामी होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामांसाठी स्थानिक ठेकेदारांना प्राधान्य दयावे, अशी मागणीही बिल्डर असोसिएशनने केली आहे. सिंहस्थात प्रचंड प्रमाणात विविध प्रकारची बांधकाम विषयक कामे होणार असून, त्यामध्ये स्थानिक ठेकेदारांना संधी दिली जावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदनात हा मुद्दाही प्रामुख्याने अधोरेखित करण्यात आला. स्थानिक ठेकेदारांची मोठ्या प्रमाणात देयके प्रलंबित असूनही त्यांनी नेहमीच सहकार्याची भूमिका घेतली आहे. सिंहस्थाची कामे मिळाली तर ठेकेदारांना दिलासा लाभेल, असेही निवेदनात म्हटले आहे.

## महत्त्वाचे

### भर पावसात यंदा रामवारीचा उत्साह; ३५ हजार वारकऱ्यांची उपस्थिती

**नाशिक ।** दरवर्षी राममंदिर ते त्र्यंबकेश्वर निघणाऱ्या रामवारीवर यंदा पावसाने बरसात केली असली तरी वारकऱ्यांचा उत्साह दांडगा होता. नाशिक येथून निघालेली पायी दिंडी वाटचाल करत त्रंबकेश्वर मध्ये दाखल झाली होती. ३५ हजारापेक्षा जास्त वारकरी या दिंडीत सहभागी झाले होते.नाशिकचे रामाचे दर्शन घेऊन त्रंबकेश्वरी संत निवृत्तीनाथांचे दर्शन वारकऱ्यांनी घेतले. नाशिकहून आणलेली तुळस संत निवृत्तीनाथांना वाहिली याला रामवारी प्रथा असे म्हणतात. त्रंबकेश्वर गावातील डोंगरांवरचे धबधबे देखील दिवसभर वाहत होते.गावापेक्षा ब्रह्मगिरीवर आणि डोंगरांवर जास्त पाऊस असल्याचे दिसत होते. मोठ्या पावसाने प्लास्टिक मेन कापड खरेदी करण्याकडे वारकऱ्यांचा कल होता. यंदा विक्रमी प्लास्टिक विक्री झाली.संत निवृत्तीनाथ मंदिराच्या विश्वस्त मंडळाकडून रामवाडी दिंडी आयोजकांचे स्वागत करण्यात आले. संततधर पावसाने वारकरी त्रस्त होते. श्रावणातली एकादशी भाविक पर्वकाळ इतकेच पुण्यदायी मानतात. तीर्थात स्नानासाठी गर्दी होती . रामवारी आणि दर्शन सोहळा उत्साहात झाल्याची माहिती संत निवृत्तीनाथ मंदिर संस्थानचे अध्यक्ष सोमनाथ घोटेकर यांनी दिली.

### आयकर अधिकारी धनराज बोराडे 'उत्कृष्ट सेवा प्रमाणपत्राने' सन्मानित

**नाशिक ।** येथील आयकर कार्यालयातील धनराज किसन बोराडे यांना 'प्रिन्सिपल चीफ कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स सर्टिफिकेट ऑफ मेरिटोरियस सर्विस - २०२५' अर्थात 'उत्कृष्ट सेवा प्रमाणपत्राने' १५ ऑगस्टच्या निमित्ताने पुणे येथे आयकर विभागाचे प्रधान मुख्य आयकर आयुक्त, पुणे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्ताने पुणे




येथील आयकर कार्यालयात पार पडलेल्या कार्यक्रमांमध्ये विविध विभागातील अधिकारी यांचा प्रशस्तीपत्रक व स्मृतीचिन्ह देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले. नाशिक येथील आयकर अधिकारी धनराज बोराडे आयकर विभागामध्ये गेल्या २० वर्षापासून आयकर निरीक्षक व आयकर अधिकारी पदावर कार्यरत असून, अन्वेषण विभाग, मुख्यालय व मूल्यांकन अशा विविध विभागांमध्ये उल्लेखनिय कार्य केले आहे. त्यांच्या या प्रामाणिक व उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. दैनंदिन प्रशासकीय कार्यालयीन कामकाजासोबतच ते सामाजिक कार्यातही तितकेच सक्रिय आहेत. केंद्र सरकारच्या आरोग्य योजना नाशिक करिता स्थानिक सल्लागार समितीचे ते सदस्य म्हणून कामकाज करत आहे. त्यांच्या या कार्याचीही दखल घेत आयकर विभागाकडून यापूर्वी त्यांना 'कोरोना योद्धा प्रमाणपत्र' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष नितीन डोंगरे, योगेश कातकाडे, भूषण डाग यांनी अभिनंदन केले.

# डिझेल चोरी करणाऱ्या टोळीच्या आडगाव पोलिसांनी आवळल्या मुसक्या

## तीन लाख रुपयांचा ऐवज जप्त; पाच आरोपींना अटक



**आडगाव ।** आडगाव येथील ट्रक टर्मिनल येथे उभ्या असलेल्या गाड्यामधून डिझेल चोरी झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी संतोष कचरू भागवत (राहणार दिंडोरी रोड, पंचवटी) यांनी या संदर्भात आडगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या घटनेबाबत आडगाव पोलिसांनी वेगाने तपासचक्रे फिरवत डिझेल चोरी करण्याऱ्या टोळीचा पर्दाफाश केला.

या कारवाईमध्ये तब्बल तीन लाख तेरा हजार एकशे एकरा रुपये किमातीचे डिझेल, मोबाईल, गाडी असा संपूर्ण माल जप्त करण्यात आला. आडगाव पोलिसांनी प्रसाद दत्तात्रय वाडेकर (रा. गणेश नगर, निफाड) येथून या आरोपीस अटक केली. त्याची कसून चौकशी केली असता त्याने इतर साथीदारांची नावे सांगितली. अमोल कुंदे (रा. राहता), धनंजय कुंदे (राहणार, एकरूखे, ता. राहता), अजय राजू भोसले (रा., गणेशवाडी, एयरपोर्ट रोड, शिर्डी), बाबासाहेब दगडू राऊत (रा., एकरूखा, ता. राहता) यांना सदर या गुन्ह्यात अटक केली. पुढील तपास सुरु आहे. आडगाव पोलीस स्टेशनचे. पोलीस निरीक्षक संजय पिसे, स्थानिक गुन्हे शोध पथकाचे सतीश जगदाळे, दादासाहेब वाघ, इम्रान शेख, निलेश काटकर, पोलीस कोंस्टेबल भुजबळ, फडोळ, अक्षय गोसावी, हवालदार मगर, सुरंजे, पोलीस, कॉनस्टेबल राठोड, गुमबाडे, वाघचौरे, मपोआ वैशाली महाले आदींनी ही सदर कारवाई केली.

# मनमाड नगरपालिकेचा प्रारूप प्रभाग आराखडा जाहीर

## १६ प्रभाग, सदस्य संख्या ३३




**मनमाड ।** नगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकीसाठी शहराचा प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा नगरपालिका प्रशासनाने अधिकृतपणे जाहीर केला आहे. त्यानुसार शहरात एकूण १६ प्रभाग असून पहिल्या १५ प्रभागातून प्रत्येकी दोन तर शेवटच्या सोळाव्या प्रभागातून तीन असे एकूण ३३ नगरसेवक नागरिकांना निवडून द्यावयाचे आहेत.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची निश्चिती झाल्यानंतर या निवडणुकीचे प्रशासकीय कामकाज वेगाने सुरू आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार त्यावेळी चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेश देण्यात राजे छत्रपती शिवा आले होते; परंतु एकूणच प्रशासकीय कामकाज, नवीन प्रभाग रचना, त्यातील सदस्य संख्या या एकूण पार्श्वभूमीवर या कामाला विलंब होत असल्याने निवडणुका काहीशा पुढे म्हणजे या वर्षा अखेरीस किंवा त्यानंतर नूतन वर्षाच्या प्रारंभी होण्याची दाट शक्यता आहे. त्या दृष्टीने प्रशासनाने पावले टाकली असून मनमाड नगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा नगरपालिकेने नोटीस बोर्डावर जाहीर केला. या प्रारूप प्रभागाच्या आराखड्यामध्ये त्या प्रभागाची भौगोलिक सीमा ही निश्चित झाली आहे. प्रारूप प्रभागाच्या भौगोलिक सीमा असलेला आराखडा जाहीर झाल्यानंतर आता त्यावर हरकती व सूचना मागवण्यात आल्या आहेत. सोमवार दि. १८ ऑगस्ट रोजी प्रारूप विकास आराखडा जाहीर करण्यात आला. त्यात हरकती, सूचना घेण्यासाठी ३१ ऑगस्ट पर्यंतची मुदत आहे.आपल्या हरकती, सूचना या नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याकडे दाखल कराव्या लागणार आहेत.त्यानंतर प्रशासनाकडून सुनावणीसाठी वेगळी तारीख दिली जाणार आहे.

# यात्रेच्या नावाखाली १९ जणांची केली ७ लाख ३४ हजारांची फसवणूक

**मनमाड ।** शहर व परिसरातील १९ नागरिकांना धार्मिक स्थळे व धम्म स्थळे दाखवण्याच्या यात्रेचे नियोजन करण्यासाठी संगणमताने आणि ऑनलाइन पद्धतीने ७ लाख ३४ हजार रुपये स्वीकारून यात्रेचे कोणतेही नियोजन केले नाही व आगाऊ घेतलेले पैसे परत न करता फिर्यादीची फसवणूक केली म्हणून मनमाड पोलीस ठाण्यात नागपूर येथील दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी श्रीधर भागवत अहिरे,वय-६७, सेवानिवृत्त कर्मचारी,रा. रमाबाई नगर, मनमाड यांनी या घटनेची फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी निशांत चंद्रमणी मानवटकर रा.कपिल नगर, नाईट गार्डन, बौद्ध विहारा जवळ,नागपूर आणि भंते बौद्ध नंद थेरो,महाबोधी टुरिझम, रा. बौद्ध भूमी, महाविहार कामठी रोड, नागपूर यांचे विरुद्ध गुन्हा दाखल केला. याप्रकरणी श्रीधर भागवत अहिरे यांनी दिलेल्या फिर्यादीत असे म्हटले आहे की, शहरातील नागरिकांसाठी धम्म यात्रा सहल आयोजित करून लोकांची यात्रा करून आणावी म्हणून प्रॉमिस हॉलिडेज व महाबोधी टुरिझम यात्रा कंपनीमार्फत शहर व परिसरातील १९ नागरिकांना धार्मिक स्थळे व धम्म स्थळे दाखवण्याच्या यात्रेची नियोजन करण्यात आले होते. ही यात्रा २२ एप्रिल २०२५ रोजी सुरू होणार होती. त्यासाठी निशांत चंद्रमणी मानवटकर यांच्या सांगण्याप्रमाणे यात्रेकरूंचे जमा होणारे पैसे वेळोवेळी त्यांना बँकेच्या खात्यावरून व ऑनलाईन पद्धतीने एकूण ७ लाख ३४ हजार ६०० रुपये हे पासपोर्ट तयार करणे, विमान तिकीट बुकिंग व आगाव रक्कम म्हणून दिलेले आहे. पण आज पर्यंत निशांत मानवटकर व भंते बौद्ध नंद थैरो यांनी यात्रेसाठी विमान तिकीट यात्रेचे आयोजन केलेले नाही. तसेच ॲडव्हान्स म्हणून दिलेली रक्कम परत न देता आमची फसवणूक केली. असे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.शहर पोलीस निरीक्षक विजय करे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक हेमंत भंगाळे तपास करत आहे.

# कर्मवीरांच्या कार्याचा आदर्श घ्या : मुख्याध्यापिका सीमा हांडगे

**सिन्नर ।** तालुक्यातील नूतन जवाहर विद्यालय मनेगाव विद्यालयात मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे आद्य संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिन समाज दिन म्हणून उत्साहात संपन्न झाला. विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष नितीन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमासाठी विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, संस्थेचे सभासद व शिक्षण प्रेमी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


ध्वजारोहण शालेय समितीचे अध्यक्ष नितीन शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रमुख




अतिथींच्या हस्ते कर्मवीरांच्या प्रतिमांचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या रांगोळी प्रदर्शन व पुष्परचना प्रदर्शनाचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सीमा हांडगे यांनी आपल्या प्रास्ताविकात कर्मवीरांच्या जीवन कार्याचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. कर्मवीरांच्या कार्याचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी प्रगती केल्यास जीवनात ते नक्कीच यशस्वी होतील अशी आशा व्यक्त केली. याप्रसंगी अंजली सोनवणे, धनश्री खताळे, यशदीप सोनवणे आदी विद्यार्थ्यांनी कर्मवीरांच्या जीवन चरित्रावर आपली मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी शालेय समितीचे अध्यक्ष नितीन शिंदे, आर. टी. खताळे, मनेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन हिरामण सोनवणे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिपक गायकवाड, शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सुवर्णाताई गागरे, माजी मुख्याध्यापक सोनवणे, के. डब्ल्यू. सोनवणे, सारिका भगत, निलेश गायकवाड, योगेश घोडेकर, विलास सोनवणे, नितीन सोनवणे तसेच पर्यवेक्षक राजेंद्र गांगुर्डे तसेच शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सुनिल खैरनार, वैशाली वाजे, वृषाली खताळ यांनी केले. आभार पर्यवेक्षक राजेंद्र गांगुर्डे यांनी मानले.

# 'क्रेडाई'च्या प्रॉपर्टी एक्स्पोला अल्प प्रतिसाद

## भयानक किमती पाहून ग्राहकांनी फिरवली खरेदीकडे पाठ




**नाशिक ।** घरांच्या अव्वाच्या सव्वा किमती, प्लॉटचे वाढलेले दर, जाहीरात व विपणन क्षेत्रातील गसथानपणा, नियोजन शून्य कारभार, ग्राहकांची गैरसोय यामुळे सुरुवातीला गाजावाजा झालेल्या क्रेडाईच्या 'नमः प्रॉपर्टी एक्स्पो'ला अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळाला नाही. सुमारे पाचशे कोटींची उलाढाल झाल्याचा दावा करण्यात येत असला, तरी खाजगी मध्ये ते वृत्त देखील सपशेल खोटे असल्याचे एका बांधकाम व्यावसायिकानेच 'महासागर'शी बोलतांना सांगितले.

या एक्स्पोच्या माध्यमातून ग्राहकांना कमी दर मिळण्याची अपेक्षा होती. पण घरांचे व प्लॉटचे दर जाणून-बुजून वाढविण्यात आल्याचे अनेक ग्राहकांच्या लक्षात आल्याने त्यांनी शेवटी या एक्स्पो मधून माघार घेतली. नाही म्हणायला १२:३० कोटींचे तीन फ्लॅट्स विक्री झाल्याचे सांगण्यात येत असले, तरी सर्वसामान्य ग्राहकांच्या दृष्टिकोनातून घरांच्या किमती योग्य नसल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले. एका ग्राहकाने फ्लॅट नक्की केला व टोकन देण्याचा प्रयत्न केला असता भाव वाढल्याचे सांगून तो नाकारण्यात आला. असाच अनुभव अनेक ग्राहकांना आल्याने घरावाचून आता तातडीने अडले काय? जमेल त्यावेळी घर घेऊ असं मत प्रदर्शित करून अनेकांनी काढता पाय घेतला. या प्रदर्शनात १५ लाखांपासून साडेबारा कोटीपर्यंत फ्लॅट्स उपलब्ध असल्याचे सांगण्यात येत होते. त्यामुळे हजारो नाशिककरांनी तेथे भेट दिली. परंतु अनेकांना प्रत्यक्ष वस्तुस्थिती समजल्यावर त्यांनी निराशा व्यक्त केली. गौरव ठक्कर, ऋषिकेश कोते, नरेंद्र कुलकर्णी, दीपक चंदे अशा दिग्गज बांधकाम व्यावसायिकांसह क्रेडाईचे नाशिकचे मानद सचिव तुषार संकलेचा, माजी अध्यक्ष कृणाल पाटील हा एक्स्पो यशस्वी व्हावा म्हणून झगडत होते. कुंभमेळ्याच्या धरतीवर मोठ्या अपेक्षेने क्रेडाईने हा कार्यक्रम हाती घेतला होता. प्रदर्शनात प्रत्यक्ष भेटीमुळे इन्क्वॉयरी नागरिकाकडून झाली. त्यातून पाचशे कोटींची उलाढाल होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत होता. परंतु प्रत्यक्षात तो अंदाज वाया गेला. अर्थात छोट्या फ्लॅटला मागणी मोठ्या प्रमाणावर होती, पण किंमती मोठ्या असल्यामुळे अनेकांनी काढता पाय घेतला. मात्र या एक्स्पोमध्ये प्रत्यक्षात किती उलाढाल झाली, याचा खरा आकडा अद्यापही कळायला कोणताही मार्ग नाही.

# ट्रम्प-पुतिन भेटीतून निष्पन्न काय?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतिन यांच्या भेटीत अलास्का येथे तीन तास चर्चा झाली पण त्यातून काय निष्पन्न झाले, या प्रश्नाचे गूढ कायम आहे. दोन्ही शक्तिशाली नेत्यांच्या भेटीकडे सर्व जगाचे लक्ष लागून राहिले होते, या भेटीत ते दोघे जो निर्णय घेतील किंवा ते जे ठरवतील त्याचा संपूर्ण जगावर परिणाम होणार हे निश्चित होते. पण गेले महिनाभर गाजावाजा करून झालेल्या या भेटीत या दोन्ही नेत्यांत कोणताही समझौता झाला नाही किंवा करार झाला नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे सर्वांना जे अपेक्षित होते तो रशिया- युक्रेन युध्दविरामाचा निर्णयही झाला नाही. म्हणूनच या भेटींनंतर सरस कोण ठरले की ट्रम्प की पुतिन या प्रश्नाने सर्व जगात काहूर माजले आहे.

-------------

दोन शक्तिशाली देशांच्या प्रमुखांची ही ठरवून झालेली भेट होती. अशा उच्चस्तरीय भेटीसाठी दोन्ही देशांचे मंत्री व सचिव पातळीवरील वरिष्ठ अधिकारी हे अगोदरपासून चांगली तयारी करतात, उत्तम गृहपाठ व उत्तम उजळणी करतात ही तर पध्दतच आहे.

दोन राष्ट्रप्रमुखांनी कोणत्या मुद्यांवर चर्चा करायची व कोणत्या मुद्यांना प्राधान्य द्यायचे याचाही अगोदर खल झालेला असतो मग महत्वाच्या मुद्यांवर दोन्ही नेत्यात तीन तासाच्या चर्चेनंतर एकमत का होऊ शकले नाही? कोणाच्या कठोर व हटवादी भूमिकेमुळे दोन्ही नेत्यात समझौता होऊ शकला नाही? हजारो सैनिकांचे व लक्षावधी निरापराध नागरीकांचे बळी गेल्यानंतरही रशिया- युक्रेन युध्दविरामाची घोषणा का होऊ शकली नाही?

तीन तासाच्या चर्चेनंतर ट्रम्प आणि पुतिन यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली पण अवघ्या बारा मिनिटात ती संपली. जगभरातून आलेल्या पत्रकारांच्या कोणत्याही प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले नाही. बैठक सकारात्मक झाली, काही मुद्यांवर सहमती झाली, पण कोणताही करार झालेला नाही, असे दोन्ही नेत्यांनी स्पष्ट केले.

सन २०१५ नंतर म्हणजेच दहा वर्षांनी पुतिन अमेरिकेत आले होते. ते रेड कार्पेटवर येताच ट्रम्प यांनी स्वतः त्यांचे स्वागत केले. पुतिन व ट्रम्प एकाच मोटरीतून बैठकीसाठी रवाना झाले.

अलास्का २५ असे शब्द लिहिलेल्या मंचावर दोन्ही नेत्यांनी उभे राहून फोटो काढून घेतले. पण बैठकीतून फलनिष्पत्ती काहीच नाही असे म्हणावे लागेल. बैठक सकारात्मक झाली पण कोणताही सौदा झाला नाही, जो पर्यंत सौदा होत नाही तो पर्यंत समझौता होणार नाही हेच संकेत या बैठकीतून दिले गेले.

खरे तर दोन्ही नेत्यांत थेट भेट होणार असे ठरल होते, पण चर्चेच्या वेळी दोन्ही देशांचे वरिष्ठ अधिकारी व मंत्री उपस्थित होते. या बैठकीनंतर युध्दविरामाची घोषणा होणार का? याकडे सर्व जगाचे लक्ष लागले होते.

तसेच रशिया व अमेरिका यांच्यातील संबंधाविषयी नवीन पावले काय उचलली जाणार आहेत. याचीही जगात सर्वांना उत्सुकता होती. पण या दोन्ही मुद्यांवर दोन्ही नेत्यांनी कोणतेही भाष्य केले नाही. ट्रम्प व पुतिन यांच्यातील चर्चा निष्फळ ठरली अशाच प्रतिक्रिया जगातून उमटत आहेत.

बैठकीत सन्मानजनक चर्चा झाली असा सूर पुतिन यांनी लावला आहे. तर



इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

पुतिन यांच्याशी थेट चर्चा करण्यासाठी अमेरिका एका टेबलावर पोचली हे ट्रम्प यांनी दाखवून दिले, एवढेच म्हणता येईल. चर्चा होईल पण निर्णय आपल्या शर्तीनुसार घेतले जातील यावर पुतिन बैठकीत ठाम राहिले असा एक अर्थ काढला जातो आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की, बैठक चांगली झाली, उपयोगी ठरली, काही मुद्यांवर सहमती झाली पण काही मुद्यांवर बाकी आहे. म्हणजेच ट्रम्प व पुतिन यांच्या तीन तासाच्या चर्चेत कोणत्याही प्रमुख मुद्यावर एकमत होऊ शकलेले नाही हाच त्याचा अर्थ आहे.

बारा मिनिटांच्या पत्रकार परिषदेला सुरूवात पुतिन यांनी केली व तेच अधिक वेळ बोलले. ही पत्रकार परिषद पुतिन यांची होती व ट्रम्प त्याला उपस्थित राहिले असे चित्र त्यावेळी दिसले. हे दोन्ही नेत्यांनी असे ठरवून केले का याचा मात्र उलगडा झालेला नाही.

रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांना जास्त कर लावले जातील अशी धमकी काही दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी भारतासह अनेक देशांना दिली होती. मात्र तेल खरेदी करणाऱ्या चीनवर तत्काळ टेरिफ लावण्याचा विचार नाही असे सांगून त्यांनी घुमजाव केले होते.

चीन व भारत हे रशियाकडून तेल खरेदी करणारे मोठे देश आहेत. भारतावर अमेरिकेने २५ टक्के टेरिफ लावले आहेच. सन २०२० मधे अमेरिकेत राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत टपाल मतदानात घोटाळा झाल्याचे पुतिन यांनीच ट्रम्प यांना सांगितले.

त्या निवडणुकीत ट्रम्प यांना पराभव पत्करावा लागला होता. स्वतः ट्रम्प यांनी बैठकीनंतर फॉक्स वृत्तसंस्थेशी बोलताना ही माहिती दिली. सन २०२२ मधे ट्रम्प राष्ट्राध्यक्ष असते तर युक्रेन- रशिया युध्द झालेच नसते, अशीही पुष्टी पुतिन यांनी जोडल्याचे आता पुढे येत आहे.

अलास्का बैठकीत युक्रेनबरोबर युध्दविरामाचा निर्णय झाला नाही हा पुतिन यांचा विजय असल्याचे अनेकांना वाटते. पुढील बैठक मॉस्कोमधे घ्यावी असे पुतिन यांनी ट्रम्प यांना निमंत्रण दिले आहे. पण ट्रम्प, पुतिन व युक्रेनचे प्रमुख झेलंस्की अशा त्रिपक्षीय बैठकीनंतरच युध्दविराम होऊ शकतो असे अनेकांना वाटते.

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत- पाकिस्तान युध्द आपण थांबवले असे किमान २८ वेळा सांगितले आहे. आपल्याला जगात शांतता निर्माण करायची आहे म्हणून युध्दविरामासाठी ते दबाव टाकून प्रयत्न करीत आहेत. पण पुतिन यांनी आपला हेका सोडलेला नाही.

युक्रेनमधील भूभाग घेतल्याशिवाय युध्द थांबणार नाही ही पुतिन यांनी त्यांची भूमिका कायम ठेवली आहे. अलास्कामधील बैठकीचा परिणाम म्हणून रशिया व युक्रेन या दोन्ही देशातील युध्दकैद्यांची नजिकच्या काळात देवाण- घेवाण होईल, एवढा एकच आशेचा किरण दिसतो आहे.

# मत चोरी

सध्या भारतीय राजकारणात मतांच्या चोरीवरून चांगलेच रणकंदन सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे. राहुल गांधींनी मतांची चोरी झाल्याचा आरोप करून एकच खळबळ उडवून दिलेली आहे. कर्नाटकातील एका मतदारसंघांमध्ये संशोधन करून कशाप्रकारे मतांची चोरी केल्या गेली हे त्यांनी प्रसार माध्यमांसमोर पीपीटीच्या माध्यमातून समोर आणले आहे. जवळपास एक तास ११ मिनिटे त्यांनी मतदार यादीत कशी चोरी झाली याची संपूर्ण वस्तु निष्ठ माहिती देशातील जनतेच्या समोर ठेवल्यामुळे सामान्य जनता निवडणूक आयोगाच्या कारभाराविषयी प्रश्न निर्माण करीत आहे.

आपल्या घटनेने आपल्याला एक व्यक्ती एक मत याचे स्वातंत्र्य दिलेले आहे देशातला गरीब असो वा श्रीमंत प्रत्येकाला एका मताचा समान अधिकार आहे. आज पर्यंत सामान्य माणसाच्या मतांच्या भरोशावर सरकारे आलीत आणि आणि सरकारी गेलीत. मात्र गेल्या अनेक वर्षात निवडणूक आयोगावर कुणीही आक्षेप घेतलेला नव्हता.

१९५२ पासून या देशात निपक्ष व निर्भीड वातावरणात निवडणुका पार पाडत आल्याचे अनेकदा बघायला मिळाले. तेव्हा तंत्रज्ञानाचा तेवढा प्रचार झाला नव्हता आणि तरीसुद्धा सामान्य माणसांनी रांगांच्या रांगा लावून लोकशाहीचे पर्व साजरे केले होते. निवडणुकीच्या माध्यमातून सामान्य लोकांनी आपले हक्काचे सरकार निवडले होते. सामान्य माणसाच्या मतांच्या जोरावरच आपली लोकशाही टिकून राहिली.



नितीन कैलासराव गोहने
रा. हिरापूर ता. सावली
जि. चंद्रपूर.
8275393387

मध्यंतरी भाजपाच्या काही नेतेमंडळींनी संविधान बदलाबाबतची वक्तव्ये केली. अबकी बार ४०० पार असा नारा दिला गेला. भाजप संविधान बदलण्यासाठी असा नारा देत आहे, असा लोकांचा समज झाला. २०२४ च्या निवडणुकीमध्ये भाजपाचा ग्राफ ३०५ वरून २४० असा खाली आला.

गेल्या ७० वर्षात अनेक निवडणुका झाल्यात अनेक राज्यात सरकारे बदललीत अनेक दिग्गजांचा पराभव झाला. लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधींचा ही पराभव झाला होता. त्यावेळेला बॅलेट पेपरवर निवडूका घेतल्या जायच्या निवडणूक आयोग अतिशय उत्तम पद्धतीने आपली जबाबदारी पार पाडायचे आता मात्र निवडणूक आयोग संशयाच्या फेऱ्यात सापडला आहे, त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले.

निवडणूक आयोग ही भारत सरकारच्या अखात्यारीत येते. ती एक स्वतंत्र स्वायत संस्था आहे. भारतीय संविधान कलम ३२४ अन्वये निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. मतदार संघ आखणे, मतदार यादी तयार करणे, राजकीय पक्षांना मान्यता देणे, निवडणुका पार पडणे, राजकीय पक्षांना निवडणूक चिन्ह देणे, यासारखी कामे निवडणूक आयोगाला पार पाळावी लागतात. मात्र अडीकडील काळात निवडणूक आयोगाच्या कार्य पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

सत्ताधारी पक्षांच्या सूचनेनुसार निवडणूक आयोग देशात कार्य करीत आहे हा मुख्य आरोप विरोधी पक्षांचा आहे. कर्नाटकातील एका दहा बाय दहाच्या खोलीत ९० मतदार राहतात सर्वांचा एकच पत्ता असतो, आई-वडिलांचे नाव सुद्धा एकच असते, हा प्रकार नक्कीच लोकशाही शासन व्यवस्थेसाठी हानिकारक आहे. याचा अर्थ निवडणूक आयोग योग्य पद्धतीने संविधानानुसार कार्य करीत नसल्याची प्रचिती देत आहे.

या घटना देशाच्या अलीकडील वाटचालीसाठी हानिकारक ठरण्याची शक्यता आहे जिथे निवडणूक आयोगच पारदर्शी नसेल तर भविष्य काळात वाटचाल खूपच कठीण आहे. डिजिटल मतदार यादी सार्वजनिक करा अशी राहुल गांधींची मागणी होती. डिजिटल मतदार यादी सार्वजनिक करा, अशी राहुल गांधींची मागणी होती. मात्र ती आयोगाने फेटाळून लावली. अलीकडील वाटचालीसाठी हानिकारक ठरण्याची शक्यता आहे. जिथे निवडणूक आयोगच पारदर्शी नसेल तर भविष्य काळात वाटचाल खूपच कठीण आहे. उलट आपली वेबसाईट निवडणूक आयोगाने बंद करून ठेवली. याला काय म्हणायचे?

जनता आणि राजकीय पक्ष मतदार याद्यांचे योग्य पद्धतीने परीक्षण केले असते, जनतेची सीसीटीव्हीचे फुटेज मागितले ते सुद्धा आयोगाने दिले नाही. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुका नंतर विधानसभेच्या निवडणुका नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडल्या चार महिन्यात ७६ लाख मतदार वाढले हे कसे शक्य झाले? याची माहिती आयोगाने दिली नाही.

एरव्ही संपूर्ण पाच वर्षात तेवढी मते वाढू शकत नाही ती सहा महिन्यात कशी वाढली? असा प्रश्न सामान्य लोकांपुढे पडलेला आहे मात्र त्याचे उत्तर आयोगाने दिलेले नाही.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर लोकसभा निवडणुकीमध्ये जवळपास साडेतीन लाख मतदारांची नावे वगढण्यात आल्याचे सांगितले होते. त्यांचा भाचा व इतर नातेवाईकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आल्याची भूमिका नितीन गडकरी यांनी विशद केली होती, ही वस्तुनिष्ठता आहे.

नितीन गडकरींना हरवण्यासाठी अशा पद्धतीचे षडयंत्र रचण्यात आले होते का? असा प्रश्न निर्माण झाला होता. निवडणूक आयोगाने यावर कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही. उलट सत्ताधारी पक्षाचे वरिष्ठ नेते जी माहिती सांगतील ती अंमलात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत का?

मत चोरीच्या बाबतीत विरोधी पक्षांची एकजूट भारतीय लोकशाही शासन व्यवस्था मजबूत करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. जवळपास ३०० खासदारांनी मोर्चा काढला. मात्र पोलिसांनी मोर्चा अडवून धरला. मतदार यादीची साफसफाई करा... दुबार व बोगस मतदार काढा... हा मोर्चाचा मूळ उद्देश होता. मात्र खासदारांच्या मोर्चाला दाबण्याचा प्रयत्न केला गेला.

ही लढाई साधी आणि सोपी नाही. ही लढाई रस्त्यावर लढण्याची खरी आवश्यकता आहे, असा सूर विरोधी पक्षाने लावला. आज आपल्याला आपली लोकशाही मूल्ये टिकवायची असेल तर रस्त्यावर उतरून शासनाच्या चुकीच्या धोरणाचा निषेध करणे आवश्यक आहे.

आपल्या पूर्वजांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जीवाचे रान केले. प्रसंगी मृत्यूला सामोरे गेले, अनेक संकटांचा सामना केला, तेव्हा कुठे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आणि लोकशाही शासन व्यवस्था आपल्या देशात आज रुजू झाली.

आज लोकशाहीच्या प्रमुख संस्थांचा सर्रास गैरवापर केल्या जात आहे, ईडी नावाच्या संस्थेनि कहरच केला जात आहे भाजपामध्ये या व स्वच्छ व्हा.. असा नारा ईडीच्या बाबतीत सर्वमान्य झाला आहे. ईडीची चौकशी नको या सबबीखाली अनेक मात्तबार नेत्यांनी भाजपामध्ये पक्ष प्रवेश केल्याची उदाहरणे आहेत.

मत चोरी हा भयानक प्रकार पुढे आलेला आहे बिहारमध्ये ६४ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली. त्यातही काही जिवंत लोकांची नावे वगळण्यात आलीत. राहुल गांधींनी मृत दाखवण्यात आलेल्या मतदारासोबत फोटो शेअर केला. यावरून निवडणूक आयोग कशा पद्धतीने देशात कार्य करीत आहे, याचा अनुभव सुज्ञ नागरिकांना यावा. देशाची लोकशाही वाचवायची असेल शासकीय संस्थांनी पारदर्शीपणे कार्य केले पाहिजे अशी आर्त हाक सर्वसामान्य माणूस देत आहे.

■ ■ ■

# कर्म- भक्तीयोगी संत सेना महाराज



संत सेना महाराज व्यवसायाने न्हावी होते, म्हणून 'सेना न्हावी' म्हणून वारकरी संप्रदायात प्रसिद्ध आहे. आपल्या वंशपरंपरागत न्हाव्ह्याचा व्यवसाय सेवा म्हणून करताना संत सेनांनी भक्ती मार्गही मोठ्या प्रेमाने, श्रद्धेने चोखाळला.

इतर संताप्रमाणे जातीभेदांच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून प्रत्येकांची सेवा करण्याची तयारी संत सेना महाराज आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून करीत होते.त्यांच्या कार्य कृतीव्दारे त्यांचा परमार्थ दृष्टीस पडतो.

संत ज्ञानदेव- नामदेवांचे स्थान वारकरी संप्रदायात अतिउच्च पातळीवर असताना संत सेनांचे कार्य महान भक्ति परंपरेला वाहून घेणाऱ्या संत मंडळींच्या प्रभावळीतील आहे.शिवाय संत सेनांचे परमार्थिक कार्य विशेष उठून दिसते.

*आम्ही वारीक वारीक'*<br>
*करुं हजामत बारीक ''*<br>
*विवेक दर्पण आयना दावू '*<br>
*वैराग्य चिमटा हालवू ''*<br>
*उदक शांती डोई घोळू '*<br>
*अहंकाराची शेंडी पिळू ''*<br>
*भावार्थाच्या बगला झाडू '*<br>
*क्राम कोध नखे काढू ''*<br>
*चौवर्णा देऊनि हात '*<br>
*सेना राहिला निवांत ''*

संत सावता माळ्यांप्रमाणेच संत सेना महाराजांचा कर्म आणि भक्तीयोगाचा संयोग दृष्टीस पडतो;आणि तोही संत वाङ्मयातून स्पष्ट होतो. उपरोक्त अभंगरचनेचा भावार्थ लक्षात घेता संत सेना महाराज नाभिकांचा व्यवसाय करताना सामान्यनिकांच्या मनातील बारीक -सारीक विकार, अहंकाराची हजामत करण्यासाठी तीव्र मनिषा व्यक्त करतात.

ते विवेकाचा आरसा दाखवून वैराग्याच्या चिमट्याने मनातील वाईट गोष्टी दूर करतील. शांतीरुपी उदकाने त्यांचे डोळे धुतील. अहंकाराची शेंडी पिळतील. भावार्थाच्या बगला झाडून काम, क्रोधांसारख्या षड्विकारांना दूर करतील. शेवटी चौवर्णांना म्हणजेच सर्व जाती धर्मांच्या लोकांना एकत्र आणून शांतपणे राहतील, हे सद्गुण आणि सामर्थ्य संतांच्याठाई असतात.

जणू संतांचा स्थायीभावचं मानावा. एकंदरीत संतांच्या अभंगरचना समाजाला भक्तीचा सोपान, दृष्ट विचारांपासून अलिप्त ठेवते. दूषित मनाचे क्षालन आणि आत्मिक उन्नतीसाठी असतात.

संत सेना विठ्ठलाचे परमभक्त. भगवंताचा कृपाप्रसाद आणि आशीर्वादाचे दान पदरी पाडण्याचे एकमेव साधन म्हणजे नवविधा भक्तींपैकी 'नामस्मरण' भक्ती होय. श्रीविठ्ठलाच्या नामस्मरणात संत सेना दंग राहत असत.

संत नामदेवांप्रमाणे संत सेनांनी सुद्धा उत्तर भारतापासून तर महाराष्ट्रपर्यंत तीर्थाटने करून भक्ती परंपरा समृद्ध केली. ते नेमाने पंढरीची वारी करायचे. पंढरीच्या वारीवर त्यांचे अनेक अभंगे प्रसिद्ध आहेत.संत नामदेव, ज्ञानदेव, निवृत्तीनाथ, सोपानदेव,चोखामेळा, जनाबाई या संतांच्या समकालीन संत होते.

या संतांचा सहवास सेनांना लाभलेली मोठी मिळकत मानली पाहिजे. महान संतांच्या सहवासाने ते स्वतःला भाग्यवंत समजतात. संत ज्ञानेश्वरांमुळे मी घडलो असेही मानतात. संत ज्ञानेश्वरांना ते गुरु मानतात,अशा आशयाची एक अभंगरचना सुद्धा आहे.

ज्ञानदेव गुरु ज्ञानदेव तारुं'<br>
उत्तरील पैलपारुं ज्ञानदेव ''<br>
ज्ञानदेव माता ज्ञानदेव पिता<br>
तोडील भवव्यथा ज्ञानदेव ''<br>
ज्ञानदेव माझे सोयरे धायरे '<br>
जिवलग निधरि ज्ञानदेव ''<br>
सेना म्हणे माझा ज्ञानदेव निधान'<br>
दाविली निज खूण ज्ञानदेवे ''

संत सेना महाराजांच्या बाबतीत चरित्रकारांनी त्यांचा जन्म महाराष्ट्रा बाहेर झाला आहे असे म्हटले आहे. परंतु त्यांचा अधिकाधिक काळ हा महाराष्ट्रामध्ये सक्रिय राहिला. उत्तर भारतातील राजस्थान, मध्यप्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश प्रांतात त्यांची तीर्थाटने झालीत.

शेवटी मध्य प्रदेशात बांधवगड येथे विरक्तवृत्तीने राहून पांडुरंगाच्या नामस्मरण करीत राहिले व तिथेच निराकाराची समाधी लागली. संत सेना महाराजांच्या जीवन यात्रेच्याच्या समाप्तीला संत निळोबारायांनी रचलेली अभंगरचना पुढीलप्रमाणे आहे.

*जय जयाजी विष्णूदासा '*<br>
*भक्तीभाव तुझा कैसा ''*<br>
*जन्मोनि न्हाव्हीयांच्या वंशी'*<br>
*भक्ती केली तूवा भोळी ''*<br>
*प्रत्यक्ष पूर्णब्रम्ह दावी '*<br>
*राजयासी आरसा ''*<br>
*दावियेले कौतुक '*<br>
*देव पूजेचिये वेळी ''*<br>
*श्रावण वद्य द्वादशी '*<br>
*सेना बैसला समाधीसी ''*<br>
*निळा शरण प्रेमभावे '*<br>
*विष्णुदास सेनियासी ''*

■ ■



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८
shashikanttote@gmail.com

# अजातशत्रू व्यक्तिमत्व : आर आर पाटील



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील ऊर्फ आर आर पाटील यांची १६ ऑगस्ट रोजी जयंती होती.

आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच सामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत.

१६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंतदादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले.

कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे २१ वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या.

१९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते.

गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते.

आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल.

■ ■ ■•••••



## स्वयंपाकघरातील मसाल्यांकडे करू नका दुर्लक्ष
# ते आरोग्यासाठी आहेत खजिना

भारतीय स्वयंपाकघर हे केवळ चवीचाच नाही तर आरोग्याचाही खजिना मानला जातो. स्वयंपाक करताना आपण अनेकदा चव वाढवण्यासाठी मसाल्यांचा वापर करतो. तर हे मसाले आपल्या आरोग्यासाठी इतके फायदेशीर आहे की त्यांचे औषधी गुणधर्मही काही कमी नाहीत.

विशेषतः जिरे, हळद, धणे, हिंग, ओवा, आले, दालचिनी, लवंग आणि काळी मिरी हे मसाले आपल्या आरोग्यासाठी अमूल्य ठरतात. चला तर मग आजच्या लेखात आपण जाणून घेऊयात की कोणते मसाले आपल्या आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे.

**हळद आरोग्यासाठी उत्तम** : हळद ही भारतीय घरांमध्ये जवळजवळ प्रत्येक पदार्थ बनवताना वापरली जाते. केवळ त्याचा रंगच नाही तर त्यात असलेले करक्यूमिन जळजळ कमी करण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करते. हिवाळ्यात हळदीचे दूध आपल्यासाठी अधिक फायदेशीर ठरते, परंतु लक्षात ठेवा की ते जास्त प्रमाणात सेवन केल्याने कधीकधी किडनीच्या समस्या उद्भवू शकतात.

**पचनक्रियेचा साथीदार जिरे** : जिरे हे केवळ चवीसाठीच चांगले नाही तर पचन सुधारण्यास आणि गॅस आणि अपचन कमी करण्यास देखील मदत करते. जिरे तव्यावर भाजून त्याचे सेवन करणे किंवा जेवणात वापरून देखील सेवन करावे. रिकाम्या पोटी जिरे पाणी प्यायल्याने पचन सुधारते.

**धणे पावडर ताजेपणा आणि संतुलन यांचे मिश्रण** : धणे केवळ अन्न हलके आणि सुगंधित करत नाही तर त्यात अँटीऑक्सिडंट्स देखील असतात. ते रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास मदत करते. पोळ्या, भाज्या आणि ग्रेव्हीमध्ये धणे पावडर वापरल्याने चव आणि आरोग्य दोन्ही वाढते.

**हिंग आणि ओवा पोटाचे रक्षण करते** : गॅस, ॲसिडिटी, अपचन यासारख्या पोटाच्या समस्यांसाठी हिंग आणि ओव्याचा वापर फार पूर्वीपासून केला जात आहे. हिंगमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात आणि ओव्यामधील थायमॉल तेल पोटातील अतिरिक्त गॅस काढून टाकण्यास मदत करते.

**आले आणि दालचिनी रोगांचे प्रतिबंधक**

आले पचनसंस्था मजबूत करते आणि पोटफुगीपासून आराम देते. पचन सुधारण्यासाठी आणि रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी दालचिनी प्रभावी मानली जाते.

**लवंग आणि काळी मिरी** : लवंग आणि काळी मिरी हे केवळ अन्नाची चव वाढवण्यासाठीच नाही तर रक्ताभिसरण सुधारण्यासाठी देखील वापरले जातात. थोड्या प्रमाणात लवंग आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तर काळी मिरीमध्ये पचन सुधारण्याची शक्ती असते. भारतीय स्वयंपाकघरातील हे मसाले केवळ चव वाढवतातच असे नाही तर आपले आरोग्य, पचन, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात.

दररोज हळदीचे दूध, स्वयंपाकात जिरे किंवा धणे वापरणे, हिंग आणि ओव्याचे सेवन करणे यासारखे छोटे बदल तुमचे आरोग्य अनेक पद्टीने सुधारू शकतात.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### शेतकरी कर्जमाफीसाठीच निधी नाही का?

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जावी, अशी मागणी शेतकऱ्यांच्या विविध संघटनांसह विरोधी पक्षातील आमदार सातत्याने करीत असताना महायुती सरकार अद्यापही घोषणा करीत नाही.

विदर्भासह राज्याच्या सर्वच भागातील शेतकरी कमालीचे अडचणीत आले आहेत. आता तर अतिवृष्टीने शेतात पेरलेले पीक नष्ट होत असून, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. त्यातही कर्जाचा डोंगर आहे तो आहेच. अशा स्थितीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री आणि महायुतीचे नेते सांगतात की योग्य वेळी कर्जमाफी करू. ही योग्य वेळ म्हणजे कोणती? निवडणुकीची संधी साधून कर्जमाफी दिली जाणार आहे का? म्हणजे सगळा खेळ हा मते मिळविण्यासाठी आणि सत्तेसाठी चालला आहे तर.

राज्यातील आमदारांचे पगार, भत्ते, फुकट प्रवास, मुंबईत राहण्याची व्यवस्था, दौरे आणि अन्य अनुषांगिक बाबीवर कोट्यवधीचा खर्च करण्यासाठी सरकारकडे निधी आहे. लाडक्या बहिणीसाठी निधी आहे. परंतु, या अन्नदात्यासाठी सरकारकडे निधीची उणिव भासते, हे सर्व संतापजनक आहे. सरकारने शेतकऱ्यांना प्राधान्याने कर्जमाफी द्यायला हवी.

■ **पुंडलीक ठाकरे, वर्धा.**

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### लय झालं..!

**ये रे ये रे पावसा<br>
तुला देतो पैसा<br>
असं न म्हणताही<br>
तू आलास कसा?**

**तांडवनृत्य करूनी<br>
कां घातले थैमान<br>
भुईसपाट झाला ना<br>
जगाचा पोशिंदा किसान ..**

**जीवनदाता ऐसी<br>
तुझी जगी किर्ती<br>
निष्ठूरतेने पुराचे<br>
बळी घेशील किती?**

**पावसा रे पावसा<br>
तु लई थकलास<br>
आता विश्रांती घे<br>
एक महिना झकास ..**

# अतिवृष्टीचा इशारा! यंत्रणांना सतर्कतेचे आदेश

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**



राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने परिस्थिती धोक्याची बनली आहे. भारतीय हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिल्यानंतर आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन आज मंत्रालयातील आपत्कालीन नियंत्रण कक्षात दाखल झाले आणि थेट संपूर्ण राज्याच्या परिस्थितीचा आढावा घेतला.

मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्याशी त्यांनी थेट संवाद साधत शहरातील पावसाचे चित्र जाणून घेतले. नांदेड आणि रायगड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांशी संपर्क करून तिथल्या स्थितीची माहिती घेतली आणि "प्रत्येक यंत्रणेने सज्ज राहावे, निष्काळजीपणा अजिबात चालणार नाही," असा स्पष्ट इशारा दिला.

महाजन यांनी स्पष्ट केले की, "आपत्तीजन्य परिस्थिती उद्भवली तर त्वरित मदत पोहोचली पाहिजे, नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले पाहिजे आणि बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू झाले पाहिजे."

त्यांनी विभागाला नागरिकांना वेळेवर सतर्कतेचे संदेश पाठवण्याचे, नद्यांची पाणी पातळी लक्षपूर्वक तपासण्याचे आणि स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून "एकही जीव धोक्यात येऊ नये" यासाठी सर्व उपाय तत्काळ करण्याचे आदेश दिले.

या बैठकीत मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव सोनिया सेठी आणि आपत्कालीन कार्य केंद्राचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण यांनी अतिवृष्टीच्या परिस्थितीबाबत मंत्री महाजन यांना सविस्तर माहिती दिली.

# राज्यात 12 ते 14 लाख एकरवरील पीके बाधीत
# मुख्यमंत्री म्हणाले राहुल गांधी सिरियल लायर

**मुंबई, दि. १९ : प्रतिनिधी**

मुंबईसह राज्यातील अनेक भागात जोरदार पाऊस झाला आहे. मुंबईत तर काही ठिकाणी ३०० मिमी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. राज्यात मोठया प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीमुळे गेल्या तीन चार दिवसांत जवळपास १२ ते १४ लाख एकर जमिनीवरील पीके बाधित झाली आहेत. नांदेड जिल्हयात ढगफुटी सदृष परिस्थितीमुळे ८ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्य सरकार सर्व परिस्थितीवर नजर ठेवून आहे. जिल्हाधिका-यांना व्यक्तींचे मृत्यू,घरे-जनावरांच्या नुकसानीची तात्काळ नुकसानभरपाई देण्यास सांगण्यात आले आहे. तर पीकांच्या पंचनाम्यांचे निर्देश देण्यात आले आहेत. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पटटयामुळे काही भागात अजूनही रेड अॅलर्ट असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबईत स्वत: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रस्त्यावर उतरून परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचेही ते म्हणाले.

मुंबई तसेच राज्यातील अनेक भागांना पावसाने झोडपले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वत: राज्यातील संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. राज्यमंत्रिमंडळ बैठकीनंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना परिस्थितीची माहिती दिली. मुंबईत काही भागात ३०० मिमीपेक्षा जास्त पाऊस झाल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, काही ठिकाणी पाणी साचले होते पण त्याचा निचरा करण्यात आला. मुंबईतील लोकल सेवा धीम्या गतीने का होईना पण सुरू आहे. शासकीय-खासगी कार्यालयांना सुटटी दिली आहे. जिथे शक्य आहे तिथे वर्क फ्रॉम होम करण्यास सांगण्यात आले आहे. राज्यात एनडीआरएफ एसडीआरएफ अॅलर्टवर आहेत. धरणांच्या विसर्गाबाबत शेजारील राज्ये सहयोग करत आहेत. जास्त चिंता हिप्परगीची आहे पण तिथे विसर्ग सुरू केलाय. विसर्ग आणखीन जास्त करावा यासाठी संपर्क सुरू असून तेलंगणासोबतही संपर्क असल्याचे ते म्हणाले.



### मिठी नदीच्या सुरस कथा

मिठी नदी धोका पातळीवर गेल्याने ४०० ते ५०० लोकांना तात्पुरत्या निवा-यात हलविले आहे. मागच्या काळात मिठी नदीत कसे घोटाळे झाले याच्या सुरस कथा येत आहेत. गाळ काढण्याच्या नावावर काय झाले हे पुढे आले आहे. आता नव्याने ही कामे पालिका करत आहे असेही फडणवीस म्हणाले.

### राहुल गांधी सिरियल लायर

सीएसडीएसच्या आकडेवारीवर आकांडतांडव करत राहुल गांधी यांनी आरोप केले होते. आमच्या सरकारला आरोपीच्या पिंज-यात उभे केले. मात्र आता सीएसडीएसनेच टवीट करत ही आकडेवारी चुकीची असल्याचे सांगत माफी मागितली आहे. पण राहुल गांधी यांच्याकडून माफीची अपेक्षाच ठेवता येत नाही. एखादा सिरियल किलर असतो त्याप्रमाणे राहुल गांधी हे सिरियल लायर आहेत. ते पुन्हा तेच आकडे घेउन फिरतील. पण जनतेसमोर सत्य आले आहे. उपराष्ट्रपतीपदासाठी युपीएने उमेदवार दिला नसता तर चांगले चित्र लोकांसमोर गेले असते असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### चाकरमान्यांसाठी कोकणरेल्वेच्या फे-यांत वाढ

गणेशोत्सवासाठी मोठया प्रमाणात मुंबईहून चाकरमानी कोकणात जात असतात. आम्ही केंद्रिय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना रेल्वेच्या फे-या वाढविण्याची विनंती केली होती. त्यानुसार यावर्षी ३६७ फे-या असणार आहेत. मागच्या वर्षीपेक्षा ही संख्या जास्त असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# अवयवदान केलेल्या दात्यांच्या नातेवाईकांचा सन्मान

**वसई, दि. १९ : प्रतिनिधी**



अंगदान जीवन संजीवनी अभियाना अंतर्गत देहदान, अवयवदान केलेल्या ३३ दात्यांच्या नातेवाईकांचा महापालिकेच्यावतीने सन्मान करण्यात आला. महापालिका मुख्यालयात आयोजित सोहळयात आमदार राजन नाईक, अवयवदान चळवळीचे प्रणेते पुरुषोत्तम पवार, अतिरिक्त आयुक्त दीपक सावंत, उपायुक्त प्रशांत जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी, डॉ. अनिरुद्ध भेले, डॉ. स्मिता वाघमारे, डॉ. राजेश चौहान यावेळी उपस्थित होते.

यासोहळयात पालिकेमार्फत अवयवदान केलेल्या ३३ दात्यांच्या नातेवाईकांचा सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आमदार राजन नाईक यांनी यांनी अवयवदान केलेल्या दात्यांच्या कुटुंबीयांचे आभार मानून शहरातील नागरीकांना अवयवदान करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. पुरुषोत्म पवार यांनी अवयवदानाच्या कामाचे स्वरूप, कामात येणारे अडचणी तसेच काम करताना येणारे अनुभव याची माहिती दिली.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी सदर कार्यक्रमात अवयवदानाबाबतचे महत्व व कोणकोणते अवयव दान करता येते याबाबत विस्तृत माहिती दिली. अतिरिक्त आयुक्त दिपक सावंत यांनी महापालिकेमार्फत घेण्यात येणाऱ्या जनजागृती कार्यक्रमाबाबत माहिती दिली. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जनजागृती करणे, शाळा आणि महाविद्यालयामध्ये चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे, विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करणे, अवयवदान जनजागृती करिता रॅली काढणे इ. बाबींचा समावेश होत असल्याबाबत माहिती त्यांनी दिली.

उपायुक्त (वैद्यकीय) प्रशांत जाधव, यांनी मान्यवर आणि अवयवदान केलेल्या दात्यांच्या नातेवाईकांचे आभार मानले. सहाय्यक आयुक्त विश्वनाथ तळेकर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

# सायबर गुन्ह्यातील रक्कम परत करण्यात यश

**वसई, दि. १९ : प्रतिनिधी**

भाईंदरमधील तक्रारदाराला बँकेतून बोलत असल्याचे बतावणी डेबिट कार्डाची माहिती घेऊन ओटीपीच्या माध्यमातून ३ लाख २३ हजार रुपयांची रक्कम सायबर चोरांनी लुटली होती. तर दुसऱ्या एका घटनेत विरारमधील तक्रारदाराला बँकेतून बोलत असल्याची बतावणी करत केवायसी करण्याचे सांगत सर्व माहिती घेऊन त्यांच्या बँक खात्यातून १ लाख ६० हजार रुपये लंपास केले होते. यादोन्ही गुन्ह्यात सायबर पोलिसांनी कारवाई करत संपूर्ण रक्कम परत मिळवण्याची कामगिरी केली आहे.

भाईंदरमध्ये राहणाऱ्या तक्रारदाराला बँकेतून बोलत असल्याची बतावणी करून सायबर चोरट्याने डेबिट कार्डाची माहिती घेतली. तसेच ओटीपी मागून तक्रारदाराच्या खात्यातील ३ लाख २३ हजार रुपये लंपास केले होते. तर दुसऱ्या घटनेत विरारमधील तक्रारदाराला बँकेतून बोलत असल्याची बतावणी करून एका इसमाने बँक अपची लिंक पाठवली. त्यालिंकवर केवायसी करण्याचे सांगितल्याने तक्रारदाराने सर्व माहिती भरल्यानंतर सायबर चोरट्याने त्यांच्या बँक खात्यातील १ लाख ६० हजार रुपयांची रक्कम लंपास केली होती.

यादोन्ही प्रकरणांची तक्रार प्राप्त होताच सायबर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी ऑनलाईन एनसीसीआरपीवर तक्रार नोंदवली. त्यामुळे तक्रारदारांची फसवणुक झालेली रक्कम संशयित बँक खात्यात गोठवण्यात यश मिळाले. त्यानंतर तक्रारदारामार्फत न्यायालयात याचिका दाखल करून फसवणुक झालेली रक्कम तक्रारदारांना परत मिळवून देण्याची कामगिरी केली.

पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील वाव्हळ, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद शेनोळकर वैभव धनवडे, पोलीस हवालदार माधुरी धिंडे, सुवर्णा माळी, राहुल बन, स्नेहल पुणे, कुणाल सावळे, विलास खाटीक यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# अंमली पदार्थविरोधी जनजागृतीसाठी विविध उपक्रम

**तलासरी, दि. १९ : प्रतिनिधी**



अंमली पदार्थ विरोधी अभियानाच्या अनुषंगाने तलासरी पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदारांनी जनजागृतीचा व्यापक उपक्रम राबवला. त्यात निबंध स्पर्धा आणि इतर माध्यमाचा वापर पोलिसांकडून करण्यात आला. तलासरी पोलिसांकडून सोशल मीडियाच्या माध्यमातून तसेच प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी माहिती देण्यात आली. सोशल मीडियाद्वारे जनजागृतीसाठी विशेष पोस्टर, स्टिकर्स आणि बॅनर्स तयार करून पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व गावांच्या व्हॉट्सअप जनसंवाद गटांवर प्रसारित करण्यात आले. तसेच फेसबुक, इन्स्टाग्राम यांसारख्या सोशल प्लॅटफॉर्मवरही जनजागृतीची मोहीम राबवण्यात आली. याच मोहिमेचा एक भाग म्हणून पोलीस स्टेशन हद्दीतील ज्ञानमाता शासकीय आश्रम शाळा, झरी, शासकीय कन्या आश्रम शाळा, वरवाड आणि माध्यमिक विद्यालय, तलासरी या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी "अंमली पदार्थांचे दुष्परिणाम" या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण 450 विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग नोंदवला. तिन्ही शाळांमधून प्रत्येकी पहिल्या तीन क्रमांकांसह तीन उत्तेजनार्थ क्रमांक काढण्यात आले. आगामी काळात संबंधित शाळांमध्ये विशेष कार्यक्रम घेऊन विजेत्यांना बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. या उपक्रमासाठी शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षकवर्ग यांनी सहकार्य केले. ही जनजागृती मोहीम सुरु राहणार असून दररोज विविध उपक्रम राबवून अंमली पदार्थांविरोधात जागरूकता निर्माण केली जाणार आहे. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पोलीस अधीक्षकयतिश देशमुख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अंकिता कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अजय गोरड यांच्यासह तलासरी पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार मेहनत घेत आहेत.

## आज का अंदाज

**बुधवार २० ऑगस्ट २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ८ | ४ | ७ | ८ | ९ |
| २४५ | १४९ | २४९ | २८८ | १६७ | १६० | १३४ | १८० |
| ५६० | २४८ | ४५६ | ४४० | ५९० | २५० | ३५० | ३७९ |
| ३८० | ३५६ | ३३९ | ५५८ | ६८० | ३४० | ५६७ | २७० |
| १२ | ४२ | ५३ | ८३ | ४२ | ७१ | ८३ | ९३ |
| १६ | ४६ | ५७ | ८७ | ४९ | ७० | ८६ | ९६ |
| १० | ४० | ५९ | ८९ | ४१ | ७२ | ८५ | ९५ |

**१९ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ६१ | ९८ | ०८ |
| ३२ | ६२ | ९७ | ०७ |
| ३६ | ६५ | ९४ | ०४ |
| ४९० | ३६७ | १२६ | २३५ |
| ५८० | २६८ | २८९ | ४७९ |
| ६७० | १६९ | ४७८ | ३८९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**

## आम्ही तुमची कहाणी फक्त ऐकणार नाही, तर समजूनही घेऊ

**मुंबई, १९ ऑगस्ट :** प्रत्येक घरात एक कहाणी असते काही साजऱ्या केल्या जातात तर काही अनेकदा ऐकल्याही जात नाहीत. आपल्या नवीन आपका अपना झी या ओळखीसह झी टीव्ही सादर करत आहे कहानी हर घर की एक मन हेलावून टाकणारा नॉन-फिक्शन फॉरमॅट, जो भारतीय महिलांना त्यांच्या अनेकदा न बोलल्या गेलेल्या सत्यांना व्यक्त करण्यासाठी सुरक्षित, आधार देणारी जागा देतो. भावनिक दुर्लक्ष, सामाजिक दबाव, वैवाहिक आव्हाने किंवा करिअरमधील तडजोड या सर्वांवर प्रामाणिक आणि निःपक्षपाती संवादाचे दार उघडते. प्रत्येक भागात एका शक्तिशाली वास्तविक कहाणीला तज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि सेलिब्रिटी पाहुण्यांच्या दृष्टिकोनाची जोड दिली जाईल. आपल्याला आठवण करून दिली जाईल की काही कहाण्या फक्त सांगण्यासाठीच नव्हे, तर खऱ्या अर्थाने ऐकल्या जाण्यासाठीही पात्र असतात. करुणेने भरलेल्या उपक्रमाच्या माध्यमातून या कार्यक्रमाने टोल-फ्री क्रमांक १८००१२१२६७१ सुरू केला आहे, ज्यावर कोणीही निर्भयपणे आणि निःपक्षपातीपणे आपली समस्या सांगू शकतो. या कॉलच्या दुसऱ्या बाजूस यंत्र नसेल, तर एक खरी व्यक्ती असेल जी संयम, ऊब आणि सहानुभूतीने ऐकेल, आणि कदाचित आयुष्यात पहिल्यांदाच मनापासून ऐकले गेल्याची दिलासा देणारी भावना देईल. कॉल करणारे आपले मन मोकळे करून फक्त खासगीपणे बोलणे निवडू शकतात किंवा राष्ट्रीय दूरदर्शनवर आपली कथा मांडण्यासाठी नोंदणी करू शकतात. हा साधा पण अर्थपूर्ण टप्पा प्रत्येक आवाजाला तो कितीही दबलेला असो ऐकले जाण्याची जागा, सन्मान आणि धैर्य प्रदान करतो. जूही परमार म्हणाल्या, कहानी हर घर कीसोबत आम्हांला फक्त एक शो बनवायचा नव्हता, तर एक असे सुरक्षित स्थान निर्माण करायचे होते जिथे खरंच ऐकून घेतले जाते. टोल-फ्री नंबर हा तुमच्यासाठी पहिले पाऊल उचलण्याची संधी आहे. जेव्हा कोणी कॉल करतो, तेव्हा त्यांना यंत्र नव्हे तर एका खऱ्या व्यक्तीचा आवाज ऐकायला मिळतो, कारण प्रत्येक आम्हांला ऊब, संयमासह समजून घेणे आवश्यक असते.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्ही आर्थिकदृष्ट्या मजबूत राहतील, तुमचे जुने कर्ज फेडले जाईल. त्यामुळे उत्पन्नाचे नवीन मार्ग सापडतील. तुम्ही तुमच्या ध्येयावर लक्ष केंद्रित कराल. तुमच्या कुटुंबाचा तुम्हाला पूर्ण पाठिंबा मिळेल.

**वृषभ :** विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळू शकते. अविवाहित लोकांसाठी नवीन रिलेशनशिपची सुरुवात होऊ शकते. जोडीदाराचा पूर्ण पाठिंबा मिळेल. जोडीदाराकडून एक गोड सरप्राईज मिळू शकते.

**मिथुन :** आज जुन्या गुंतवणुकीतून चांगला परतावा मिळेल. करिअरमध्ये प्रगती करण्यासाठी नवीन संधी शोधा. तुमच्या लहान भावंडांना यश मिळाल्याने कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

**कर्क :** मकर राशीच्या लोकांना आज करिअरमध्ये यश येईल. प्रेम, करिअर आणि आर्थिक बाबतीत तुमचे नशीब तुमच्या बाजूने असेल. कौटुंबिक जीवन शांत आणि आनंदी राहील.

**सिंह :** आयुष्यात काही महत्त्वाचे बदल होतील. वरिष्ठ अधिकाजयांच्या सल्ल्याने तुम्ही कामातील अडचणींवर मात कराल. नोकरी आणि व्यवसायात चांगली प्रगती होईल. कुटुंबाचा पाठिंबा मिळेल.

**कन्या :** मालमत्तेशी संबंधित वाद संपुष्टात येतील. आरोग्य चांगले ठेवण्यासाठी रोज योगा आणि ध्यान करा. पौष्टिक आहार घेतल्यास शारीरिक ऊर्जा टिकून राहील. तुमचे वैवाहिक जीवन आनंदी राहील.

**तुळ :** शैक्षणिक कामांमध्ये तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे तुमचे प्रेमसंबंध अधिक चांगले होतील. काही लोक नवीन गाडी किंवा घर खरेदी करण्याचा विचार करतील.

**वृश्चिक :** आजचा दिवस चांगला आणि वाईट असा दोन्ही असेल. तुम्ही केलेल्या मेहनतीचे चांगले परिणाम मिळतील. कुटुंबातील जबाबदाजया वाढतील. तुम्हाला वडिलोपार्जित संपत्तीतून लाभ मिळू शकतो.


**धनु :** जर तुम्ही एखाद्या रिलेशनशिपमध्ये असाल, तर तिसजया व्यक्तीला तुमच्यामध्ये येऊ देऊ नका, यामुळे नात्यात दुरावा निर्माण होऊ शकतो. आरोग्य चांगले राहील, पण तरीही स्वत:ची काळजी घ्या.

**मकर :** आज नवीन लोकांशी संपर्क साधण्याची संधी मिळेल. यामुळे भविष्यात तुम्हाला फायदा होईल. कौटुंबिक जीवनात आनंद टिकून राहील. पैशाची बचत कराल. प्रवास करण्याची संधी मिळेल.

**कुंभ :** आज कामाचा ताण जास्त असेल. ऑफिसमध्ये तुम्ही खूप व्यस्त राहाल. त्यामुळे तुमच्या आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. कुटुंबासोबत वेळ घालवा, यामुळे तुमचा तणाव कमी होईल.

**मीन :** आज तुमच्या आरोग्याची काळजी घ्या. आज तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. समाजात तुमचा मान-सन्मान वाढेल. कुटुंबासोबत सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी तुम्ही बाहेर जाऊ शकता.

## शब्दकोडे क्रमांक २१९६



**आडवे शब्द :-**
१) सूर्यास्ताची वेळ
५) अजाण
९) भट्टी
११) एकाद्या अवयावास मुंग्या येणे
१२) पहेलवान
१३) दुर्बळ, असमर्थ
१५) त्रास, कष्ट,
१६) बंदी, मज्जाव
१७) इमारतीचा मूळ आधार
१८) फळांचा राजा
१९) हत्ती
२१) कमळाचे तळे
२३) श्वशुर
२४) एक अधिक एक चतुर्थांश
२६) दरी
२७) लक्ष्मीचे एक नाव
२८) मडके
२९) अंगावर अजिबात वस्त्र नसलेला
३२) बसण्याची लाकडी फळी
३३) पहेलवानांचा गुरू
३५) एक बारीक धान्य
३६) आभाळ
३७) गीत
३८) दोरखंड
३९) केर
४१) अथवा, किंवा
४२) वर्तुळ
४४) ह्या वर्षी
४५) सरळ लांब वासा
४७) पाचोळा, कचरा
४९) वर वधूची मिरवणूक
५१) नूतन
५३) चामड्याच्या वस्तू तयार करणारा
५५) मध्यस्थ
५६) पायाची उभी नळी
५८) पावसाची झड
५९) विजयादशमी
६०) मान्यतेचा शब्द
६१) वस्तू तयार करण्याची जागा
६३) युद्ध
६४) सुरुवात
६५) क्षमा
६६) प्रजा,
६७) धमनी
६८) फुरसत
६९) रजनी
७१) पर्यंत
७३) सख्खा भाऊ
७४) पोपट
७६) छोटा दरवाजा
७७) पतन
७८) दरोडा
७९) लिहिता वाचता येणारा

**उभे शब्द :-**
१) वनवास
२) च्या साठी
३) मारझोड
४) आश्चर्य
६) फार मोठे प्रास्ताविक
७) किरात
८) वृषभ
९) वजन
१०) युद्धासाठी उतावीळ झालेला
१३) व्यर्थ
१४) हाती घेतलेले काम पूर्णत्वास नेणे
१६) माझा
१७) झाडाभोवतीचा कट्टा
२०) पाठविलेला
२२) खटका, वेदनेची तिडीक
२३) ** दाम दंड भेद
२५) पराभव
२७) कारस्थान
२८) कदर करणारा
३०) मोगऱ्याची माळ
३१) ढग, दाट
३२) पदर
३४) द्वेष
३७) कुरण
४०) सजीव निर्जीव सर्व भाग
४३) बारीक केस
४६) ठेकेदार
४८) अत्यंत श्रीमंत माणसास गरीबी येणे
५०) तात्काळ
५२) इच्छा
५४) प्रज्वलित, तापलेले
५७) मगज, खोबरे
५८) एकरूपता, तादाम्य पावणे
६२) खाजणारा
६३) सदोदित
६५) भ्रम, जादू
६८) रंग बदलणारा प्राणी
७०) सिद्ध
७२) खून
७३) खुंट, आंचळ
७५) पृथ्वी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# विद्युत वाहिनीसाठी चांदवड लासलगाव महामार्गावरील वृक्षांची होणार कत्तल?

## चांदवड-मनमाड महामार्ग पाठोपाठ विंचूर प्रकाशा महामार्गही होणार उजाड

**विजय काळे यांजकडून**

**रेडगांव खुर्द ।** चांदवड लासलगाव (विंचूर प्रकाशा महामार्ग) महामार्गावर सोलर ऊर्जा विद्युत वाहिनीसाठी महामार्ग लगतच्या महाकाय वृक्षांची कत्तल होणार आहे, असे प्रथमदर्शनी दिसत आहे. या महामार्गलगतच्या झाडांच्या रेषेतच विद्युत पोल उभे केले आहे. म्हणजेच झाडांची कत्तल होणार हे जवळपास निश्चित आहे. मात्र संबंधित सर्व विभागांनी जबाबदारी एकमेकांकडे ढकलल्याने शासन एकीकडे पर्यावरण वाचवा यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असताना उघड्या डोळ्यांदेखत झाडे तोडली जाणार असेल तर यास जबाबदार कोण? असा प्रश्न तयार झाला आहे.

चांदवड तालुक्यातील गणुर येथे आवादा कंपनीने सोलर प्लांट टाकला आहे. येथून वीज निर्मिती झाल्यावर आवादा कंपनी महावितरणला वीज विक्री करणार असून या बदल्यात महावितरण आवादा कंपनीला पैसे देईल. गणुर येथील सौर वीज चांदवड येथील विद्युत केंद्रात पोहोचविण्यासाठी चांदवड निमगव्हाण दरम्यान झाडांच्या रेषेत पोल उभे केले आहे. अजून विद्युत तारा ओढणे बाकी आहे. जेव्हा तारा ओढल्या जातील तेव्हा सर्व झाडे तोडावीच लागणार आहे. सध्या अनेक ठिकाणी विद्युत वाहिनीचे काम चालू आहे. परंतु शेतकरी शेतांमध्ये पोल उभे करण्यास प्रतिबंध करीत असल्याने रोडच्या कडेला पोल उभे करावे लागतात, असे महावितरणचे म्हणणे आहे. झाडे वाचविण्यासाठी प्लास्टिक कोटिंग तार किंवा भूमिगत वीजवाहिनी किंवा इतर पर्यायांचाही विचार व्हावा, परंतु झाडे तोडली जाऊ नयेत. नवीन झाडे लावली जात नाही, किमान असलेली झाडे तरी तोडू नये असे पर्यावरण प्रेमींचे म्हणणे आहे. आवादा कंपनी मालामाल होणार आणि परिसर उजाड करून जाणार, झाडांवरच्या पशुपक्ष्यांचे घरटेही नष्ट होणार, यांच्या संवर्धनाची जबाबदारी कोण घेणार? विकासाच्या नावाखाली मानवी हित साध्य होणार नसेल तर तो विकास न झालेला बरा, असे महात्मा गांधी म्हणाले होते.

> झाडे वाचविण्यासाठी कोटिंग तार वापरावी अशा सूचना कंपनीला करू
> **- केशव काळूमाळी- कार्यकारी अभियंता, महावितरण चांदवड विभाग**

> सदर कामावर महावितरण फक्त देखरेख करते. याबाबतच्या सर्व परवानगी अटी शर्ती आवादा कंपनीने बघायच्या आहेत'. **- तुषार सूर्यवंशी, सहाय्यक अभियंता, महावितरण चांदवड**

> रस्त्याच्या मध्यभागापासून नऊ मीटर अंतराच्या आत विद्युत पोल उभा करण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी नाही. तेवढे अंतर सोडून पोल उभे असतील तर आमचा काही संबंध नाही.
> **- दत्तात्रय शिरोडे, सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग चांदवड**

> रस्त्याच्या कडेची झाडे तोडण्यासाठी आमच्याकडे तसा कोणीही अद्याप प्रस्ताव दाखल केलेला नाही. आल्यानंतर विचार करू.
> **- विशाल कुटे, वनपरिक्षेत्र अधिकारी चांदवड**



## महत्त्वाचे

### नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनतर्फे स्वातंत्र्य दिन

**नाशिक ।** नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन दिमाखात व उत्साहात साजरा करण्यात आला. देशभक्तीचे सूर, तिरंग्याचा मान व



विद्यार्थ्यांचा सन्मान यामुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले. ध्वजारोहणाचा मान पंचवटी कॉलेजचे प्राचार्य प्रा. आशिष चौरसिया आणि फ्लाईट लेफ्टनंट पंकज जांगडा यांच्या हस्ते पार पडला. ध्वजवंदनानंतर उपस्थितांनी राष्ट्रगीताच्या जयघोषात भारतमातेप्रती निष्ठा व्यक्त केली. कार्यक्रमाला असोसिएशनचे अध्यक्ष पी. एम. सैनी, चेअरमन राजेंद्र (नाना) फड, शंकर धनवडे, बजरंग शर्मा तसेच असोसिएशनचे सर्व सल्लागार, पदाधिकारी, सदस्य आणि शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून तरुण पिढीने देशसेवा व समाजकार्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले. स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमामुळे मुलांमध्ये देशभक्तीची प्रेरणा निर्माण झाली. यावेळी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांत विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, घोषवाक्ये आणि लघुनाटिका सादर करून वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर धनवडे व बजरंग शर्मा यांनी आकर्षक पद्धतीने केले. शेवटी उपस्थितांनी "भारत माता की जय" आणि "वंदे मातरम" च्या घोषात कार्यक्रमाची सांगता केली.

### स्वातंत्र्यदिनी वस्तू व सेवा कर कार्यालयात वृक्षारोपण

**नाशिक ।** पाथर्डी फाटा ,प्रशांत नगर नाशिक येथील वस्तू व सेवा कर कार्यालयात स्वातंत्र्य




दिनानिमित्त अपर राज्य कर आयुक्त नाशिक क्षेत्र, स्वाती काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यालयातील माजी सैनिकांनी संचालन केले. याप्रसंगी कार्यालयाच्या आवारात श्रीमती काळे ,राज्यकर सहआयुक्त जितेंद्र पाटील व अविनाश भामरे पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी सर्व राज्यकर उपायुक्त व सहायक राज्य कर सहाय्यक आयुक्त, अधिकारी, निरीक्षक व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### वीज देयक भरण्यासाठी महावितरणकडून तगादा

**नाशिक ।** गेल्या काही वर्षांपासून वीज देयक वसुलीसाठी वायरमनकडून ग्राहकांना वारंवार फोन करून बिल भरणा करण्यासाठी तगादा लावण्यात येत आहे. ४५ दिवसांपेक्षा अधिक काळ वीज देयक थकले असेल, तर वीज पुरवठा खंडित केला जाईल असे सांगण्यात येते. तर काही ठिकाणी प्रत्यक्ष कारवाई देखील होत आहे. याबाबत येणाऱ्या वारंवार फोन कॉल्समुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले असून वीज कनेक्शन संदर्भात तक्रारी केली असता त्याची त्वरित दखल घेतली जात नाही. मात्र, वीज देयक भरण्यासाठी घरोघरी वायरमन फिरत असल्याचे दिसून येत आहे. ही वसुली केवळ सर्वसामान्य नागरिकांची की सरसकट सर्वांची होते हे पाहणे महत्त्वाचे आहे.

### संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानात व्यापक समाज हिताचा विचार : डॉ. ढगे

**निफाड ।** संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरीपाठाचे अभंग, विराण्या, गौळणी असे विपुल लेखन केले. ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तिमार्ग, सर्वसामान्यांना कळावेत म्हणून त्यांनी संस्कृत ऐवजी मराठी प्राकृतमध्ये लेखन केले. समाजाला सोपा भक्ती



मार्ग दाखवून दिला. त्यांनी रचलेल्या पसायदानात व्यापक समाज हित दडलेले आहे. त्यांनी पसायदानात सर्वांच्या सुखाची मागणी केली आहे. विश्वबंधुत्व, मैत्रीभाव, चराचर सृष्टीचा विचार केला आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय निफाड येथे संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या सातशे पन्नासव्या जयंतीनिमित्त आयोजित 'पसायदान' कार्यक्रमात ते बोलत होते. हा कार्यक्रम महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई यांच्या परिपत्रकाप्रमाणे आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. प्रवीण ढेपले, अभय वडघुले, प्रा. योगेश कडलग, संजय गायकवाड आदी उपस्थित होते.

## ग्रामपंचायतकडून वैकुंठ रथाचे लोकार्पण



**वावी ।** तालुक्यातील वावी येथील ग्रामपंचायतच्या वतीने वैकुंठ रथाचे लोकार्पण करण्यात आले वावी गावची गरज ओळखून येथील सरपंच विजय काटे व सर्व सदस्य यांनी गावची गरज ओळखून अंत्यविधीसाठी स्मशानभूमीचे अंतर जास्त असल्याने गावासाठी वैकुंठ रथ देऊ केला. १५ ऑगस्ट अर्थात स्वतंत्रता दिनाच्या दिवशी ह भ प जगन्नाथ शिंदे गुरुजी यांच्या हस्ते या रथाचे लोकार्पण करण्यात आले.

आतापर्यंत वावीकरांना अंत्यविधी-साठी जनसेवा मित्र मंडळ किंवा सरस्वती फाउंडेशन सिन्नर यांच्या वैकुंठ रथाची मदत वावीकरांना घ्यावी लागत होती मात्र हीच गरज ओळखून सरपंच काटे यांनी ट्रॅक्टरच्या ट्रॉली वरती वैकुंठ रथाची आखणी केली जेणेकरून ज्या घरी दुर्घटना होईल अशा संबंधित कुटुंबाने ट्रॅक्टर आणून वैकुंठ रथ घेऊन जाण्याची घोषणा करण्यात आली त्यानंतर दशक्रिया विधीच्या आत संबंधित मयताचा मृत्यूचा दाखला दशक्रिया विधीच्या दिवशी उपस्थित प्रवचनकार यांच्या हस्ते वितरित करण्यात येईल तसेच गावात कोणी व्यक्ती मृत झाल्यास त्या कुटुंबांना अंत्यविधीसाठी लागणारे लाकूडाचा खर्च ग्रामपंचायत उचलणार असल्याची माहिती सरपंच विजय काटे यांनी दिली.यावेळी या कार्यक्रमाप्रसंगी वावी गावचे उपसरपंच प्रेमलता जाजू, मीना मंडलिक, अश्विनी वेलजाळी, मीना काटे. साधना घेगडमल, दिपाली खाटेकर, माजी सरपंच कन्हैयालाल भुतडा, प्रशांत कर्पे, संदीप राजेभोसले, ग्रामपंचायत सदस्य रामराव ताजने, ग्राम विकास अधिकारी अलका खिराडकर आदींसह खरेदी विक्री संघाचे संचालक विठ्ठलराव राजेभोसले, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष रामनाथ कर्पे, आखाडी कमिटीचे अध्यक्ष अशोक ताजने, प्रा. कारभारी वेलजाळी, सर्जेराव वाजे, कैलास जाजू, अर्जुन काटे, सचिन वेलजाळी, सोपान घेगडमल, श्रीनिवास जाजू, दिलीप खाटेकर, कैलास काळोखे, बाळासाहेब गोराणे, विलास सच्चे, नाथा टिकले, प्राचार्य भाऊसाहेब गुंजाळ आदींच्या उपस्थितीत वैकुटे रथाचे लोकार्पण करण्यात आले.

## जिल्हा बँकेच्या सामोपचार कर्ज परतफेड योजनेस विरोध

### चांदवडला विकास सोसायट्यांच्या बैठकीत निर्णय

**रेडगांव खुर्द ।** कर्जदार सभासद कर्जमाफीच्या आश्वासनांवर डोळे लावून बसल्याने गावपातळीवर विविध कार्यकारी सोसायटींकडून शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज भरण्यास शेतकऱ्यांनी टाळाटाळ केल्याने सोसायट्यांसोबतच जिल्हा बँक तोट्यात गेली आहे. बँकेने आता थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी सामोपचार कर्ज परतफेड योजना सुरू केली आहे. मात्र चांदवडला विविध कार्यकारी सोसायटयांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत या योजनेला विरोध करण्यात आला.



ही योजना राबविल्यास विकास सोसायट्या अजून तोट्यात जातील, अशी चर्चा बैठकीत झाली. या योजनेवर चर्चा करण्यासाठी चांदवड येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हा बँकेने ३० जून २०२२ अखेर थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी सामोपचार कर्ज परतफेड योजना सुरू केली आहे. यामध्ये एक लाखापर्यंत दोन टक्के व्याज, एक लाख ते पाच लाखापर्यंत चार टक्के व्याज, पाच ते दहा लाखापर्यंत पाच टक्के व्याज, दहा लाखांपेक्षा अधिक रकमेवर सहा टक्के व्याज. तर मयत सभासदांसाठी एनपीए झालेल्या कर्जाच्या तारखेनंतर होणारे व्याज माफ करण्यात येणार आहे. मात्र योजना शेतकऱ्यांसाठी असली तरी जिल्हा बँकेने सर्व व्याज बँकिंग धोरणानुसार आधीच सोसायट्यांकडून वसूल केलेले आहे. नियमित सभासद जे कर्ज भरतात त्यांच्या व्याजातून जिल्हा बँकेने सोसायटीकडून हे व्याज घेतलेले आहे. त्यामुळे नियमित कर्जदारांना दहा वर्षे झाली तरी कोणताही लाभ देता आलेला नाही. नियमित सभासदांवर मोठा अन्याय झालेला आहे. मात्र बँकेचे या परतफेड योजनेमुळे जिल्हा बँकेच्या वसुली धोरणावर कोणताही परिणाम होणार नाही. मात्र सोसायट्यांच्या तिजोरीत व्याजाच्या रूपाने पैसा येणे अपेक्षित असताना जिल्हा बँकेने व्याज माफीचा निर्णय घेतल्याने सोसायट्या थोडेफार अजून तग धरून आहे. त्या या निर्णयामुळे रसातळाला जाऊन सहकार संपुष्टात येईल अशी भीती सोसायटी संचालकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे सोसायट्यांचे म्हणणे असे आहे की जिल्हा बँकेला सामोपचार योजना राबवायचीच असेल तर जिल्हा बँकेने सोसायटींकडून घेतलेले व्याज परत करावे .किंवा योजनेतून येणारी संपूर्ण रक्कम संस्थांना देण्याबाबत लेखी हमी बँकेने संस्थांना द्यावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. यामध्ये जे सभासद कायमस्वरूपी नियमित कर्ज भरतात त्यांना दहा वर्षापासून कुठलाही लाभ देता आला नाही. त्यामुळे नियमित कर्जदार शेतकऱ्यांचे यामुळे मोठे नुकसान होणार आहे, अशीही चर्चा झाली. या बैठकीस माजी आमदार शिरीषकुमार कोतवाल यांनी मार्गदर्शन केले. बैठकीस वडनेरभैरवचे सोसायटी सभापती संपतराव वक्ते यांनी पुढाकार घेतला होता. बैठकीस डॉ. आत्माराम कुंभार्डे, गणेश निंबाळकर यांचेसह तालुक्यातील अनेक गावांचे सभापती उपस्थित होते. धोडांबेचे सभापती नितीन उशीर यांनी आभार मानले.

## मानवी साखळीद्वारे महामार्गावर अंमली पदार्थविरोधी जनजागृती

### वाडीवऱ्हे पोलीसांचा प्रभावी जागर



**बेलगाव कुऱ्हे ।** नाशिक आग्रा महामार्गावरील वाडीवऱ्हे फाटा ते गोंदे फाट्यावर ८०० ते १००० जणांच्या मानवी साखळीद्वारे अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

व्यसनाधीन होत चाललेल्या समाजासाठी नशामुक्त राष्ट्र व नशामुक्त देश असा संदेश देण्यासाठी मानवी साखळी परिणामकारक ठरली. बॅनर, फ्लेक्सद्वारे करण्यात आलेल्या ह्या जनजागृती कार्यक्रमामुळे मोठ्या प्रमाणावर लोकांमध्ये जागर झाल्याचे दिसून आले. वाडीवऱ्हे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांनी पोलीस ठाणे हद्दीतील औद्योगिक क्षेत्राच्या विविध कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधला. त्यानुसार त्यांच्याकडील अधिकारी, कर्मचारी, कामगार, वाडीवऱ्हे पोलीस ठाणे, जिल्हा वाहतुक शाखा, महामार्ग पोलीस अधिकारी, अंमलदार व होमगार्ड यांच्या सहभागाने १००० जणांची मानवी साखळी यशस्वी करून दाखवली. मानवी साखळी यशस्वी केल्याबद्धल पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांनी उपस्थित सर्व कंपनी चालक, मालक, कामगार यांचे आभार मानले. यापुढेही असे समाजोपयोगी कार्यक्रम करण्याचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक रामभाऊ होंडे, पोलीस उपनिरीक्षक रामनाथ दिवे तसेच वाडीवऱ्हे पोलीस ठाणे व जिल्हा वाहतुक शाखा, महामार्ग पोलीस मदत केंद्राकडील अंमलदार, होमगार्ड कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात वाडीवऱ्हे पोलीस ठाणे हद्दीतील विविध कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी, कामगार यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदवला. नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतुन आणि अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी हरीष खेडकर यांच्या मार्गदर्शनाने हा उपक्रम संपन्न झाला.

## सुखी जीवनासाठी हास्य हेच खरे औषध : डॉ. मदन कटारिया

### चांदशी नंदनवन हास्य क्लबचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**नाशिक ।** आज जगभरात नकारात्मक वातावरण आहे.शेअर बाजारही अधून मधून गडगडत असते.परंतु एकच मार्केट असे आहे जे सातत्याने उसळी घेत आहे ते म्हणजे हास्य क्लब. सुखी जीवनासाठी हास्य हेच खरे औषध असून सतत हसत राहा, खुश राहा, असा मौलिक सल्ला हास्य योगाचे जनक डॉ. मदन कटारिया यांनी दिला.

चांदशी येथील नंदनवन हास्य क्लबचा प्रथम वर्धापन दिन अलास्का लॉन्स येथे साजरा झाला त्यावेळी डॉ.मदन कटारिया अध्यक्ष स्थानावरून. बोलत होते. व्यासपीठावर डॉ.माधुरी कटारिया, हृदयाक्ष हॉस्पिटलचे प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ.हिरालाल पवार, डॉ.सुषमा दुगड, सुनील नागरे, नंदनवन हास्य क्लबचे अध्यक्ष शरद मंडलिक, उपाध्यक्ष शंकरराव खरात, कार्याध्यक्ष कमल उगले, सचिव अर्चना टांकसाळे, अलका वामने, कोषाध्यक्ष विनय भुसे, सन्मित्र ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विजय बिरारी, उपाध्यक्ष बी.बी. मोरे, प्रियदर्शन टांकसाळे आदी होते.

आज नाशकात 110 हास्य क्लब आहेत असे सांगितले तर त्यावर कुणी विश्वास ठेवणार नाही.परंतु हे सत्य आहे.याचे खरे श्रेय टीम लीडर आणि अँकर यांना जाते. हास्य योगा असे पॅकेज आहे की त्यात योगा, ध्यान, चालणे, प्राणायाम आदीं सर्वं गोष्टींचा समावेश होतो, याची आठवणही कटारिया यांनी करून दिली.

हास्यामुळे ताण-तणाव कमी होतो.त्याने हृदयसुद्धा मजबूत होते.हास्याचा कोणताही साईड इफेक्ट नाही त्यामुळे स्वतःही हसा आणि समोरच्यालाही हसायला लावा, असे प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. हिरालाल पवार यांनी आपल्या मनोगतात सांगितले.आज समाजासाठी सोशल वर्क विदाऊट नेटवर्क म्हणजे हास्य असेही ते पुढे म्हणाले. आज देशात चार पैकी तीन मृत्यू



हे हृदयरोगामुळे होते.त्यामुळे सुखी जीवन जगायचे असेल तर आपली लाईफस्टाईल बदला.टीव्ही समोर बसून जेवण करणे टाळा, व्यसन टाळा, मीठ, साखर कमी खा, वजन वाढू देऊ नका असा सल्लाही डॉ. हिरालाल पवार यांनी दिला.डॉ. सुषमा दुगड आणि डॉ.माधुरी कटारिया यांनीही हास्याचे महत्त्व पटवून दिले. शरद मंडलिक यांनी प्रास्ताविकात नंदनवन हास्य क्लबची माहिती विशद केली.सध्या क्लबचे 60 हून अधिक सदस्य असून हास्य क्लब जॉईन केल्यामुळे अनेकांच्या व्याधी दूर झाल्या, अनेकांचे वजन घटले याची आठवण त्यांनी करून दिली. किशोर देशमुख आणि जयश्री अहिरे यांनी क्लबमुळे काय फायदे झाले याची माहिती दिली.सूत्रसंचालन अर्चना टांकसाळे तर आभारप्रदर्शन विनय भुसे यांनी केले.सांस्कृतिक कार्यक्रमाच्या वेळी महिलांनी सादर केलेल्या नृत्याच्यावेळी डॉ.मदन कटारिया आणि डॉ.हिरालाल पवार यांनीही त्यात ठेका धरून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. मृदुला वझे यांच्या भारुडानेही सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमास उत्तम मंडलिक, विलास मंडलिक, माधवराव पाटील, आशा मंडलिक, अर्चना मंडलिक, रमेश वझे, नंदकुमार अहिरे, अरुण कोरडे, संभाजी शेवाळे, वैशाली खरोटे, अनुराधा देशपांडे, मीरा पाटील, मंदाकिनी खरात, सुनिता चौगावकर, जयश्री उपळाईकर, शोभा महाजन, विभा भुसे, कलावती राठोड, संगीता भामरे, स्मिता चव्हाण, शांताबाई प्रधान, छायाताई नवले, सुमन वाघ, आदिती आघारकर, पुष्पा घोडेकर, निशा बडोगे, रमा करकेरा, छाया वराडे, डॉ.देवयानी जाधव आदी उपस्थित होते.

# महाभियोग आणणे खरंच शक्य आहे का?

सध्या देशात लोकसभेचे विरोधी पक्ष नेते असलेले राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. त्यांनी मोठ्या प्रमाणावर मतदार अचानक वाढल्याचे देखील शंका व्यक्त केल्याने इलेक्ट्रॉनिक डेटा देण्यासाठी निवडणूक आयोग टाळाटाळ करीत असल्याचे सांगितले आहे. त्याचबरोबर माहिती मागितले असता मतदारच्या गोपनेतीवर प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी निवडणूक आयोगाने घेतलेल्या पत्रकार परिषद मध्ये स्पष्ट केले. या सर्वांमध्ये जेव्हा निवडणूक प्रक्रियेदरम्यान सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले तेव्हा गोपनेतेचा प्रश्न निर्माण झाला नाही का हा प्रश्न देखील तितकाच महत्त्वाचा आहे. एकीकडे निवडणूक आयोगावर आरोप झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक निवडणूक आयोगाची बाजू घेत राहुल गांधींना उत्तर देण्याचा प्रयत्न केला मात्र नेटकरांनी त्यांना दिलेल्या उत्तरामुळे ते आता मात्र याप्रकरणी शांत असल्याचे दिसत आहे. त्यांची जागा आता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र याच सर्व प्रकरणावर आता केंद्रातील विरोधी पक्ष हा निवडणूक आयुक्त यांच्यावर महाभियोग म्हणजे काय, त्याची प्रक्रिया कशी असते, भारतातील त्याचा इतिहास, व त्यातील अडचणी यावर शोधक दृष्टिकोनातून या लेखात प्रकाश टाकलेला आहे.

-------------------

महाभियोग आणण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. नेमकं महाभियोगाची प्रक्रिया काय आहे आणि ती कशी पार पाडली जाते हे एक लिस्ट प्रक्रिया असली तरी यासाठी संख्याबळ असणे तितकेच आवश्यक आहे.

निवडणूक आयोगाने आपल्या प्रेस मध्ये असे म्हटले की एक दोन तक्रारी असल्या तर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी त्या तक्रारी सोडू शकतात. मात्र लाखो तक्रारी असल्याने त्या विना पुराव्या कशा सोडवल्या जाईल असे त्यांनी म्हटले. मात्र एकीकडे निवडणूक आयोग करोडो लोकांच्या घरी जाऊन मतदान वाढविण्याचा दावा करीत आहे तर दुसरीकडे या लाखोच्या तक्रारी सोडवण्यासाठी ते का तत्पर्त दाखवत नाही हा देखील प्रश्न आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात इंडिया आघाडी महाभियोग आणणार आणि जर हे खरं झालं तर भारताच्या इतिहासात निवडणूक आयुक्तांच्या विरोधात पहिल्यांदा अशी प्रक्रिया पार पडणार?

काल झालेल्या निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेनंतर विरोधी पक्षांनी ही भूमिका घेतलेली आहे. इंडिया आघाडीकडे बहुमत नसतांनाही अश्याही परिस्थितीत जर महाभियोग आणत असेल तर विरोधी पक्ष देशाचे संविधान संरक्षीत करण्यास समर्थ आहे. हेच यातून दिसून येते.



बादल डकरे
९९७५८४४६३८

संविधानाच्या कलम ३२४(५) नुसार मुख्य निवडणुक आयुक्ताला पदावरून काढण्याची प्रक्रिया आहे. मुख्य निवडणुक आयुक्तावर महाभियोग खटला सुरु करण्यासाठी करण्यासाठी विरोधीपक्षाकडे लोकसभेत १०० आणि राज्यसभेत किमान ५० खासदार यांचे अनुमोदन असावे लागते आणि एवढी संख्या विरोधीपक्षाकडे आहे. परंतु, महाभियोगची कार्यवाही होण्यासाठी दोन्ही सभागृहाचे प्रत्येकी दोन तृतीअंश बहुमत असावे लागते आणि ते विरोधी पक्षांकडे नाही.

केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात महाभियोग ची लढाई तांत्रिकदृष्ट्या जरी सोपी नसली तरी ही लढाई दोन प्रकारे लढल्या जात आहे. एक म्हणजे संसदेच्या दोन्हीही सभागृहातून आणि दुसरे म्हणजे रस्त्यावरून.

लोकशाहीतील प्रत्येक संस्था व पद ही जनतेच्या विश्वासाने चालते. परंतु या संस्थांमध्ये असलेल्या अधिकारांचा गैरवापर झाल्यास त्या व्यक्तीस जबाबदार धरणे अत्यावश्यक असते. अशा वेळी महाभियोग ही प्रक्रिया वापरली जाते.

महाभियोग ही एक घटनात्मक प्रक्रिया आहे, ज्याद्वारे एका उच्चपदस्थ व्यक्तीस - विशेषतः राष्ट्रपती, न्यायाधीश, इ. यांना त्यांच्या पदावरून हटविण्यासाठी कायदेशीर कारवाई केली जाते.

ही प्रक्रिया केवळ गंभीर आरोप असल्यासच वापरली जाऊ शकते, जसे की संविधानाचे उल्लंघन, भ्रष्टाचार, किंवा वर्तनाशी असंगत आचरण.भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ६१ नुसार, राष्ट्रपतीवर महाभियोग चालविण्याची प्रक्रिया संसदेच्या दोन्ही सभागृहांद्वारे केली जाते. ही प्रक्रिया अत्यंत कठीण व गुंतागुंतीची आहे,

**सूचना प्रस्ताव :** महाभियोग चालवायचा असल्यास प्रथम लोकसभा किंवा राज्यसभेतील किमान १/४ सदस्यांच्या स्वाक्षऱ्यांसह लेखी सूचना द्यावी लागते.

**मतदान :** दोन्ही सभागृहांमध्ये विशेष बहुमताने (किमान २/३ सदस्यांची संमती) महाभियोग मंजूर झाला पाहिजे.

**राष्ट्रपती पदावरून हटविणे :** जर दोन्ही सभागृहांनी महाभियोग मंजूर केला, तर राष्ट्रपती आपोआप पदावरून हटवले जातात.

भारतात आजवर कोणत्याही राष्ट्रपतीवर प्रत्यक्षात महाभियोग यशस्वीपणे चालवला गेलेला नाही. यामागील प्रमुख कारण म्हणजे ही प्रक्रिया खूप कठीण आहे व त्यात राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता असते.

उदाहरणार्थ, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व्ही. रामास्वामी यांच्यावर १९९३ मध्ये महाभियोग प्रस्ताव मांडला गेला होता, परंतु तो राज्यसभेत मंजूर होऊ शकला नाही. यावरून स्पष्ट होते की, राजकीय पक्षांच्या मतभेदांमुळे महाभियोग प्रक्रियेला अडथळा येतो.

लोकशाहीत सत्ता विकेंद्रीकरण महत्त्वाचे आहे. जेव्हा सर्वोच्च पदांवरील व्यक्तींच्या वर्तनावर प्रश्न उपस्थित होतो, तेव्हा उत्तरदायित्व आवश्यक असते. अन्यथा, सत्तेचा गैरवापर होण्याची शक्यता वाढते. म्हणूनच, महाभियोग ही एक रोखठोक प्रक्रिया आहे, जी त्या व्यक्तीस जबाबदार ठरवते.

महाभियोग प्रक्रिया ही लोकशाहीतील एक संवेदनशील व जबाबदारीची प्रक्रिया आहे. याचा उपयोग राजकीय द्वेषासाठी नव्हे, तर संविधानाच्या रक्षणासाठी व्हायला हवा. केवळ राजकीय फायद्यासाठी जर महाभियोगाचा वापर केला गेला, तर तो संविधानाच्या आत्म्याविरोधात ठरेल.

महाभियोग ही भारतीय लोकशाहीची एक शक्तिशाली, पण दुर्मीळ वापरली जाणारी घटना आहे. सत्तेवर असणाऱ्या व्यक्तींसाठी ही एक गंभीर चेतावणी असते की, त्यांच्या आचरणात जर चुकीचे वळण आले, तर त्यांना जबाबदार धरले जाईल. त्यामुळे महाभियोग ही प्रक्रिया सत्तेचे संतुलन राखण्यासाठी अत्यावश्यक आहे, पण त्याचा वापर अत्यंत सूज्ञपणे व पारदर्शकतेने व्हावा, ही काळाची गरज आहे.

## भारतीय माहिती क्रांतीचे जनक
# राजीव गांधी

आज २० ऑगस्ट, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची आज ८१ वी जयंती.

राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले.



भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते.

राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला.

त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले.

लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला. राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी कॉंग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली.

१९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली.

३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली.

वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झलेल्या निवडणुकीत त्यांनी कॉंग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत कॉंग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला.

स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात.

देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून तो दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■

# मी.. असे स्पष्ट करतो की, फेसबुक वर मुर्ख बनलो..

फेसबुकवर एक पोस्ट व्हायरल होत आहे मी नाव असे स्पष्ट करतो की माझा फोटो, वैयक्तिक माहिती वगैरे फेसबुक वापरणार नाही रात्री वेळ (अनेकांच्या प्रोफाइल वर) वेगवेगळा, ही बातमी टिव्हीवर प्रसारित करण्यात आली आणि स्वतः ची माहिती सुरक्षित राहण्यासाठी बहुतांश फेसबुक वापरणाऱ्या लोकांनी शिक्कामोर्तब केले आहे.

हे बघून खरंच हसु आले आणि स्वतःला सुशिक्षित, हुशार, चतुर समजणारे लोकही स्वतः मेंदूचा वापर करत नाहीत हे बघून त्यांच्या बुद्धीची किवही आली. सदर लेख कोणालाही कमी लेखण्यासाठी अजिबात नाही. परंतु चुकिची फसवी आणि हास्यास्पद पोस्ट लोक सहज फॉरवर्ड करतात . पण एखादी महत्वाची, एखाद्याला फायदा होईल, रोजगार, शैक्षणिक पोस्ट शेअर करायला लोकांना कमी पणा वाटतो आणि बुद्धी तपासण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पोस्ट फॉरवर्ड करून आपण मेंदूचा वापरच करत नाही हे स्वतः च सिद्ध करून देतो.



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
९१३०९७९३००

तेव्हा त्या शिक्षणाचा, बुद्धीचा आणि हुशारीचा फायदा नेमका कोणाला हा महत्त्वाचा प्रश्न बाजूला राहतो. फेसबुक वर फिरणारी पोस्ट शंभर टक्के चुकिची आहे. ही चुकिची पोस्ट आहे हे सर्वांना कळते फक्त थोडा मेंदुचा वापर करावा लागतो.

पोस्ट मधील एक एक मुद्दा समजून घेऊया. मुद्दा क्रमांक एक उद्या एक महत्वाचा दिवस आहे ज्यावर रात्री (वेळ)अधिकृत पणे शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. या वाक्याचा अर्थ तरी करतो कळतो. महत्त्वाचा दिवस म्हणजे नेमकं काय? शिक्कामोर्तब कशावर केला? कोणी केला? शिक्कामोर्तब झालेले कागदपत्रे कुठे आहेत? या प्रश्नांची उत्तरे कोणाकडे ही नाहीत.

मुद्दा नंबर दोन ही बातमी टिव्हीवर प्रसारित करण्यात आली आहे. तर कोणत्या टीव्हीवर प्रसारित करण्यात आली? कोणत्या व्यक्तीने बघितली? उत्तर नाही. फेसबुक चे नवीन नियम लागु होतात जे तुमचे फोटो वापरण्याची परवानगी देतात.

फेसबुक चे नवीन कोणते नियम तयार झाले याची यादी कोणाकडे आहे? उत्तर नाही. हा मॅसेज कॉपी करा आणि फेसबुक वर पेस्ट करा जो करणार नाही त्याची फोटो शेअर करायला परवानगी आहे असे समजले जाईल. मॅसेज कॉपी करून फेसबुकवर टाकायचा तेव्हा फोटो चा वापर होणार नाही हे खरे की खोटे नंतर बघु हे मॅसेजचे फॉरमॅट दिले कोणी? उत्तर नाही. गोपनियतेचे उल्लंघन केल्यास केल्यास कायदेशीर परिणाम होऊ शकतात..

गोपनियतेचे उल्लंघन कोण करणार? कायदेशीर परिणाम कसे होऊ शकतात? शिक्षण आरोग्य सरकारने मोफत द्यायला पाहिजे पण हे विकत घेणा?या लोकांना खरंच किती कायदेशीर बाबी माहिती आहेत हा संशोधनाचा प्रश्न आहे. मी मेटाला परवानगी देत नाही असे लिहणा?या लोकांच्या मेंदुची खरचं किव येते. कारण तुम्ही फेसबुकवर प्रोफाइल वर काहीही लिहले तरी काही फरक पडत नाही फक्त आपण बुद्धीने किती गरीब आहोत हेच सिद्ध होते.

चला आपण गोपनियते बद्दल बोलुया. फेसबुकच नव्हे तर इतर कोणतेही अॅप नवीन नोंदणी करताना आपल्या कडून परवानगी घेतली जाते. आपल्या हातात असलेला मोबाईल थोडाही सुरक्षित नाही.

फोटो, व्हिडीओ, कॉन्टॅक्ट नंबर, लोकेशन सह इतर बऱ्याच बाबी वेगवेगळ्या अॅपद्वारे वेगवेगळ्या लोकांकडे आहेत. म्हणुनच आपल्याला आपण फोनवर बोलतो ते, मोबाईल बघतो तेच वारंवार समोर येते, जागा बदलली की लोकेशन दाखवते हे याला गुपित म्हणायचे का? आपल्या मोबाईल मध्ये आपण बऱ्याच वेळा माहिती भरतो तर आपले नाव, मोबाईल नंबर, मेल आयडी, बऱ्याच लोकांचे बँक अकाऊंट नंबर आपोआपच येतात. याला गोपनीयता म्हणायचे का? आपल्याला कोणत्याही गोष्टीचे गांभीर्य कधी येणार?

अशा पोस्ट द्वारे फक्त आपण आपल्या बुद्धीचा वापर करतो की नाही हे सायबर क्रिमिनल बघत असतात. आपण आपली गोपनीयता आणि बौद्धीक पातळी सार्वजनिक करतो म्हणून अनेक ऑनलाइन फसवणूकीचे प्रकरण वाढले आहेत. गोपनियतेच्या गोष्टी कोण करते तर बाहेर जाऊन चहा जरी पिला तर ते सोशल मिडीयाला शेअर करतात ती गोपनियता? फिरायला गेले तर प्रत्येक ठिकाणची फोटो शेअर करतात, बेडरूम मधील फोटो शेअर करणाऱ्यांनी गोपनियते बद्दल फेसबुक वर लिहणे म्हणजे खरचं बुद्धीची कसोटीच असते.

चुकीच्या, हास्यास्पद ज्यातून आपणच आपली बुद्धी वापरत नाही असे मॅसेज फॉरवर्ड करताना स्वतःची छाती फुगते पण खरचं एखादी प्रबोधनात्मक पोस्ट, एखादी रोजगार, शिक्षण, आरोग्य यासंदर्भात कोणातरी फायदा होणारी पोस्ट शेअर करतांना मात्र कमीपणा वाटतो. एखादी चांगली पोस्ट शेअर झाली तर कोणाचा तरी लाखों रुपयांचा फायदाच होईल म्हणून न पाठवणारे जळकुटे लोक फेक पोस्ट पाठवण्यात माहीर असतात.

मागे अशीच एक पोस्ट व्हाट्सएपच्या संदर्भात फिरत होती. अनेकांनी ती शेअर करून स्वतः ची छाती फुगवली पण स्वतः ची बौद्धिक पातळी सर्वांना दिसली. बऱ्याच वेळा महापुरुषांच्या नावाने पोस्ट येतात हा दोन नंबर तुम्ही मत देऊन एक नंबर वर आना अर्थात एक नंबर व तिन नंबर वर कोण असते हे यांना माहिती नसते आणि हे महापुरुषांना वोट देऊन नंबर देणारे महान विद्वान लोक येथे आहेत.

यातून दुसरे काहीच सिद्ध होत नाही तर फक्त आपण सहज मुर्ख बनु शकतो आणि सारासार विचार करत नाही हेच सिद्ध होते. म्हणून शहानिशा करून, आपली बौद्धिक पातळीवर बघून पोस्ट शेअर झाल्या तर मानसाला किंमत राहते व फसवणूक होत नाही. नाहीतर स्वतःच्या च हाताने स्पष्ट करतो मी मुर्ख बनलो आहे.

■ ■ ■

# राज्यातील कायदा-सुव्यवस्था : नागरिक असुरक्षिततेच्या छायेत

गेल्या काही महिन्यांपासून राज्यात घडणाऱ्या घटनांनी सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. कधी हत्तीण, कधी कबूतर, तर कधी मटण या किरकोळ कारणांवरून धार्मिक, जातीय व सामाजिक गटांमध्ये वाद उफाळून हिंसाचाराच्या स्वरूपात रस्त्यावर प्रकट होत आहेत. या हिंसेत निरपराध नागरिक, महिला व तरुणी यांना मारहाण होणे ही गंभीर बाब आहे. समाजातील सौहार्द डळमळीत होत असून नागरिकांना आपण सुरक्षित आहोत का? हा प्रश्न सतावतो आहे.

-------------------

अंमली पदार्थ व शस्त्रास्त्र तस्करीची सातत्याने वाढ होत आहे. तसेच राज्यात अमली पदार्थांचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होत असल्याची प्रकरणे उघड होत आहेत.

लांब पल्ल्यांच्या रेल्वे गाड्या व खासगी वाहनांतून या तस्करीचे जाळे पसरले आहे. गेल्या काही वर्षांत पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज जप्त केले असले तरी त्याच्या मुळावर घाव घालण्यात प्रशासन कमी पडत असल्याचे दिसते.

यात आणखी एक चिंतेची बाब म्हणजे परप्रांतीय लोकांच्या माध्यमातून वाढणारी शस्त्रास्त्र तस्करी. यामुळे गुन्हेगारी टोळ्या अधिक बळकट होत आहेत आणि समाजातील कायदा-सुव्यवस्था धोक्यात येत आहे.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

नागरिकांसाठी दिवसेंदिवस समस्या वाढतच आहेत. कायदा-सुव्यवस्था धोक्यात येत असताना नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही इतर अनेक समस्या कोसळत आहेत. रस्त्यांची दुरवस्था इतकी बिकट झाली आहे की अपघातांचे प्रमाण वाढले आहे. रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सुविधा अपुऱ्या आहेत, औषधांचा तुटवडा भासत आहे.

सामान्य नागरिकांना मूलभूत हक्कांसाठी देखील संघर्ष करावा लागत आहे. समाजातील सौहार्द टिकवणे, नागरिकांना सुरक्षित वातावरण देणे व गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे ही गृहखात्याची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र सध्या या सर्व आघाड्यांवर शासन अपयशी ठरत असल्याचे चित्र आहे. सतत घडणाऱ्या घटनांमुळे सरकारच्या कारभारावर प्रश ?नचिन्ह उपस्थित होत आहे.

त्यात काही सुधारणा करणे आवश्यक आहे. जसे, हिंसा आणि तस्करी रोखण्यासाठी स्थानिक स्तरावर माहिती गोळा करून तातडीने कारवाई करणे गुप्तचर यंत्रणा अधिक बळकट करणे गरजेचे आहे.

पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञान, उपकरणे व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून पोलिस दलाचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. ड्रग्ज व शस्त्रास्त्रांवर कठोर नियंत्रण ठेवण्याकरीता वाहतूक मार्गांवर नाकाबंदी, तपासणी मोहिम व कठोर शिक्षा यांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. सामाजिक सामंजस्य मोहिम, धार्मिक व जातीय मतभेद टाळण्यासाठी संवाद, जनजागृती व शांती समित्या सक्रिय करणे आणि शेवटी रस्ते व आरोग्य सेवांमध्ये गुंतवणूक केल्यास नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्यास असंतोष कमी होईल.

राज्यातील वाढत्या घटना शासनाच्या अपयशाकडेच बोट दाखवत आहेत. सामान्य नागरिक सुरक्षिततेची अपेक्षा करतो, पण त्याऐवजी तोच हिंसा व अराजकतेचा बळी ठरत आहे. त्यामुळे आज गृहखात्याने तातडीने जागे होऊन ठोस पावले उचलली नाहीत, तर उद्याचे सामाजिक व राजकीय परिणाम गंभीर असतील, हे प्रत्येकाने ध्यानात घेणे आवश्यक आहे.

■ ■ ■

# भविष्यातील विश्वगुरू भारतासाठी शिक्षणाचा मंत्र

भाग १

आज भारताची शैक्षणिक प्रणाली अनेक पातळ्यांवर यशस्वी ठरली असली तरी, बदलत्या काळानुसार तिच्यात ठोस सुधारणा करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. आपली शिक्षणपद्धती आजही मुख्यतः पुस्तकी ज्ञानावर आधारित आहे आणि प्रत्यक्ष कौशल्य शिकवण्याकडे दुर्लक्ष केले जाते. या कारणामुळे मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पदवी घेतल्यानंतरही बेरोजगार राहत आहेत किंवा अपुऱ्या कौशल्यांमुळे उद्योगक्षेत्रात टिकत नाहीत. IndiaSkills Report 2024 नुसार, देशातील केवळ ४८.७% पदवीधर रोजगारयोग्य आहेत, म्हणजेच दरदोनपैकी एक विद्यार्थी उद्योगाच्या अपेक्षांना अपुरा ठरतो. ही आकडेवारी फक्त काळजीपूर्वक विचार करण्यास भाग पाडणारी नाही, तर शिक्षण क्षेत्रात मूलगामी सुधारणा करण्याची गरज अधोरेखित करणारी आहे.

-------------

आजही अनेक सरकारी महाविद्यालयांत जुना आणि कालबाह्य अभ्यासक्रम शिकवला जातो. मार्क्स मिळवणे हे अजूनही शैक्षणिक गुणवत्तेचं मुख्य परिमाण मानलं जातं, ज्यामुळे केवळ परीक्षांमध्ये चांगले गुण मिळवण्यावर भर दिला जातो, आणि विद्यार्थी क्रिटिकल थिंकिंग, प्रॉब्लेम सॉल्विंग, डिजिटल लिटरेसी आणि इनोव्हेशन यासारख्या महत्त्वाच्या कौशल्यांपासून दूर राहतात. त्याउलट आंतरराष्ट्रीय शिक्षणपद्धतीमध्ये

project-based learning, interdisciplinary education And skill certification यावर भर दिला जातो. त्यामुळे आपण भारतीय शिक्षणपद्धतीत केवळ degree पुरविणारी प्रक्रिया न ठेवता capability निर्माण करणारी व्यवस्था निर्माण केली पाहिजे.

अभ्यासक्रमाचे वेळोवेळी अद्यतन होणे गरजेचे असले तरी दरवर्षी तो बदलण्याची गरज नाही, परंतु उद्योगधंद्यांमध्ये चालू असलेल्या ट्रेंड्स आणि तंत्रज्ञानाच्या गरजांनुसार त्यात आवश्यक ते बदल करणे आवश्यक आहे.

उदाहरणार्थ, आज AI, data science, cyber security, cloud computing, EV technology अशा क्षेत्रांमध्ये प्रचंड मागणी असताना, बहुतांश शैक्षणिक संस्थांच्या अभ्यासक्रमात या गोष्टींचा उल्लेखसुद्धा नाही. NEP २०२० मध्ये यासंदर्भात काही सकारात्मक पावले उचलण्यात आली आहेत, जसे की multiple exit options, vocational integration, आणि interdisciplinary learning, परंतु याची अंमलबजावणी अजूनही साठलेल्या सिस्टीममुळे संथगतीने होत आहे.

शिक्षण संस्थांनी इंटर्नशिपला अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग बनवले पाहिजे. आजच्या काळात प्रत्येक नोकरीसाठी किमान अनुभव मागितला जातो, परंतु तो अनुभव विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये शिकत असतानाच मिळाला पाहिजे. जर इंटर्नशिप अनिवार्य केली गेली, तर विद्यार्थी केवळ सैद्धांतिक नव्हे तर व्यावहारिक ज्ञानातही प्रावीण्य मिळवतील आणि कामाच्या ठिकाणी लगेच स्वतःला सिध्द करू शकतील.

Young India Skills University चं उदाहरण घ्यायचं झालं तर, त्यांच्या पहिल्याच बॅचमध्ये ८२% विद्यार्थ्यांनी उद्योगांमध्ये प्लेसमेंट मिळवली. यावरून स्पष्ट होतं की, इंटर्नशिप आणि कौशल्याधारित शिक्षण हे यशाच्या मूलतत्त्वांपैकी एक आहेत.

तसेच विद्यार्थ्यांचे मूल्यांकन केवळ गुणांवर न करता, त्यांचं व्यावहारिक ज्ञान, प्रोजेक्ट्सवर केलेले काम, कमी वेळेत सोडवलेली समस्या, संवाद कौशल्य, आणि टीमवर्क यांच्या आधारे केलं पाहिजे. अनेकदा एखादा विद्यार्थी गणित, विज्ञान, किंवा इंग्रजीमध्ये सरासरी कामगिरी करतो, पण तो एखाद्या विशिष्ट कौशल्यात, जसं की कोडिंग, डिझाईन, वाचन, भाषणकला अप्रतिम असतो. परंतु गुणांच्या आधारित चाचणी पद्धतीमुळे तो शिक्षणात कमकुवत मानला जातो आणि त्याचं आत्मविश्वास कमी होतो. त्यामुळे शिक्षण संस्थांनी विविध कौशल्यांमध्ये विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना योग्य त्या दिशेने पोषण करणे गरजेचे आहे.

सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना क्लासरूमच्या बाहेरचं शिक्षण देणं ही काळाची गरज आहे. यात live industry projects, 'skill bootcamps', 'real-world case studies', आणि 'peer-to-peer learning models' यांचा समावेश असावा. यामुळे विद्यार्थी 'book-smart' राहणार नाहीत, तर 'job-ready' होतील.

शिक्षण आणि उद्योग यामधील दरी भरून काढण्यासाठी स्थानिक कंपन्यांसोबत शैक्षणिक संस्थांनी भागीदारी करावी आणि 'campus to corporate' ट्रान्झिशन अधिक सुलभ करावा. खरोखरच, आजच्या काळात शिक्षण हे केवळ पाठांतरापुरते मर्यादित राहू नये.

सध्याच्या पद्धतीमध्ये अजूनही बराचसा भर किती पाठ आहे यावर दिला जातो, आणि किती समजलं किंवा किती उपयोगात आणता येईल याकडे दुर्लक्ष होत आहे. हे शिक्षणपद्धतीचं मोठं अपयश ठरत आहे. माझं स्वतःचं निरीक्षण असं आहे की, जर एखादी संकल्पना योग्य पद्धतीने समजावून सांगितली गेली, विशेषतः mind maps, visual notes, flow diagrams, 3D models, animations अशा माध्यमांतून शिकवण्यात आलं, तर ती माहिती खूप काळ लक्षात राहते आणि प्रत्यक्षात उपयोगातही येते. ही केवळ वैयक्तिक भावना नाही, तर Harvard University च्या 2023 च्या एका संशोधनानुसार, "visuo-conceptual learning techniques" वापरले गेले असता विद्यार्थ्यांचं retention rate ३०% पेक्षा जास्त वाढलेलं दिसून आलं.

यामध्ये शिक्षकांचं योगदान महत्त्वाचं आहे. शिक्षकांनीही आता पारंपरिक "lecture-based" शिकवण्याच्या पद्धतीत बदल करून interactive, participatory आणि तंत्रज्ञानाधारित शिकवण्याकडे वळायला हवं. उदाहरणार्थ, South Korea आणि Finland यांसारख्या देशांमध्ये शिक्षक दर तासाला केवळ माहिती देत नाहीत, तर विद्यार्थ्यांना त्या माहितीचा स्वतः अनुभव घेता येईल अशा उपक्रमांमध्ये सहभागी करतात.

भारतातही "DIKSHA", "SWAYAM", आणि "e-PG Pathshala" सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा योग्य वापर करून तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण दिलं जाऊ शकतं. पण यासाठी आधी शिक्षकांना या प्रणालींचे प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. UNESCO-2024 Global Education Monitoring Report मध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, भारतातील ६४% शिक्षकांनी अद्यापही डिजिटल शिकवणीच्या साधनांमध्ये पारंगत नसल्याचं मान्य केलं आहे.

पुढे, शिकवतानाचा दृष्टिकोनही बदलण्याची आवश्यकता आहे. सध्याची परीक्षा प्रणाली विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेऐवजी स्मरणशक्ती तपासत आहे. या ठिकाणी आपण Bloom's Taxonomy सारख्या आधुनिक शिक्षण सिद्धांतांचा अवलंब केला पाहिजे, जिथे विद्यार्थ्याला केवळ माहिती आठवण्याऐवजी त्याचं विश्लेषण, उपयोग, आणि निर्मिती करण्यास प्रवृत्त केलं जातं.

IIM Bangalore च्या एका अभ्यासानुसार, जे विद्यार्थी concept-based learning प्रणालीद्वारे शिकले, त्यांचं problem-solving ability सरासरी विद्यार्थ्यांपेक्षा ४०% जास्त विकसित झालं होतं. त्यामुळे शिक्षणात पाठांतराची शर्यत थांबवून समज आणि वापर ह्या दोन गोष्टी केंद्रस्थानी आणल्या गेल्या पाहिजेत.

या सर्व संकल्पनांच्या अंमलबजावणीसाठी शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि शिक्षण विभाग यांचं समन्वयित सहकार्य गरजेचं आहे. शिक्षकांनी वर्षातून काही तास concept-building workshops घ्याव्यात, जिथे विद्यार्थ्यांना फक्त काय शिकायचं यावर नव्हे तर का शिकायचं आणि कसं शिकायचं यावर मार्गदर्शन दिलं जावं. विद्यार्थ्यांनी फक्त एकतर्फी शिकण्यापेक्षा, open discussions, Q&A sessions, simulations, role-play, case studies यामध्ये भाग घेतला पाहिजे.

-------------------

श्रिजीत राजश्री चेतक भोकरे
१२ वी (विज्ञान शाखा)
मॉडेल ज्युनिअर कॉलेज,
कारंजा घाडगे, जिल्हा वर्धा.
9970591697
bhokareshrijeet@gmail.com

■ ■ ■



# सेंसेक्समध्ये 371 अंकांची उसळी

## गुंतवणूकदारांना झाला 4 लाख कोटींचा नफा

**मुंबई, दि. १९ प्रतिनिधी**

मंगळवारी शेअर मार्केटमध्ये वाढीचा सिलसिला सुरूच राहिला आणि शेअर मार्केट सलग चौथ्या दिवशी हिरव्या चिन्हावर बंद झाले. एका बाजूला सेंसेक्स ३७१ अंकांनी वर चढला आणि दुसऱ्या बाजूला निफ्टी ५० मध्ये १०४ अंकांची उसळी दिसली.

मंगळवारी सकाळी सेंसेक्स ८१,३१९ या पातळीवर उघडला आणि दिवसाच्या अखेरीस ०.४६ टक्के वाढीसह ८१,६४४ या पातळीवर क्लोजिंग दिली. त्याच दिवशी निफ्टी ५० ने २४,८९१ या पातळीवर ओपनिंग दिली आणि दिवसाच्या अखेरीस ०.४२ टक्के वाढीसह २४,९८० या पातळीवर बंद झाला.

या दरम्यान, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप मागील सत्रातील ४५१ लाख कोटी रुपयांवरून वाढून सुमारे ४५५ लाख कोटी रुपये झाले. यामुळे गुंतवणूकदारांना एका दिवसातच ४ लाख कोटी रुपयांचा नफा झाला.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक फायदा टाटा मोटर्सला झाला, ज्यात ३.५९ टक्क्यांची वाढ दिसली. त्यानंतर अदानी पोर्ट्समध्ये ३.१८ टक्क्यांची वाढ, रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये २.७८ टक्क्यांची वाढ, हिरो मोटोकॉर्पमध्ये २.७० टक्क्यांची वाढ, बजाज ऑटोमध्ये २.४१ टक्क्यांची वाढ झाली.



**सेन्सेक्स 81,644**

**निफ्टी 24,980**

तर निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक तोटा डॉ. रेड्डीजला झाला, ज्यात १.४७ टक्क्यांचा तोटा झाला. त्यानंतर बजाज फिनसर्वमध्ये १.०७ टक्क्यांची घसरण, हिंडाल्कोमध्ये १.०५ टक्क्यांची घसरण, सिप्लामध्ये १.०५ टक्क्यांची घसरण, महिंद्रा अँड महिंद्रामध्ये ०.८७ टक्क्यांची घसरण दिसली.

सेक्टोरल इंडेक्समध्ये सर्वाधिक फायदा निफ्टी ऑईल अँड गॅसला झाला, ज्यात १.६६ टक्क्यांची वाढ दिसली. त्यानंतर निफ्टी मीडिया मध्ये १.३४ टक्क्यांची वाढ, निफ्टी ऑटो मध्ये १.३१ टक्क्यांची वाढ, निफ्टी एफएमसीजी मध्ये १.०५ टक्क्यांची वाढ, निफ्टी इन्फ्रा मध्ये ०.९० टक्क्यांची वाढ, निफ्टी एनर्जी मध्ये ०.८३ टक्क्यांची वाढ दिसली.

सर्वाधिक तोटा निफ्टी इंडिया डिफेन्सला झाला, ज्यात १.०३ टक्क्यांची घसरण दिसली. त्यानंतर निफ्टी फार्मामध्ये ०.३४ टक्क्यांची घसरण, निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये ०.०६ टक्क्यांची घसरण दिसली.

# "...तर, टोल का भरावा?"

## सरन्यायाधीश गवई यांची टोल आकारणी आणि रस्त्यांच्या अवस्थेबाबत टिप्पणी

**नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी एका सुनावणीदरम्यान टोल आकारणीबाबत कठोर प्रश्न उपस्थित केले आहेत. केरळमधील राष्ट्रीय महामार्ग आणि टोल आकारणीबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीवेळी सरन्यायाधीश गवई यांनी म्हटले आहे की, राजधानी दिल्ली अवघ्या दोन तासांच्या पावसात विस्कळीत होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निरीक्षणानंतर, गेल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे दिल्ली कशी ठप्प झाली होती याची आठवण झाली. त्यावेळी मुसळधार पावसामुळे दिल्लीतील अनेक रस्ते पाण्याखाली गेले होते, महत्त्वाच्या रस्त्यांचे संपर्क तुटले होते आणि मुसळधार पाऊस थांबल्यानंतरही हजारो प्रवाशांना अनेक तास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागले होते.

केरळ उच्च न्यायालयाने, महामार्ग क्रमांक ५४४ वरील रस्त्यांच्या खराब अवस्थेमुळे टोल आकारणी स्थगित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. यावर सुनावणी करताना सरन्यायाधीश गवई यांनी टोल आकारणीबाबत भाष्य केले. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने या



प्रकरणाचा निकाल राखून ठेवला आहे.

सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने केरळमधील महामार्गांवरील १२ तासांच्या वाहतूक कोंडीवरही प्रश्न उपस्थित केले. यावेळी न्यायालय म्हणाले की, "जर एखाद्या व्यक्तीला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी १२ तासांचा वेळ लागत असेल तर, त्याने टोल का भरावा?"

"एखाद्या व्यक्तीला रस्त्याच्या एका टोकावरून दुसऱ्या टोकाला जाण्यासाठी १२ तास लागत असतील तर त्याने १५० रुपये का भरावे? एका तासाच्या प्रवासासाठी ११ तास अधिक वेळ घालवायचा आणि टोलही भरायचा", असे सरन्यायाधीश बी. आर. गवई म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी. आर. गवई त्यांच्या स्पष्टवक्तेपणाबाबत ओळखले जातात. काही दिवसांपूर्वी त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांबद्दल एक महत्त्वाचे विधान केले होते. ते म्हणाले होते की, सरन्यायाधीश हे सर्वोच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांपेक्षा वरिष्ठ किंवा श्रेष्ठ नाहीत.

# महिंद्रा कंपनीच्या कर्मचाऱ्याने महिला खासदाराला दिली बलात्काराची धमकी; कंपनीकडून चौकशीचे आदेश

**नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था**

बिजू जनता दल पक्षाच्या महिला खासदार सुलता देव यांनी १७ ऑगस्ट रोजी एक्सवर एक पोस्ट शेअर करत धक्कादायक आरोप केला होता. महिंद्रा कंपनीत काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्यानं आपल्यावर बलात्कार आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा दावा खासदार सुलता देव यांनी केला होता. तसेच या प्रकरणावर पोलीस कोणतीही कारवाई करत नाहीत, असे त्यांनी म्हटले होते. या पोस्टमध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा आणि महिंद्रा ग्रुपचे अध्यक्ष आनंद महिंद्रा यांना टॅग केले होते. आता महिंद्रा ग्रुपने यावर अधिकृत भूमिका मांडली आहे.

सुलता देव यांनी केलेल्या एक्स पोस्टमध्ये म्हटले, नाशिकमध्ये महिंद्रा कंपनीत काम करणारा कर्मचारी आणि भाजपाचा कथित कार्यकर्ता एका महिला खासदारावर बलात्कार करण्याची आणि तिला जीवे मारण्याची उघड धमकी देत आहे. खासदाराबरोबर हे होत असेल तर देशातील सामान्य महिलांची परिस्थिती कशी असेल?

२ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीतील एम्स रुग्णालयात ओडिशाच्या पुरी जिल्ह्यातील एका अल्पवयीन मुलीचा भाजल्यामुळे मृत्यू झाला. या घटनेसंदर्भात पीडित अल्पवयीन मुलीच्या जबाबाचा एक व्हिडीओ फेसबुकवर व्हायरल झाला होता. या व्हिडीओच्या पोस्टला कमेंट करताना सदर धमकी दिल्याचे सुलता देव यांनी सांगितले आहे.

दरम्यान या व्हिडीओची सत्यता पोलीस पडताळत आहेत. सदर व्हिडीओ कुणी काढला आणि व्हायरल केला, याचा शोध घेतला जात आहे.

दरम्यान खासदार सुलता देव यांनी महिंद्रा कंपनी आणि त्यांच्या कर्मचाऱ्याचा उल्लेख केल्यानंतर कंपनीकडून यावर भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. कंपनीच्या अधिकृत एक्स हँडलवर ही प्रतिक्रिया उपलब्ध आहे.

"आमच्या एका कर्मचाऱ्याने फेसबुकवर एका राजकीय नेत्याला काही अनुचित संदेश पाठवल्याची बाब समोर आली आहे. आम्ही कोणत्याही प्रकारच्या गैरवर्तनाला, धमकीला जराही थारा देत नाही. महिंद्रा ग्रुपने आपल्या स्थापनेपासूनच मानवी प्रतिष्ठेला महत्त्व दिले आहे आणि आदरात्मक वातावरण राखण्यावर आमचा विश्वास आहे. त्यामुळे अशा तत्त्वांचे उल्लंघन सहन केले जाणार नाही", असेही कंपनीने म्हटले.


"आम्ही हे प्रकरण गांभीर्याने घेत आहोत आणि तात्काळ चौकशी सुरू करत आहोत. जर आरोप खरे ठरले तर आमच्या आचारसंहिता नियमांनुसार कारवाई केली जाईल", असेही महिंद्रा ग्रुपने आपल्या निवेदनात म्हटले.

# व्लादिमीर पुतिन यांची ऑफर लीक झाली

## ट्रम्प यांनी रशियाचा प्लान जगाला सांगितला

**वॉशिंग्टन, दि. १९ वृत्तसंस्था**

रशिया - युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रयत्न केले आहेत. काही दिवसापूर्वी ट्रम्प आणि पुतिन यांच्यात बैठक झाली. तर काल सोमवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि युरोपीय नेत्यांनी रशिया-युक्रेनवर चर्चा केली. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि त्यांचे युक्रेनियन समकक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की शांतता शिखर परिषदेसाठी तयार असल्याची माहिती ट्रम्प यांनी दिली. व्हाईट हाऊसमध्ये युरोपीय आणि युक्रेनियन नेत्यांसोबत चांगल्या बैठकीनंतर, त्यांनी त्यांचे रशियन समकक्ष पुतिन यांच्याशी फोनवर बोलले असे अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी सांगितले.



बैठकीनंतर ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल नेटवर्कवर लिहिले की, रशिया-युक्रेन शांततेच्या शक्यतेबद्दल प्रत्येकजण खूप उत्सुक आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी अनवधानाने असे काही सांगितले. यामुळे पुतिनची यांचा प्लान जगासमोर आला.

ट्रम्प यांनी कीवसाठी सुरक्षेची हमी देण्यासाठी व्हाईट हाऊसमध्ये एक गोपनीय बहुपक्षीय बैठक आयोजित केली होती, यामध्ये फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टारमर, जर्मन चांसलर फ्रेडरिक मर्झ, इटलीचे पंतप्रधान जॉर्जिओ मेलोनी, फिनलंडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब, युरोपियन कमिशनचे प्रमुख उर्सुला वॉन डेर लेयन आणि नाटोचे सरचिटणीस मार्क रुट यांच्यासह सात युरोपीय नेते उपस्थित होते.

बैठकीपूर्वी, एका हॉट माइकमध्ये ट्रम्प मॅक्रॉनला सांगत असल्याचे रेकॉर्ड केले होते, यामध्ये त्यांना वाटते की रशियन अध्यक्ष एक करार करू इच्छितात. दोन्ही नेत्यांमधील संभाषणात ट्रम्प म्हणाले, "मला वाटते की ते एक करार करू इच्छितात.

# अमेरिकेच्या टॅरिफ धमक्यादरम्यान चीनने पुढे केला मैत्रीचा हात

**नवी दिल्ली, दि. १९वृत्तसंस्था**

एकीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धमक्या सुरु असताना दुसरीकडे चीनने भारताकडे मैत्रीचा हात पुढे केला आहे. चीनने भारताच्या तीन प्रमुख चिंता दूर केल्या आहेत. चीनने भारताला खते, दुर्मिळ अर्थ मॅग्नेट्स/मिनरल्स तसेच टनेल बोरिंग मशीनच्या निर्यातीवरील निर्बंध उठवले आहेत.

या प्रश्नी गेल्या जुलैमध्ये भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी चीनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री वांग यी यांची भेट घेतली होती. चीन दौऱ्यादरम्यान एस जयशंकर यांनी भारताच्या तीन समस्यांबाबत चर्चा केली होती. वांग यी यांनी एस जयशंकर यांना आश्वासन दिले की चीन भारताची खतांती गरज, दुर्मिळ अर्थ मॅग्नेट्स आणि टनेल बोरिंग मशीन या तीन प्रमुख अडचणी दूर करेल.

# घड्याळांचे अनोखे संग्राहक -अनिल भल्ला

असं म्हणतात कि एखादा छंद हा अनेकांना अगदी वेडेपिसे करून सोडतो. परंतु विशिष्ट छंदासाठी अनेक छांदिष्ट लोक मात्र मनापासून स्वतःला झोकून देतात आणि आपला तो छंद पूर्णत्वास नेतातच. व्यक्ती तितक्याच प्रकृती या न्यायाने अनेकांना आपल्या आवडीनुसार अनेक प्रकारचे छंद असतात. कोणाला बसची किंवा रेल्वेची तिकीट जमविण्याचा तर कोणाला पोस्टाची तिकीट जमविण्याचा छंद असतो. काहींना जुन्या दुर्मिळ नाण्यांचा किंवा देशोदेशीच्या चलनाचा संग्रह करावासा वाटतो तर अनेक लोक चक्क धातूच्या मुर्त्या देखील संग्रही ठेवतात. मध्य प्रदेशातील इंदूर या शहरातील अनिल भल्ला याना मात्र वेगवगेळ्या देशातील सुंदर आणि आकर्षक भिंतीवरील घड्याळांचा संग्रह करण्याचा छंद जडलेला आहे. पेशाने कलेकटर असलेल्या अनिलजी यांच्या संग्रहात भारतासह अमेरिका,ब्रिटन,जर्मनी,फ्रांस,स्वित्झर्लंड अशा अनेक देशातून आणलेल्या दुर्मिळ अशा सुमारे ६५० पेक्षा अधिक घड्याळाचा संग्रह आहे हे वाचूनच आपल्याला अवाक व्हायला होत ना?

**लोकमानस**

इंदूर शहरात वास्तव्यास असलेल्या ८० वर्षीय अनिल भल्लाजी यांच्या घरात प्रवेश करताच अगदी दिवाणखान्यातच भिंतींवर टिकटॉक करणाऱ्या मंत्रमुगध करून टाकणाऱ्या आवाजाने आपले स्वागत केले जाते. यामुळे आपण जणूकाही टाइम मशीनवर बसून भूतकाळात जाऊन पोह्चल्याचाच आपल्याला भास होतो. अनिलजी याना अशा



प्रकारची नानाविध घड्याळ जमविण्याचा छंद त्यांच्या आजोबांकडून हुकूमत राय भल्ला यांच्याकडून वारसा म्हणून मिळाला आहे. त्यांचे आजोबा परदेशात उच्च शिक्षण घेत असताना अनेक प्रकारची परदेशी घड्याळ ते भारतात आणत असत. अनिलजी यांनी हाच वारसा जपत वयाच्या १६ व्या वर्षी त्यांच्या संग्रहातील पहिले घड्याळ विकत घेतले,जे वर्धापनदिनाचे घड्याळ होते. ज्याला वर्षातून फक्त एकदाच वळण लागत असे. त्यानंतर त्यांना जेंव्हा जेंव्हा अतिरिक्त पैसे मिळत तेंव्हा अनिलजी आकर्षक प्रकारची दुर्मिळ अशी घड्याळ खरेदी करत असत. त्यांच्या संग्रहात आजवर सुमारे ६५० पेक्षा अधिक घड्याळ आहेत जी अनेक देशातील आहे त्यापैकी १७५० मध्ये फ्रांस मध्ये बनवलेले १० फूट उंच ग्रँड फादर घड्याळ हे अतिशय दुर्मिळ असे आहे. भल्ला यांच्या संग्रहातील अशा नानाविध आकार आणि प्रकारच्या घड्याळाच्या संग्रहाची २०१३ मध्ये लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये देखील नोंद झालेली आहे हे विशेष.

अनिलजी यांच्या संशोधनानुसार १७०० च्या सुमारास जगात कुठेतरी प्रथम घड्याळ बनविले गेल्याची नोंद आहे. त्यांच्या संग्रहात जी विविध प्रकारची दुर्मिळ घड्याळ आहेत त्यामध्ये १८३० साली लाकडाच्या तुकड्यातुन बनविलेले इंगलंडमधील एक अनोखे घड्याळ आहे जे वेगवगेळ्या डायल द्वारे जगातील १६ प्रमुख शहरांचा वेळ दर्शविते. तसेच स्वित्झर्लंड मध्ये बनवलेल्या घड्याळाची खासियत अशी कि त्याला चावी नाही ते वळविण्यासाठी दोन लोक लागतात. याप्रमाणेच परदेशी बनावटीचे पॉकेट घड्याळ,रेल्वे कर्मचाऱ्यांसाठीचे रेल्वे टाइम किपर घड्याळ,वंदे मातरम नावाचे भारतीय बनावटीचे घड्याळ,जे शुद्ध तांब्याचे असून त्यावर महात्मा गांधी आणि लोकमान्य टिळकांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत अशी असंख्य घड्याळ पाह्यला मिळतात. भल्ला यांनी त्यांच्या या अनोख्या घड्याळाच्या संग्रहासाठी चक्क भंगारवाल्याकडून देखील जुनी दुर्मिळ घड्याळ घेऊन ती चालू करून संग्रहात ठेवलेली आहेत. त्यांच्याकडील या एकापेक्षा एक आकर्षक आणि दुर्मिळ अशा घड्याळाचे प्रदर्शन देखील अनेकदा भरवले गेले आहे. एकूणच अनिल भल्ला सारखे जेष्ठ अवलिया आपल्या या अनोख्या घड्याळाच्या संग्रहामुळेच मुलखा वेगळे संग्राहक ठरतात नाही का?

**मुलखावेगळी माणसं**

# आम्हाला मतदान करा, राहुल गांधींना देशाचे पंतप्रधान करू- तेजस्वी यादव

**नवादा, दि.१९ वृत्तसंस्था**

काँग्रेस नेते राहुल गांधी 'मतदार हक्क यात्रे'निमित्त बिहारचा दौरा करत आहेत. राजद नेते तेजस्वी यादव हेदेखील त्यांच्यासोबत या यात्रेत सहभागी आहेत. मंगळवारी त्यांची ही यात्रा नवादा येथे पोहोचली आहे. यावेळी तेजस्वी यांनी एक मोठे विधान केले आहे. 'तुम्ही पुढच्या लोकसभा निवडणुकीत आमच्या महाआघाडीला मतदान करा, आम्ही राहुल गांधींना देशाचे पंतप्रधान करू,' असा दावा तेजस्वी यांनी केला आहे.

नवादा येथे मतदार हक्क यात्रेला संबोधित करताना तेजस्वी यादव म्हणाले की, 'भाजप लोकांकडून मतदानाचा अधिकार हिसकावून घेऊ इच्छित आहे. निवडणूक आयोग आणि भाजपच्या लोकांना वाटते की, ते बिहारच्या लोकांना फसवतील. आम्ही बिहारी आहोत, हे त्यांनी लक्षात ठेवावं. मुख्यमंत्री नितीश कुमार बेशुद्धावस्थेत आहेत. त्यांचे २० वर्षांचे जीर्ण सरकार उखडून टाकावे लागेल. कोणत्याही जातीचा असो वा धर्माचा, आम्ही सर्वांना सोबत घेऊन जाऊ. आपण नवीन युगाचे लोक आहोत, बिहार हे सर्वात तरुण राज्य आहे, हे सरकार आपल्या तरुणांच्या भविष्याशी खेळत आहे,' अशी टीकाही तेजस्वी यांनी केली.

# यूपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या महाराष्ट्रातील ८४ विद्यार्थ्यांचा दिल्लीत सत्कार

**नवी दिल्ली, दि. १९ वृत्तसंस्था**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या महाराष्ट्र राज्यातील ८४ विद्यार्थ्यांचा सत्कार येत्या मंगळवारी दिल्लीत होणार आहे. या कार्यक्रमासाठी भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असणार आहेत. दिल्लीस्थित मराठी अधिकाऱ्यांची संस्था 'पुढचे पाऊल'च्या माध्यमातून हा कार्यक्रम होणार आहे. यंदाचे या कार्यक्रमाचे सातवे वर्ष आहे.

या कार्यक्रमाच्या संदर्भात भारतीय परराष्ट्र सेवेतील निवृत्त अधिकारी आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे सल्लागार ज्ञानेश्वर मुळे, केंद्रीय शिक्षण मंत्रालयातील अतिरिक्त सचिव आनंद पाटील, लँड पोर्ट प्राधिकरणाच्या वित्त सदस्य रेखा रायकर, ज्ञानेश्वर वीर यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. दरम्यान, या कार्यक्रमाच्या पहिल्या भागात दिल्लीसह देशभर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी गुणवंतांशी थेट संवाद साधणार आहेत. दुसऱ्या सत्रात प्रमुख अतिथी उपस्थितांना मार्गदर्शन करतील. ऑनलाईन माध्यमातूनही हा कार्यक्रम देशभरातील लोकांना पाहता येईल. राज्यातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात प्रशासकीय सेवेत यावेत, यासाठी पुढचे पाऊल संस्था विद्यार्थ्यांना गेली २ दशके मार्गदर्शन करत आहे.

# सिट्रोएनची नवी सी३एक्स लाँच

सिट्रोएन इंडियाने सिट्रोएन २.० "शिफ्ट इनटू द न्यू" स्ट्रॅटेजिक प्लॅनचा भाग म्हणून, नवीन सिट्रोएन सी३एक्स रेंजचे अनावरण केले, जी त्यांच्या लोकप्रिय एसयूव्ही-शैलीतील कारच्या धाडसी उत्क्रांतीचे प्रतीक आहे. १५ नवीन खास वैशिष्ट्यांसह सुसज्ज, सिट्रोएन सी३ ची ही नवीन आवृत्ती प्रत्येक प्रवासात उच्च आराम, तंत्रज्ञान-जाणकार सुविधा आणि सुरक्षितता प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेली आहे.तसेच त्यांच्या सेगमेंटमधील सर्वात सुलभ ऑफर म्हणून स्पर्धात्मक धार राखली आहे. सिट्रोएनची प्रॉक्सी-सेन्स पॅसिव्ह एन्ट्री आणि पुश स्टार्ट सिस्टम नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या बाबतीत आघाडीवर आहे.या सेगमेंटमधील सर्वोत्तम वैशिष्ट्य आहे जी खरी हँड्स-फ्री सुविधा आणते. पारंपारिक कीलेस सिस्टीमच्या विपरीत ज्यांना वापरकर्त्यांना अजूनही रिक्वेस्ट सेन्सर दाबावा लागतो, प्रॉक्सी-सेन्स चावी जवळ असताना वाहनाला स्वयंचलितपणे अनलॉक करण्यास सक्षम करते.

नवीन सिट्रोएन सी३एक्स ही तिच्या सेगमेंटमधील एकमेव एसयूव्ही आहे जी स्पीड लिमिटर



**चलती का नाम गाडी**

फंक्शनॅलिटीसह क्रूझ कंट्रोल देते, हायवे आराम वाढवते, लांब प्रवास अधिक आरामदायी आणि कार्यक्षम बनवते. ऑटो-डिमिंग इनसाइड रीअरव्ह्यू मिरर रात्रीच्या वेळी ग्लेअर-फ्री ड्रायव्हिंग सुनिश्चित करते, तर सात व्ह्यूइंग अँगलसह नवीन ३६०-डिग्री कॅमेरा सिस्टम वाढीव दृश्यमानता आणि ड्रायव्हिंग अनुभवाचे भविष्य-प्रूफ देते. अतिरिक्त अपडेट्समध्ये एलईडी व्हिजन प्रोजेक्टर हेडलॅम्प, एलईडी प्रोजेक्टर फॉग लॅम्प, एलईडी इंटीरियर लाइटिंग आणि प्रवासात जलद चार्जिंगसाठी मागील यूएसबी टाइप-सी पोर्ट समाविष्ट आहे. पेरिमेट्रिक अलार्म सिस्टम आणि व्यापक सुरक्षा सूट सिट्रोएन सी३ ला एक विश्वासार्ह साथीदार बनवते.

# काँग्रेसची वोटर अधिकार यात्रा यशस्वी होईल का?

**माझं मत**

**१] निरंजन प्रसाद**
**[ शिक्षक ]**

आपला देश हा लोकशाही प्रधान देश आहे.अर्थातच आपल्या याच सार्वभौम देशातील अगदी ग्रामपंचायती पासून ते लोकसभेपर्यंत च्या सर्व निवडणुका या संविधानिक मार्गानेच व्हायला हव्यात. प्रत्येक नागरिकाला आपल्या अमूल्य अशा मतदानाचा हक्क आहे. मात्र साध्याच देशातील वातावरण लक्षात घेता विशिष्ट राजकीय पक्षांच्या मागील काही वर्षातील निवडणूक प्रक्रियेतील संशयास्पद कृती पाहता सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेत नक्कीच मत चोरीचे प्रकार उघडकीस आलेले दिसतात केवळ बिहारचे नाही तर महाराष्ट्र,उत्तर प्रदेश,पश्चिम बंगाल सारख्या राज्यांमध्ये देखील असे प्रकार वाढीस लागल्यामुळेच काँग्रेसने वोटर अधिकार यात्रा सुरु केली आहे त्यामुळे निवडणूक आयोग आणि मतदार देखील नक्कीच जागृत होतील आणि मतदान प्रक्रिया संविधानिक पद्धतीने होईल.

**२] शैला महाकाल**
**[ कार्यकर्ती -शिवसेना ]**

मागील काही काळात लोकसभा आणि महाराष्ट्रातील आणि विविध राज्यातील विधानसभांच्या निवडणुका या पैशाच्या आणि ईव्हीएम मशिन्स हॅक करून जिंकल्या गेलेल्या आहेत हे अनेक माध्यमांनी आणि तज्ज्ञांनी देखील सप्रमाण सिद्ध करून दाखवले आहे. आता याच निवडणुका मतदार याद्यांमधील लोकांनाच गायब करून लाखोंचा गोलमाल करून देखील जिंकता येतात हे देखील समोर आले आहे. याविरोधात काँग्रेस पक्षासह विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाला धारेवर धरले हे योग्यच आहे. काँग्रेसने सुरु केलेली वोटर अधिकार यात्रा हि देशातील सर्वसामान्यांनाचा आवाज असून निवडणूक प्रक्रियेतील हा भ्रष्टाचार संपविण्यात ही यात्रा नक्कीच यश:स्वी होईल असं वाटते.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# आशिया चषकासाठी भारताचा संघ जाहीर

## गिल उपकर्णधार; श्रेयस अय्यरला संधी नाहीच

**मुंबई, दि. १९ प्रतिनिधी**

आशिया चषक २०२५ साठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. आशिया चषक स्पर्धा येत्या ९ सप्टेंबरपासून युएई येथे खेळवली जाणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे स्पर्धा न होण्याची चिन्ह होती, पण अखेरीस या स्पर्धेला हिरवा कंदील मिळाला. या स्पर्धेत ८ संघ सहभागी होणार असून ४-४ संघांची दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तानचे संघ एकाच गटात आहेत.



भारतीय संघाने आता आशिया चषक २०२५ साठी भारतीय संघ जाहीर केला आहे. सूर्यकुमार यादव भारतीय संघाचे नेतृत्त्व करणार आहे. पुढील वर्षी होणारा टी-२० विश्वचषक २०२६ टा विचार करता आशिया चषक हा टी-२० फॉरमॅटमध्ये खेळवला जाणार आहे. भारताची सलामी जोडी कोण असणार, शुबमन गिल, यशस्वी जैस्वाल आणि श्रेयस अय्यर या खेळाडूंना संधी मिळणार का; असे बरेचसे प्रश्न उपस्थित होत होते.

आशिया चषक २०२५ साठी भारताचा १५ सदस्यायी संघाची घोषणा झाली आहे. सूर्याच्या नेतृत्त्वाखाली या संघात शुबमन गिलला संधी देण्यात आली आहे. शुबमन गिल संघाचा उपकर्णधार असणार आहे. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा या सलामी जोडीची निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर तिलक वर्मादेखील संघात कायम आहे. हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल हे अष्टपैलू खेळाडू संघाचा भाग आहेत. याशिवाय जितेश शर्मा आणि संजू सॅमसन यष्टीरक्षकाच्या भूमिकेत असतील. गोलंदाजीत हर्षित राणा, बुमराह आणि अर्शदीप हे वेगवान गोलंदाज आहेत. तर वरूण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव हे फिरकीपटू आहेत. तर फिनिशरच्या भूमिकेसाठी रिंकू सिंहची निवड करण्यात आली आहे.

श्रेयस अय्यरला टी-२० संघात पुन्हा एकदा संधी मिळालेली नाही. याचबरोबर यशस्वी जैस्वालला देखील संघाचा भाग नाहीये. केएल राहुलही आयपीएल २०२५मधील चांगल्या कामगिरीनंतर संघात स्थान निर्माण करण्यात अपयशी ठरला आहे. एकंदरीत श्रेयस अय्यर, मोहम्मद सिराज, केएल राहुल, यशस्वी जैस्वाल, वॉशिंग्टन सुंदर, ध्रुव जुरेल या खेळाडूंना टी-२० संघात स्थान मिळालेलं नाही.

**आशिया चषक २०२५ साठी भारताचा संघ**

सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुबमन गिल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), हर्षित सिंह राणा, रिंकू सिंह

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002. Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219